
साप्ताहिक

२२ फेब्रुवारी ८६/२ रुपये

# माणूस



## ८५ चं बजेट 'युगप्रवर्तक'... वगैरे ८६ चं बजेट?

• डॉ. पु. ग सहस्रबुध्दे - व्यक्ति आणि शिक्षक
प्रथम स्मृतिदिनानिमित्त विशेष लेख.

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : पंचविसावे

अंक : एकूणचाळिसावा

□

२२ फेब्रुवारी १९८६

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :


साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ–श्याम देशपांडे



## मुंबापुरी

### □ मुख्यमंत्री... महाराष्ट्र

मुख्यमंत्री सांप्रत मानसिक द्विधावस्थेत गुरफटलेत असं कानी आलंय. जे. जे. या अक्षरांचा तर त्यांनी इतका धसका घेतलाय की आपल्या नावातलं 'जे' हे अक्षर कसं काढता येईल, या विवंचनेत ते सध्या आहेत.

त्यात पुन्हा पंतप्रधान राजीव गांधींकडून आलेलं पत्र. फेब्रुवारी नऊला मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस होता. राजीवजींचं लगोलग अभिनंदनपर पत्र आलं. आता मुख्यमंत्र्यांना खरं तर या पत्रामुळे कोण आनंद व्हायला हवा. त्यांनी जयपुरी सुतारफेणी वाटायला हवी होती. मुख्यमंत्री खूष झाले तर मग अधिक ते काय हवं ? पण छे : मुख्यमंत्री हिरमुसले. त्यांनी केकवरच्या मेणबत्त्या विझवल्या त्याही एक मोठा उसासा टाकून ! म्हणे हं.

पंतप्रधानांनी भले अभिनंदनपत्र पाठवलं. पण उद्या पक्षाध्यक्ष या नात्यानं पत्र मागे घेतले तर काय घ्या ? पेट्रोल, रॉकेलचे दर आधी नाही का महामंत्री म्हणून वाढवले अन् मग पक्षाध्यक्ष म्हणून 'घूम–जाव' केला ? असा 'घूमजाव' पत्राबद्दल केला तर काय, अशी मुख्यमंत्र्यांना चिंता लागून राहिली. आम्हीही त्या चिंतेच्या भावनेशी सहमत आहोत.

ह्या चिंतेत आणखी एक भर पडलीये. कशी तेही सांगतो. फेब्रुवारी नऊ हा शिवाजीरावांचा वाढदिवस, आणि अंतुल्यांचाही. आता मुख्यमंत्रीपदी नसून अंतुले सॉलिड गोचीत आणि मुख्यमंत्रीपदी असूनही शिवाजीराव अस्वस्थ.

आपला आणि अंतुल्यांचा जन्मदिवस एकच हे कळल्यावर शिवाजीरावांनी आपली कुंडली जयंतरावांकडे ( टिळक नव्हे, साळगांवकर ) खरं तर पाठवायला काहीच हरकत नव्हती. पण जयंतराव पडले मधू मंगेशांचे परममित्र. आणि मधुमंगेश म्हणजे अंतुल्यांचे स्नेही. आपल्या साडेसातीची कीर्ती कर्णोपकर्णी होणार. शेवटी, भाई सावंत काय, कर्णिक काय अन अंतुले काय, सगळे कोकणी. एकाच्याही तोंडात तीळ भिजत नाही.

तिकडे आदिक–भोसले ही जोडगोळी शिवाजीरावांना राहू–केतू होऊन नडत्ये. दोघेही दिल्लीला गेलेत. आता तीन चार दिवस सगळ्यांचे कान फुंकत बसतील. खरं तर मुख्यमंत्र्यांना अस्वस्थ होण्यामारखं काही नाही. खुद्द राजीव गांधींचं 'हॅपी बर्थ डे टू यू' वालं पत्र आहे ना खिशात. हकालपट्टी झालीच तर पंतप्रधानांकडून वाढदिवसाप्रित्यर्थ अभिनंदनपत्र मिळालेला महाराष्ट्राचा पहिला मुख्यमंत्री असा लौकिक तरी इतिहासात राहील.

### □ मुख्यमंत्री... कर्नाटक

ब्रिटनचे माजी संरक्षणमंत्री मायकेल हॅजलटिन यांनी वेस्टलॅंड हेलिकॉप्टर्स ह्या कंपनीच्या संदर्भात निर्माण झालेल्या वादळामुळे आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांनी लंडन ऑब्झर्व्हर मध्ये 'Why I resigned from Thatcher's cabinet' असा लेख लिहून आपल्या निर्णयामागची भूमिका स्पष्ट केली. हा लेख वाचताना ब्रिटिश राजकारणात अजूनही वैयक्तिक नीतीमूल्यांना स्थान आहे याची जाणीव होते.

वेस्टलॅंड हेलिकॉप्टर्स ही एक डबघाईला आलेली खाजगी ब्रिटिश कंपनी आहे. तिला ह्या संकटातून बाहेर काढण्यासाठी अमेरिकेतील एका हेलिकॉप्टर कंपनीने ह्या कंपनीचे अधिकाधिक शेअर्स विकत घेऊन, अत्याधुनिक तत्रज्ञान वेस्टलॅंड हेलिकॉप्टर्सला देण्याचे ठरविले. अमेरिकेतील ह्या कंपनीप्रमाणेच वेस्टलॅंडचा ताबा मिळविण्यासाठी

ब्रिटन आणि युरोपमधील काही कंपन्या एकत्र येऊन सयुक्त प्रयत्न करीत होत्या.

हॅजलटिन ह्याचे म्हणणे असे होते की एकदा अमेरिकन तंत्रविज्ञान उच्च दर्जाचे मानून त्याचा स्वीकार झाला की त्याचा ब्रिटिश तंत्रविज्ञान सशोधन आणि कारखानदारीवर विपरीत परिणाम होईल. त्यांच्यामध्ये एक प्रकारचा न्यूनगड निर्माण होईल. त्यांनी वेस्टलॅंडचा ताबा युरोपियन कन्सॉर्टियमला द्यावा असा आग्रह धरला. पंतप्रधान मार्गारेट थॅचर ह्यांचा कल अमेरिकन कंपनीकडे होता. कॅबिनेटने बहुमताने अमेरिकन कपनीच्या बाजूने निर्णय घेताच हॅजलटिन ह्यांनी आपला राजीनामा सादर केला.

त्याच्या लेखात त्यांनी म्हटले होते– लोकशाहीत ज्या पद्धतीने निर्णय घेतले जातात त्याची मला कल्पना आहे. ज्या क्षणी पंतप्रधानानी संरक्षण खात्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली त्यावेळेपासून ब्रिटनच्या सरक्षण व्यवस्थेबाबतचा प्रत्येक निर्णय मी माझ्या सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून घेत आलेलो आहे. पतप्रधानानीही आजपर्यंत माझ्या कोणत्याही निर्णयात कधी हस्तक्षेप केला नाही. वेस्टलॅंडच्या बाबतीत मला जे सत्य जाणवले त्यानुसार मी निर्णय घेतला. अशा प्रसंगी जर माझ्या सदसद्विवेक बुद्धीला पटत नसताना मी पंतप्रधानांच्या इच्छेनुसार निर्णय बदलला, तर माझ्या निर्णय सामर्थ्यावर यापुढे कॅबिनेटचा विश्वास राहणार नाही. माझा राजीनामा हा वेस्टलॅंडच्या प्रश्नावरून दिला गेलेला नाही. कोणत्या निर्णयामुळे त्या कपनीचे भले होईल ह्या संबधी मला चिंता वाटली नाही. परंतु ज्या नीतीमूल्यांच्या सामर्थ्यावर मी हे पद सांभाळीत होतो, त्यांनाच जेव्हा धोका निर्माण झाला तेव्हा पंतप्रधानांच्या मनात माझ्या निर्णयशक्तीबद्दल संभ्रम राहण्यापेक्षा राजीनामा देणे मला अधिक श्रेयस्कर वाटले.

इतक्या विस्ताराने हे सर्व सांगण्याचे प्रयोजन म्हणजे,कर्नाटकचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांनी आपल्या पक्षाचा दिलेला राजिनामा. मागे लोकसभा निवडणुकीत कर्नाटक जनता पक्षाच्या झालेल्या पराभवानंतर हेगड्यांनी राजीनामा दिला होता. त्यावेळी विधानसभा निवडणुकीपूर्वी ते मुंबापुरीस आले होते. त्यांची खास मुलाखत आम्ही माणूससाठी पाठवून दिली होती. परंतु संपादकानी ती उशीरा हातात पडली ह्या कारणास्तव छापली नाही. एकेक सपादक काय खट असतात, ह्याच्या तक्रारी आम्ही तुमच्याकडे करीत नाही. आपण मुख्यमंत्र्यांना भेटलो हे वाचकांना सांगायला पत्रकार किती उत्सुक असतात हे संपादकांना कधी कळणार नाही. असो.

हेगड्याचा मुंबापुरीत दोन एक दिवसाचा मुक्काम होता. नरीमन पॉइंटवरील जनता पार्टीच्या कार्यालयात त्यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यानतर ताजमहालमध्ये ते उतरले होते, तेथे आम्ही त्याची मुलाखतीसाठी भेट घेतली हेगडे हे अतिशय सुसंस्कृत गृहस्थ आहेत. जाहीर भाषणात, पत्रकार परिषदेत वा ऑफ द रेकॉर्ड बोलताना कधीही त्याचा तोल ढळत नाही. जॉर्ज फर्नांडिस आणि रामकृष्ण हेगडे हे एकाच पक्षात आहेत ह्याचेच आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटते. चंद्रशेखर ह्याच्यासारखेच त्याच्या चेहऱ्यावर दाढीचे खुंट दिसतात; पण चंद्रशेखर याच्याप्रमाणे जगाचा उद्वेग आल्याचे भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसत नाहीत.

प्रश्नाची उत्तरे हेगडे मुद्देसूद देतात; पण हातचे राखून बोलत नाहीत. मुलाखतीच्या शेवटी आम्ही त्यांना विचारले की एन. टी. रामारावाच्या बाबतीत तुम्ही आणि तुमच्या पक्षाने जी कामगिरी बजावली तसा प्रसंग पुन्हा ओढवला तर तुम्ही काय कराल ? हेगडे हसत म्हणाले : असली कामे आयुष्यात एकदाच घडत असतात; पुन्हा जर मला कोणी ह्या प्रसंगातून परत जाण्यास सांगितले तर मला नाही वाटत त्याच सामर्थ्याने मी त्यातून बाहेर पडेन !

हेगड्यांनी राजीनामा दिला आणि त्याचा स्वीकार झाला ही एका अर्थाने उत्तम घटना झाली. व्यावहारिक दृष्टचा पहाता पुढची पंधरा वीस वर्षे निवडणूक जिंकणे आता त्यांना कठीण पडू नये. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याकडील राजकारणात त्यांनी नैतिक अधिष्ठानाची नव्याने पटवून दिलेली आवश्यकता. हेगड्याच्या राजिनाम्यामुळे विरोधी पक्षाच्याही नैतिकबळात विशेष वाढ होईल. कर्नाटकचा राज्यकारभार आता कोण सांभाळील ह्या चिंतेपेक्षाही संपूर्ण देशाच्या राजकीय वातावरणावर ह्या राजिनाम्याचा जो परिणाम होईल तोच अधिक दिलासा देणारा आहे. जी माणसे भक्कम अशा नैतिक अधिष्ठानावर उभी असतात, ती सत्तेवर किंवा सत्तेशिवायही सामर्थ्यशालीच रहातात.

– विष्णु जयदेव

---

अमेरिकेतून...

# चॅलेंजर स्फोट आणि नंतर....

स्थळ : केप कॅनाव्हरल, फ्लॉरिडा– वेळ : मगळवार जाने. ८, सकाळी ११ वाजून ३९ मिनिटे– 'चॅलेंजर' हे अतरिक्ष यान उड्डाण करते–नासा (NASA–National Aeronautical and Space Administration) चे शास्त्रज्ञ, कार्यकारी, अंतरिक्षयानातून गेलेले शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ, पायलट आणि एका शाळेतील शिक्षिका या सातजणांचे नातेवाईक हे उड्डाण प्रत्यक्ष पहात आहेत–७४ सेकदांनी यान सुमारे १० मैल वरच्या वातावरणात गेल्यावर अचानक आगीचा डोंब उसळतो– अंतरिक्षयान आणि त्यातील सात माणसे क्षणार्धात भस्मसात होतात.

अमेरिकेत घरोघरी, कार्यालयातून, मोटारीमध्ये रेडिओ असल्याने आणि प्रत्येक दिवशी २४ तास अखंडपणे फक्त बातम्या देणारी आकाशवाणी आणि दूरदर्शनची स्टेशने असल्यामुळे आणि खूप लोक काम करताना, मोटार चालवताना, रेडिओ ऐकत असल्यामुळे काही वेळातच सबंध अमेरिकाभर ही दुःखद बातमी पसरली आणि सर्व अमेरिका हळहळली.

तसे अतरिक्षयानाच्या उड्डाणाचे हल्लीहल्ली अमेरिकनांना विशेष नाविन्य किंवा अप्रूप राहिले नव्हते. १९५७ साली रशियाने स्पुटनिक उडवल्यावर आपण ह्या क्षेत्रात मागे असल्याची अमेरिकनाना एकदम जाणीव झाली. तेव्हापासून एका नव्या निर्धाराने

आतापर्यंत अनेक याने, प्रयोगशाळा, चद्रावरती मानव पाठवणे इ. अनेक नेत्रदीपक पराक्रम नासाने गाजवले होते. (या नासामध्ये काही भारतीय शास्त्रज्ञ महत्त्वाच्या हुद्द्यावर आहेत). त्यामुळे अतरिक्षयानाचे उड्डाण हे काहीसे नित्यक्रमासारखे झाले होते.

पण यावेळेच्या उड्डाणाकडे सर्व अमेरिकेचे लक्ष लागले होते–कारण या उड्डाणाबरोबर एक खास प्रवासी होती नासाच्या इतिहासात पहिल्यांदाच सामान्य अमेरिकन नागरिकाची प्रतिनिधी म्हणून श्रीमती ख्रिस्टा मॅकॉलिफ ही कॉनकॉर्ड या छोट्या शहरातल्या एका शाळेतील शिक्षिका चालली होती. शिक्षण क्षेत्रातल्या व्यक्तीला अंतरिक्षयानाबरोबर पाठवण्याची कल्पना राष्ट्राध्यक्ष रेगन याची. त्यामागची भूमिका अशी की अमेरिकन शालेय विद्यार्थ्यांना एका शिक्षिकेच्या अनुभवातून अमेरिकेच्या अतरिक्ष प्रकल्पासंबंधी एक वेगळीच आपुलकी निर्माण होईल आणि नवा वैचारिक आणि शास्त्रीय दृष्टिकोन मिळेल. कॉनकॉर्डच्या शाळेतील विद्यार्थी, हे उड्डाण दूरदर्शनवर प्रत्यक्ष पहात होते. उड्डाण झाल्याबरोबर सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवल्या. त्यांच्या चेहऱ्यावर आपल्या शाळेतील एक शिक्षिका अतरिक्षयानात आहे याचा अभिमान झळकत होता. –पण ७४ सेकंदातच त्याच दूरदर्शन पडद्यावर यानाचा प्रचड स्फोट त्यांना दिसला. क्षणभर त्या लहान मुलामुलीना हा एक प्रचड अपघात आहे याची कल्पना आली नाही–पण लगेचच त्याना त्या प्रसगाचे गाभीर्य जाणवले आणि त्याच्या मनात आणि चेहऱ्यावर दुःखाची छाया पसरली.

सर्व देश या अपघातामुळे दुखी झाला आणि त्यासंबंधी शोकमय प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. अमेरिकनाकडे एक प्रगत पाश्चात्य शास्त्रप्रधान प्रतीक म्हणून आपण पहातो. पण या दुर्घटनेमुळे अमेरिकन माणूस किती संवेदनाशील असतो, आणि अशा प्रसंगी कसा हळवा होतो त्याचे दर्शन झाले. श्रीमती मॅकॉलिफ याचे पती, तीन मुले आणि आईवडील शोकमग्न झाले. रेगन यानी उपराष्ट्राध्यक्ष बुश याना सर्वांच्या नातेवाईकाचे सांत्वन करण्याकरता रवाना केले. दूरदर्शनवर रेगन यांनी सर्व राष्ट्राला आणि विशेषतः अमेरिकन शालेय विद्यार्थ्यांना उद्देशून एक छोटासा संदेश दिला– 'आजचा दिवस सुतक पाळण्याचा आहे सात अंतरिक्षवीराना मी त्याच्या देहत्यागाबद्दल वदन करतो.' पण त्याचबरोबर त्यानी नासाचे पुढील कार्यक्रम चालू रहातील असाही आत्मविश्वास प्रकट केला. अमेरिकन मनाच्या घडणीच्या अनेक पैलूचे हृद्य दर्शन यावेळेला झाले. मृत अंतरिक्षवीराच्या नातेवाईकानी पण अतरिक्षासबंधीचे कार्यक्रम या अपघातामुळे व्यत्यय न येता पुढे चालू राहिले पाहिजेत अशी इच्छा व्यक्त केली. पाश्चात्य माणसाची आपल्या ज्ञानाच्या आणि कर्तबगारीच्या सीमा वाढवण्यासंबंधीची अस्वस्थता, आव्हान स्वीकारण्याची वृत्ती आणि स्पर्धेत नेहमी पहिले रहाण्याचा प्रयत्न करण्याचा जोम ह्या दुखद घटनेतूनसुद्धा आणि सात अतरिक्षवीराच्या देहत्यागातून प्रकट होत होता.

याचबरोबर कशामुळे असा स्फोट झाला यासंबधी ताबडतोब चौकशी सुरू झाली. अटलाटिक समुद्रात विखुरलेले अतरिक्षयानाचे जळलेले भाग गोळा करण्याचे काम शीघ्रतेने सुरू झाले. अतरिक्षयानाचे वेगवेगळे भाग ज्या वेगवेगळ्या खाजगी क्षेत्रातल्या (Private Sector) कपन्या बनवतात त्यांनी स्वतःची चोकशी मडळे नेमली. या क्षणी स्फोट प्रत्यक्ष कशामुळे झाला याची कुणालाच कल्पना नसली तरी यानाला जोडलेल्या इंधनाच्या टाकीमध्ये आणि / किंवा उजव्या बाजूच्या रॉकेट (अग्निबाण) मध्ये काही दोष निर्माण झाला असावा असा सशय व्यक्त करण्यात आला. सर्व माहिती नीट गोळा व्हायला आणि त्याचे पृथक्करण करायला बराच कालावधी लागेल आणि एवढे करूनसुद्धा स्फोटाचे सपूर्ण कारण कदाचित कळणारही नाही. पण ह्या दुखद घटनेमुळे मानवी पराक्रमाच्या सीमा आणखी उचवण्याकरता आर्थिक (एका अंतरिक्षयानाची किंमत सुमारे २ अब्ज डॉलर्स) आणि त्यापेक्षा जास्त महत्त्वाची अशी मानवी त्यागाची किंमत द्यावी लागते आणि एकाद्या महान प्रकल्पाच्या परिपूर्ततेसाठी किती हिंमत धरावी लागते याचे प्रत्यक्ष दर्शन सर्व अमेरिकनाना त्याच्या घरातल्या दूरदर्शनवर आणि वर्तमानपत्रात झाले.

– विजय जोशी
न्यू जर्सी

कर्नाटक

# बहात्तर तासांचे राजीनामा नाट्य !

गेल्या सप्ताहात गाजलेलं नाव कोणतं याला एकमुखी उत्तर द्याव लागतं कर्नाटकचे मुख्यमत्री रामकृष्ण हेगडे ! गेल्या आठवड्यात गाजलेली घटना कोणती– हेगडे साहेबानी नैतिक मूल्ये जपण्यासाठी दिलेला राजीनामा ! या राजीनामा विषयामुळे अर्थसंकल्पिय वातावरणात चर्चेसाठी आणखी एक विषय मिळाला. आणि ही चर्चा मुख्यमंत्री हेगडे, राज्यपाल ए. एन. बॅनर्जी, अध्यक्ष चद्रशेखर या तीन नावाभोवती पिंगा घालू लागली.

गेल्या वर्षी राजीव लाट आली होती. त्या लाटेत केवळ कर्नाटक राज्य वाचले होते. लोकसभेच्या निवडणुकीत पानीपत झाल्यानंतर नैतिक जबाबदारी उचलीत, याच मुख्यमत्री हेगडे यानी लगेच राजिनामाच सादर केला होता आणि त्यामुळेच विधानसभेच्या मैदानात हेगडेंनी बाजी मारली होती. इतर सर्व राज्यात इं. कॉ. सरकारेच रूपे दिसत असताना कर्नाटकात मात्र जनता पक्षाने पाय रोवला, असे चागले दृश्य त्यावेळी पहायला मिळाले हेगडे यानी स्वीकारलेली नैतिक जबाबदारीच या जनता विजयाला मुख्यत्वे कारणीभूत झाली

अरक बाटल्याना बद करण्याचे एक कत्राट खासगी कत्राटदारास दिले होते. त्या प्रकरणी उच्च न्यायालयाने हेगडे सरकारवर ताशेरे ओढले. हे कत्राट ज्या तांत्रिक बाबीची

पूर्णता करून देणे आवश्यक होते, तसे पूर्ण करून देण्यात आले नाही असे मत न्यायालयाने माडले. यात त्यानी प्रत्यक्ष हेगडे याना दोषी धरले नव्हतेच. शिवाय त्यांच्या सरकारने या कंत्राटदाराच्या तिजोऱ्या भरण्यासाठी भरमसाठ भाव दिला,असेही या न्यायालयाने म्हटले नव्हते कारण देण्यात आलेली किमत ही ८२ साली नेमलेल्या समितीने शिफारसलेलीच किंमत होती. पण उच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे मुख्यमत्री हेगडे याना वर्मी लागले.

तशात भर म्हणून कर्नाटकातले विरोधी पक्ष नेते बगारप्पा यांनीही टीका केली. राजिनामा द्या म्हटले. लोकशाही मूल्यांची जपणूक करणाऱ्या हेगडेंनी त्वरीत आपला राजीनामा देऊन टाकला.

कर्नाटक राज्यात तर या राजिनाम्याने हाहा:कारच उडाला. जनताच्या एकजात सर्व आमदारानी हेगडेंची मनधरणी केली. काही जण अक्षरश: रडलेही. काही सहकारी मंत्र्यांनी हेगडेंकडे आपले राजिनामेही दिले. हेगडे यांनी ते फाडून टाकले. सर्व आमदारांनी आम्ही आपल्यालाच पुन्हा पक्षनेतेपदी निवडू म्हणून सागितले.

जनतापक्षाचे अध्यक्ष चद्रशेखर याचे मत प्रारंभी याववयाचे होते. दरम्यान तेलगू देसमचे नेते व आध्रचे मुख्यमंत्री एन. टी. रामाराव, तामीळनाडूचे मुख्यमंत्री एम. जी. रामचद्रन यांनी हेगडे याना राजीनामा मागे घेण्याबाबत विनंती केली. पण हेगडे अविचल राहिले. त्यानी राजीनामा परत घेतला नाही.

खुद्द हेगडे याच्या म्हणण्यानुसार त्यानी हा राजीनामा दिला, तो अत्यंत गुप्त स्वरूपात होता. प्रारभी त्यानी त्याबाबतचे एक खासगी पत्र पक्षाध्यक्ष चंद्रशेखर याच्याकडे पाठविले होते. त्या खासगी पत्रातला मजकूर बाहेर फुटला. वृत्त पार वृत्तपत्र कचेऱ्यात पोहोचले. दूरदर्शननेही ते प्रसारीत केले.

मात्र या वृत्ताचा कर्नाटक मंत्रिमंडळातील तीन मंत्र्याना पत्ताही नव्हता. त्यानी या राजीनामा वृत्ताचा इन्कारच केला. पण खुद्द हेगडे यानीच मग आपण तसे पत्र राज्यपालाकडे पाठविले असे सागितले. आपल्या खासगी पत्रातील राजीनामा वृत्तपत्रांपर्यंत पोहोचला कसा, याचे त्यानाही स्वतःला कोडे पडले होते. आणि या वृत्तप्रसारामुळेच मग त्याना राजीनामा राज्यपालाकडे धाडावा लागला.

यावरून पुन्हा चर्चा सुरू झाली. पत्र गोपनीय होते तर फुटले कसे? पक्षाध्यक्ष चद्रशेखर नि हेगडे याच्यात काही बेबनाव आहे का? जर तसे असेल तर त्याचाच हा परिणाम का? काहीच्या मते तर हा अध्यक्षपदाचाच एक वाद आहे. पण हेगडेंसारखे मूल्ये साभाळणारे गृहस्थ भलताच वाद भलत्याच ठिकाणी उपयोगात आणतील असे वाटत नाही.

## नाट्य रंगले

हेगडे याच्या राजिनाम्यानतर हे नाट्य संपले नाही विविध नेत्यांच्या गळ घालण्याप्रमाणेच राज्यपाल ए. एन्. बॅनर्जी याच्याही भूमिकेमुळे हे नाट्य आणखी रंगले. मुख्यमत्री हेगडे यांनी राजीनामा दिला, त्यावेळी राज्यपाल बॅनर्जी बाहेरगावी गेलेले होते. त्यामुळे हेगडेंचा राजीनामा स्वीकारला की नाही, हे अनुत्तरीत राहिले.

राज्यपाल बॅनर्जी परत आले तेव्हा मुख्यमत्री हेगडे दिल्लीमार्गे कानपूरला रवाना झाले होते. त्याच्या एका जवळच्या नातेवाईकाचे तेथे लग्न होते. त्यामुळे पुन्हा एकदा विषय ताणला गेला. राज्यपाल बॅनर्जी यानी विरोधकाना स्पष्टपणे सागितले की हेगडेंशी चर्चा केल्याखेरीज मी निर्णय घेणार नाही.

झालं! हा अक आणखी रंगला. बगारप्पा या इ. कॉं. नेत्याने (प्रदेश) राज्यपालांचे वर्तन राज्यघटनेला धरून नसल्याचे म्हटले. इं. कॉं. उपाध्यक्ष म्हणाले की, त्यानी राजीनामा स्वीकारायला हवा होता. याउलट हेगडेंनीही सर्व घटनात्मक बाबी पूर्ण करून मगच बंगलोर सोडायला हवे होते.

तिकडे हेगडे दिल्लीत जनता पक्षश्रेष्ठीशी चर्चा करीत होते. जनताचे तीन सरचिटणीस हेगडेंना विनवून सांगतहोते, राजीनामा मागे घ्या. दरम्यान अध्यक्ष चद्रशेखर व हेगडे यांनी बरोबरच बगलोरला जायचे ठरविले. हेगडे १४ फेब्रुवारीलाच परतणार होते. पण तोपर्यंत बरेच काही घडायचे होते.

अर्जुनसिंग, बंगारप्पा व राज्यपाल बॅनर्जी यांचा वाद चागलाच रगला. चर्चा केल्याखेरीज राजीनामा स्वीकारणार नाही ही त्यांची भूमिका ठाम होती. पण प्रश्न घटनात्मक पातळीवर चर्चिला जात होता. शेवटी राज्यपाल बॅनर्जींनी गुरुवारी दि. १३ फेब्रुवारीलाच रात्री हेगडे याच्याशी फोनवरून संपर्क साधला, आणि त्यानंतर आपण हेगडे यांचा राजीनामा स्वीकारल्याचे मान्य केले.

हेगडेंनी राजीनामा दिला, राज्यपालानी अखेरीस स्वीकारला. पण यातून नवे प्रश्न उभे राहिले. काही अर्धवट टीकाकारानी हेगडे प्रकरण पार अतुले प्रकरणाशी तोलून पाहिले. पण कोठे हेगडे अन् कोठे अतुले असे म्हणावे,इतका फरक या दोन्ही प्रकरणात आहे. अतुलेंची शेवटी अक्षरश हकालपट्टीच करावी लागली होती. बाकी त्या विषयावर आताच काही म्हणता येत नाही. पण हेगडे हे खरोखरच नीतीमुल्ये जपणारे आहेत. हे त्यांनी दुसऱ्यांदा दाखवून दिले आहे. कोणीही आपल्यावर बोट उगारू नये याकडे ते लक्ष देतात. त्याचप्रमाणे आपले शब्दही ते पाळतात. उच्च न्यायालयाचा निकाल सरकारविरुद्ध गेला, तर आपण राजीनामा देऊ हे त्यांचे आश्वासन त्यानी खरे केले. सर्वोच्च न्यायालयात धावण्याचे प्रयत्नही त्यानी केले नाहीत. यामुळे काही टीकाकारानी त्यांना 'ते दोषी आहेत म्हणूनच अपील करीत नाही' असे म्हटले. पण हेगडे यांनी न्यायालयाचा सन्मान राखीत राजीनामा दिल्याने त्याची प्रतिमा उजळूनच निघाली आहे. राजिनाम्याच्या दिव्यानतर त्यांच्याकडे पुन्हा विधिमडळाचे नेतृत्व सोपवले गेले, तर कर्नाटकात पुन्हा एकदा स्वच्छ कारभाराचेच दर्शन घडणार आहे.

## पक्षासाठी....

इंदिराजी गेल्यानंतर तरुण नेतृत्व राजीव गांधींकडे गेले. त्याच्या आगमनापासून राजकारणातले अनेक कुटिल डाव संपले आहेत. राजकीय खेळया आताही खेळल्या जात आहेत; पण त्या विशिष्ट राज्यात इं. कॉं. सरकार नाही,म्हणून तेथला मुख्यमंत्री बदला, या स्वरूपात नाहीत. त्यामुळेच लोकशाही फोफावू शकते, बहरू शकते. सध्या हे तरुण नेतृत्व गागरले आहे की काय इतपत शंका येऊ लागली आहे. पण हेगडेंचे नेतृत्व कर्नाटकाला नि एकूणच जनता पक्षाला आघाडीवर नेत आहे, इतपत विधान आज तरी करता येईल.

त्यामुळेच आज चंद्रशेखरानंतर जनता पक्षात ज्या व्यक्तीला आदराचे स्थान आहे त्या हेगडेंनाच हे पद राजिनाम्याच्या अग्नीदिव्यानंतर पुन्हा एकदा मिळणे आवश्यक होते.

### ... आणि अग्नीदिव्य झाले !

राजीनाम्याच नाटय तर तो स्वीकारेपर्यंत ७२ तासाचेच होते हे खरे. पण या नाटयाचा अंत सुखात होता; हे पहिल्या अंकातच जाणवले होते. रामकृष्ण हेगडेंनी एकप्रकारे स्वत.ची, वैयक्तिक निष्कलकता सिद्ध करण्यासाठी अग्नीदिव्यच केले होते. राजीनामा कुंडात ते उभे राहिले आणि एकतर त्यांच्या तोडीचा एकही नेता कर्नाटकात नसल्याने, हेगडेंचे स्वतःचे हात अरक प्रकरणी न गुतल्याने ते त्या दिव्यातून बाहेर पडले. पण हे अग्नीदिव्य हेगडे यांनी ओढवून घेतले होते हे विसरता येत नाही.

आज हेगडे यांनी हे राजीनामा नाटय दुसऱ्यादा केले. प्रथम जनतेने त्यास प्रतिसाद दिला. नतर त्याच्या पक्षाने प्रतिसाद दिला. पण ते आता जर पुन्हा जनतेकडे गेले असते तर त्याना असाच कौल मिळाला असता का ? हा प्रश्न बरंच काही सांगून जातो. यात कदाचितपणा आहे. दोन्ही शक्यता उभ्या राहतात. तेव्हा हेगडे यानी अग्नीदिव्याशी वारंवार खेळू नये. त्यानी अतुलेंसारखं गेंड्याच्या कातड्याप्रमाणे व्हावे असे आमचे म्हणणे नाहीच. पण त्यानी लगेच राजिनाम्यापर्यंत न धावता प्रथम स्वतःचा स्वच्छपणा दाखवावा. केवळ कोणीतरी कपडे स्वच्छ नाहीत त्यावर डाग पडलेत ही ओरड केली तर लगेच कपडे न फेडता खरंच डाग आहे का, की कशाची सावली आहे हे तपासावं. त्यानंतर ते इतराना पटवून द्यावं. त्यानच यापुढे जनतेचे समाधान होणार आहे.

आता तर हेगडे पुन्हा एकदा सार्वमताने, एकमताने मुख्यमंत्री झाले आहेत. त्यानी आता खऱ्या अर्थाने क्लीन व्हावे व क्लीनपणा केवळ दाखविणाऱ्या नेतृत्वाला दिपवावे. राजीनामा द्यायला धैर्य लागते. हे सर्वांजवळ कोठून असणार हेही हेगडे यानीच दाखवून द्यायचे होते. ते त्यानी दाखविलेही. यामुळेच आता देशातील इतर राज्यात प्रत्येकजण आपल्या नेत्याकडे पाहील. पण व्यर्थ आहे. इतरत्र एसटीचे मोठमोठे अपघात लागोपाठ होतात; पण कोणीही पठ्ठा राजीनाम्यातला 'र' देखील उच्चारत नाही.! अनेकजण 'राम' म्हणतात पण आमचे मत्री राजाराम असतात. त्यांच्या कोशात राजीनाम्यासारखे भलतेसलते शब्द नसतातच. पण काही असो, हेगडेचे हे राजीनामा प्रकरण वाया खासच जाणार नाही. आज एक आहे तर त्याच नेतृत्वाखाली आणखी स्वच्छ लोक येणे अशक्य नाही.! यापुढे असाच सावधतेचा वापर करीत सगळच मैदान हेगडे व त्यांच्यासारख्या नेत्यांना जिकावयाचे आहे. सगळ्या देशाचे यासाठी हेगडेकडे नि असं स्फुल्लीग दिसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे लागून राहणार आहे.

—ए. पी.

---

# धागेदोरे....

---

देशी दारू सीलबद बाटल्यातून विकण्याचा निर्णय १९८१ साली घेण्यात आला. बंगळूर जिल्ह्यातील तीनशेपेक्षा जास्त लोक दारूतील भेसळीमुळे मरण पावले. त्यावेळी या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या देसाई आयोगाने देशी दारूत भेसळ होऊ नये, याकरिता शासनाने देशी दारू सीलबंद बाटल्यातून विकावी, अशी शिफारस केली होती. १९८२ मध्ये जनता शासनाने देसाई आयोगाची शिफारस स्वीकारून देशी दारू सीलबंद बाटल्यातून विकण्याचा निर्णय घेतला. कर्नाटकात दर महिन्याला तीस लाख लिटर देशी दारू खपते. त्यामुळे ही दारू बाटल्यात भरून विकण्याचा निर्णय धाडसी व अत्यत नियोजनबद्धरीतीने अंमलात आणावयाचा असल्यामुळे, जरी १९८२ मध्ये हा निर्णय घेण्यात आला असला तरी प्रत्यक्षात तो अमलात आणण्यासाठी १९८४ साल उजाडले त्यासाठी विधानसभेत अबकारी खात्यातील नियमाची दुरुस्ती करण्यासाठी कर्नाटक शासन अबकारी (दारू बंद बाटल्यात भरणे) नियम हे विधेयक मांडून नवीन नियम तयार करण्यात आले.

या नियमाप्रमाणे कर्नाटक राज्य अबकारी आयुक्त जे. अलेक्झाडर यानी दारू कत्राटदार व कारखानदार यांच्याकडून एप्रिल १९८४ मध्ये अर्ज मागविले. एकशे एकतीस अर्ज आले. ते फोडण्यात येऊन सबंधिताच्या मुलाखती घेण्यात आल्या व त्यातून एकोणतीस लोकाची निवड करण्यात आली. ज्यावेळी शेवटची यादी तयार करण्यात आली, त्यावेळी त्यात फक्त आठच नावे होती ती म्हणजे सी शेल बॉटलिंग कपनी, टी. व्ही. श्रगधरन, एच. एस. सोमशेखरम, दी कोलार वायनरी आणि डिस्टिलरी प्रायव्हेट लिमिटेड, आर. एस. रंगाण्णा, आर. आय. चैतन्य आणि कॅनरा बॉटलिंग कंपनी.

निवड केलेल्या आठपैकी फक्त कोलार वायनरी आणि डिस्टिलरी लिमिटेड ही एकमेव कपनी कायद्याखाली नोंदणी केलेली होती. इतर कपन्यानी फक्त आपले नाव वापरण्यासाठीच परवानगी दिली होती. कारण अर्ज करणाऱ्यामध्ये काही मत्र्याचे नातेवाईक होते. सी शेल बॉटलिंग कंपनी ही श्री. वेदराज हेगडे व श्री. मंजुनाथ हेगडे याच्या मालकीची असून हे दोघेही बधू मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे याचे जवळचे नातेवाईक आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आर. गुडूराव व या हेगडे बंधूचे संबधही अगदी जवळचे आहेत. या कपनीला अबकारी खात्याने दारू बद बाटल्यात भरण्याचा परवाना देताना कारण सागितले आहे, की याचा करोडो रुपयाचा व्यापार-धदा असून बगळूर शहरात मध्यवर्ती ठिकाणी त्याची भरपूर मोकळी जागा आहे. त्याना कारखान्याची उभारणी करणे सोपे जाईल. म्हणजे कारखाना उभारण्यापूर्वीच याना शासनाने कत्राट दिले आहे श्री. प्रताप चित्तापा हा बगळूर येथील एक इस्टेट मालक असून मुख्यमंत्री हेगडे यांचा जावई मनू याचा तो मित्र म्हणून त्याला कत्राट देण्यात आले आहे श्री चैतन्यकुमार हा कर्नाटकचे माहितीमंत्री श्री. जीवराज अल्वा यांचा मेहुणा असून तो खूप श्रीमत आहे. त्यालाही कत्राट देण्यात आले आहे. त्याच्या अर्जात मात्र बेकार अभियता अशी नोद आहे. या

आठ कंपन्यांना देशी दारू बाटल्यातून भरण्यासाठी जेव्हा परवानगी देण्यात आली, तेव्हा कर्नाटक शासनाच्या गृहखात्याने काही शका व्यक्त केलेल्या होत्या, पण अबकारी आयुक्तांनी त्यांचा विचार न करता संबंधित मंत्र्यांकडून आलेल्या तोंडी सूचनांचाच फक्त विचार केला. इतकेच नव्हे, तर नियमाप्रमाणे या सर्व कंपन्यांना एक वर्षासाठी कत्राट देणे आवश्यक होते, पण शासनाने मात्र आम्हास भेसळ करणाऱ्या दारू कंत्राटदारांची व कारखानदाराची साखळी मोडून काढावयाची आहे, असे समर्थन करून या कत्राटदारांना चार वर्षांची कत्राटे दिली.

अबकारी खात्याने ज्यावेळी दारू सीलबंद बाटलीतून विकण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी नियम असा ठरविण्यात आला होता, की जे दारू कारखानदार व कंत्राटदार आहेत, त्यांनाच सीलबद बाटल्यातून दारू भरून विकण्याचे परवाने द्यावेत. पण यासाठी जे एकशे एकतीस अर्ज आले होते व ज्या आठ लोकाची अतिम यादी तयार करून इतराना वगळण्यात आले, ते सर्व दारू कारखानदार व कत्राटदार होते. यात आणखी एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे म्हैसूर शुगर फॅक्टरी हा शासकीय मालकीचा कारखाना असून यात दारू गाळली जाते व कर्नाटकातील एकूण देशी दारूपैकी ६६ टक्के दारू या कारखान्यामार्फत पुरविली जाते. या कारखान्यानेही आपणास हे कत्राट मिळावे म्हणून अर्ज केला होता. पण तो स्वीकारण्यात आला नाही. कदाचित शासकीय कारखाना दारूत भेसळ करील, अशी शका अबकारी आयुक्ताना आली असावी

ज्यांचे अर्ज नाकारण्यात आले, अशा इतर दोन कपन्याना कर्नाटक उच्च न्यायालयात शासनाच्या विरोधात अर्ज करून अबकारी खात्याने दिलेली कत्राटे बेकायदेशीर असल्याने ती रद्द व्हावीत, अशी मागणी केली या याचिकेत असे म्हटले होते, की शासनाने बाटलीचा आकार किती असावा, याचा उल्लेख केलेला नाही. तसेच दारू कारखानदार व कंत्राटदार हेच नियमाप्रमाणे परवाने देण्यास पात्र असताना त्यांचे अर्ज का नाकारले, याची कारणे दिलेली नाहीत. ज्याना कत्राट देण्यात आले आहे, त्याची आर्थिक परिस्थिती काय आहे व त्याचे कारखाने आहेत किंवा उभे तरी राहत आहेत का, याचीही चौकशी करण्यात आलेली नाही. हा सर्व व्यवहार शासकीय नियमाच्या विरुद्ध असल्यामुळे बेकायदेशीर आहे.

जनता शासनाने कर्नाटक उच्च न्यायालयात आपली बाजू माडण्यासाठी पूर्वीचे जनता मत्रिमडळातील कायदामंत्री व सर्वोच्च न्यायालयातील प्रभावी वकील श्री. शांतिभूषण यांची नेमणूक केली. त्यानी उच्च न्यायालयात शासनाची बाजू माडताना असे सांगितले, की 'दारूच्या व्यापारातील राज्य शासनाची सत्ता व अधिकार हे अमर्याद असतात. हा एकूण मामलाच इतका नाजूक असतो, की कधी कधी कमी काळाची सूचना देऊन किंवा कधी कधी टेलिफोनने सूचना देऊन निर्णय द्यावे लागतात. अशा निर्णयाबाबत न्यायालयालाही कायद्याप्रमाणे दखल घेण्याचा अधिकार नाही.'

कर्नाटक उच्च न्यायालयाच्या खडपीठाने न्यायमूर्ती रामा जाईस व श्री. एन. डी. वेंकटेश यांना याबाबतीत निर्णय देताना असे म्हटले आहे, की शासनाने अबकारी खात्याने तयार केलेल्या नियमांचे उल्लंघन उघडपणे केले आहे. याचे न्यायालयाच्या विवेकबुद्धीलाही आश्चर्य वाटते. त्यामुळे कंत्राटे देण्याचा हा निर्णय बेकायदेशीर व लहरी आहे. त्यामुळे आठ कंपन्याना दिलेली पन्नास कोटी रुपयांची कत्राटे रद्द करण्यात यावीत.

उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्याबरोबर विरोधकांनी ज्यावेळी विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला, त्यावेळी श्री. हेगडे म्हणाले होते, की न्यायालयाची अशी भाषा नेहमीच असते, पण न्यायालयाने भ्रष्टाचाराचा किंवा वशिल्याचा कोठेच उल्लेख केला नसल्यामुळे राजीनामा देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे या विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली

या सर्वातून एक गोष्ट स्पष्ट झाली, की या सर्व प्रकरणात श्री हेगडे याचे प्रत्यक्ष हात कोठेच गुतलेले नाहीत, पण त्याना माहीत नसतानाच ही कंत्राटे दिली गेली, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. आपल्या प्रतिमेला उजाळा मिळावा व जनता पक्षात जी गटबाजी निर्माण झाली आहे, ती सपवून परत आमदाराचा व लोकांचा आपल्यावर विश्वास आहे हे दाखविण्यासाठी राजीनामा ही कदाचित एक चाल असेल. कर्नाटकातील जनता पक्षाचे शासन टिकून राहावयाचे असेल तर श्री. हेगडे यांच्याशिवाय दुसरा माणूस नाही, ही गोष्ट खरी आहे. पण यापुढील काळात तरी अशा चुका टाळाव्यात किंवा किमान नैतिकतेच्या तरी गप्पा मारू नयेत, एवढीच लोकाची अपेक्षा आहे

--सुभाष जोशी

[ 'कोल्हापूर सकाळ', १३ फेब्रुवारी ८६ अकावरून साभार पुनर्मुद्रित. ]

अहो, येता-जाता

# टुणटुण नावाची मुलगी

फिरोझ रानडे

नाशिक रोडला एस्. टीत चढे-चढेपर्यंत गाडी अगदी गच्चम-गच्च भरलेली. उन्हाळयाच्या सुट्टया आणि त्यातून लग्न सराईचे दिवस ! मग गर्दीला काय तोटा ?

सगळया जातीचे आणि सगळया तऱ्हेचे लोक त्या गाडीत लहान मुले, बायका, म्हातारी-कोतारी माणसे आणि तरुण-तरुणी. आधीच आपण लोक गोंधळ-प्रिय. त्यातून प्रवास-लग्न-मुंजीकरता केलेला प्रवास वगैरे गोष्टीत तर गोंधळाला अतिशय स्कोप.

बस येताच ही आरडा-ओरडी व धुसाधुशी सुरू झाली कोणी पुढे गेला, कोणाची बॅग राहिली, कोणाचे काही- कोणाचे काही, अगदी नमुनेदार कोलाहल सुरू झाला. पण त्या कंडक्टरच्या दोन घटेत काय जादू आहे पहा. त्याने दोन घंटा वाजवल्या आणि सगळा कोलाहल थाबला.

मी रात्री मुबईहून निघून सकाळी-सकाळी नाशिकला पोहोचलो होतो. काही तरी ८-८॥ ची श्रीरामपूरची बस होती. नाशिक

स्टेशनच्या बाहेरच बसचा अड्डा. अष्ट दिशांना जाणाऱ्या बसेस तेथे येत होत्या व जात होत्या. अशा एक दोन बसेस गेल्या की काही मिनिटे जरा शांत व गर्दी कमी झाल्यासारखे वाटे पण परत पाच एक मिनिटात गर्दी व गोंधळ सुरू होई

मी एकटा व हातात लहानशी बॅग. त्यामुळे 'श्रीरामपूर' आली तेव्हा तित चढणे मला फार सोपे होते. पण बाया-माणसांची इतकी गर्दी होती की त्याच्यात घुसून बसमध्ये चढण्याचा संकोच वाटू लागला.

असा संकोच करणाऱ्या माणसाला जगात काही स्थान मिळत नाहीच; पण साध्या बसमध्येही मिळत नाही. त्याप्रमाणे मला बसमध्ये स्थान मिळाले नाही; पण १०-१५ लोक उभे होते त्यात उभे रहायला मिळाले.

आता गाडीने वेग घेतला होता. थोडं स्थिर-स्थावर झालं होतं. त्यामुळे इकडे तिकडे पहायला फुरसत मिळाली होती व त्याप्रमाणे इकडे तिकडे पहात होतो

तेवढ्यात एका २५-२६ वर्षाच्या मांडीवर लहान मूल असलेल्या बाईनं 'टुणटुण, त्या बॅगमधली दुधाची बाटली दे ग' म्हणून सांगितलं. ही बाटली मागणारी बाई तीन आसनांच्या रांगेत होती व टुणटुण दोन आसनांच्या! मध्ये पॅसेजमध्ये आम्ही उभी प्रवासी-मंडळी.

मी उत्सुकतेने ही 'टुणटुण' कोण म्हणून बघितलं. टुणटुण ह्या सिनेमातल्या नटीमुळे ह्या नावाची मुलगी चांगली भारंभार असणार असा अंदाज. पण ज्या टुणटुणने दुधाची बाटली काढली ती अगदीच काटकुळी ८-९ वर्षाची मुलगी निघाली.

असा तास एक तास गेला व संगमनेर आले. तेथे बरीच मंडळी उतरली व मला 'वरची' जागा म्हणजे बसायला जागा मिळाली व तीही त्या टुणटुण शेजारची. स्थानकावर काही लोक काही खाऊन-पिऊन आले. पूर्वी मीही प्रवासात खूप अचर-पचर खायचा किंबहुना पूर्वी प्रवास म्हणजे अचर-पचर खाणे हेच समीकरण झाले होते. पण आता वयपरत्वे बाहेरचे खाणे भावत नसे. त्यातून स्टॅंडवरचे हॉटेल व तेथले वातावरण फार काही उत्साहदायी नसायचे.

तेव्हा मी दोन पेरू घेतले. ते कापून घेऊन त्यात मसाला वगैरे भरून घेतला व आपल्या जागेवर म्हणजे टुणटुणच्या शेजारी येऊन बसलो. परत गाडी सुरू झाली. मागल्या बाईनी 'टुणटुण, तो टॉवेल दे ग' म्हणून मागणी केली.

'ह्या बाई कोण ग तुझ्या?' मी टुणटुणला विचारले.

'ती माझी थोरली बहीण आहे' टुणटुणने त्या बाईविषयी माहिती दिलीच; पण मेव्हणा साखर कारखान्यात काय करतो वगैरे माहिती देऊन ते सगळे श्रीरामपुरी लग्नाला चालले असल्याचेही सांगितले.

मग मी अर्थातच ती कोणत्या वर्गात आहे, नंबर काय असतो, कोणती शाळा वगैरे चौकशी केली. ती आठवीत होती, नंबर साधारणपणे दुसरा-तिसरा असे. नाशिकपासूनच्या काही २०-२५ किलो मीटरच्या गावी ते रहात होते.

टुणटुण जशी चालाख व हुशार होती तशी समजूतदारही दिसली. मी दिलेल्या पेरूतली तिने फक्त एक फोड घेतली व बाकीचा परत केला.

आता चौकशी करायची तिची पाळी होती. 'काका, तुम्ही काय करता?' ह्या प्रश्नाला मी बिल्डिंगचा इंजिनियर आहे, घराचे नकाशे वगैरे बनवतो म्हणून सांगताच 'हां, हां, म्हणजे तुमचे ऑफिस खूप मोठे असेल व त्यात मोठाले बोर्ड व मोठाली टेबले असतील व तेथे लोक नकाशे बनवत असतील ना?' म्हणून विचारले.

'हो, पण तुला कसं माहीत?'

'मी बाबांबरोबर एकदा असा ऑफिसमध्ये गेले होते.' टुणटुणच्या उत्तरावर अर्थात तिच्या बाबांची चौकशी आलीच.

'ते मिलिटरीत सुभेदार होते. आता रिटायर्ड होऊन कोठल्या तरी कंपनीत काम करतात' टुणटुणने माहिती दिली.

आता आमची पुष्कळ ओळख झाली होती. तेव्हा मी तिला विचारले, 'का ग तू इतकी सुकडी आणि आणि तुझं नाव असं टुणटुण कसं?'

ती छानपैकी हसली व म्हणाली, 'अहो काका, मी लहानपणी की नाही खूप जाडी होते. तेव्हा मला बाबांनी टुणटुण म्हणायला सुरवात केली. आता इतकी वाळले तरी सगळे टुणटुणच म्हणतात.'

'काही वाईट वाटून घेऊ नकोस. चांगलं नाव आहे ते.' मी दिलासा दिला. माझं काही काम त्या मार्गावरच्या एका गावी चाललं होतं. आठवड्यातून दोन दिवस मी तेथे रहायला जात असे. हे सगळे टुणटुणला सांगताच तिने माझ्या रहाण्या-खाण्याची तेथे काय सोय असते वगैरे विचारले.

त्या ८-९ वर्षाच्या मुलीला हा प्रश्न सुचावा ह्याचे मला आश्चर्यच वाटले. मग मी तिला तेथे गस्ट-हाऊस आहे वगैरे माहिती दिली.

असेच काहीबाही बोलणे चालले असता मी तिला विचारले, 'टुणटुण तू मोठेपणी कोण ग होणार?'


हा माझा प्रश्न ऐकताच तिचा चेहरा थोडा पडला व ती हळू आवाजात म्हणाली, 'ते सगळं बाबांच्यावर अवलंबून आहे. त्यांनी शिकवलं तर पुढलं शिक्षण.'

माझं एकदम बोलणंच थांबलं. जणू बोलण्यातला जीवच गेला.

आपण अगतिक आहोत, दुसऱ्यावर अवलंबून आहोत हे किती लहानपणापासून मुलींना कळायला लागते नाही ह्याच जागी कोणा मुलगा असता तर?

आता माझा प्रवास संपत आला होता. वरची बॅग घेतली व टुणटुणला म्हणालो, 'जातो ग, कधी तुझ्या गावी आलो तर ओळख ठेव!'

तिने हसून मान डोलावली. वाटले की उतरण्याआधी तिच्या मोठ्या बहिणीला टुणटुण फार शहाणी व हुषार मुलगी आहे, तिला खूप शिकवा असे सांगावे पण ते काही जमले नाही. त्याचा काही फायदा होणार नाही ह्याची खात्री होती म्हणूनही जमले नसेल ☐



# भाववाढीच्या छायेत येऊ घातलेला अर्थसंकल्प

अनिल शिंदे

संसदेच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाची तारीख शेवटी पक्की झाली. यावेळीही अर्थसंकल्पाचा काळ पुढे ढकलण्यात येतो किंवा काय, यावरील चर्चेवर अखेरीस पडदा पडला. गेल्यावर्षी निवडणुकाच जानेवारीत झाल्याने नव्या सरकारला स्थिरस्थावर होऊन अर्थसंकल्प मांडायला मार्च महिना उजाडला. मात्र यावेळी प्रथेप्रमाणेच फेब्रुवारीत अर्थसंकल्प येणार ही गोष्ट आता स्पष्ट झाली आहे.

अर्थसंकल्प म्हटले की, अनेक चर्चा सुरू होतात. यावेळी कशाचे भाव वाढतील ? कोणते कर वाढतील ? तूट किती राहील ? राज्याना काय फायदा होईल ? सामान्य माणसाकडे यावेळी तरी लक्ष जाईल का ? अशा अनेक प्रश्नांची चर्चा झडते. यावर्षी या चर्चेत पुन्हा एकदा अर्थसंकल्पपूर्व भाववाढीने भर घातली आहे. त्याचप्रमाणे दीर्घकालीन वित्तीय धोरणाचे मूर्त स्वरूप या अर्थसंकल्पात कसे दिसेल याचीही भर पडलेलीच आहे.

गेल्या वर्षी अर्थमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांनी अर्थसंकल्पिय भाषणात नव्या सरकारला अर्थव्यवस्थेत अमूलाग्र बदल करावयाचे आहेत, पुनर्रचनेला किमान प्रारंभ तरी करावयाचा आहे असे म्हटले होते. त्याचप्रमाणे स्व. इंदिराजींच्या एका वाक्याचा हवाला देत सिंग यांनी आर्थिक धोरण सर्व वर्गांसाठी राहील असे म्हटले होते. कोणत्याही स्तरातील – वर्गातील व्यक्तीला आपल्याकडे व आपल्या वर्गाकडे दुर्लक्ष झाले असे वाटू नये, हा सिंग यांचा प्रयत्न होता. किमान त्यांनी तरी तसा मनोदय आपल्या पहिल्या अर्थसंकल्पिय भाषणात व्यक्त केला होता. या सर्व गोष्टी १९८६–८७ च्या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने तपासायला काय हरकत आहे ?

अर्थसंकल्प तोंडावर आला असताना भाववाढ करावयाची नाही, असा एक रिवाज आपल्या देशात पाळला जात होता. तसा तो अलिखित नियमच होऊन बसला होता. पण गेल्या काही वर्षांपासून हा नियम धाब्यावर बसविण्यात आलेला आहे. राजीव गांधींच्या नव्या सरकारने तर हा नियम मोडण्याचाच जणू नियम केला आहे. जुनी प्रथा जी चांगली होती ती मोडून नवी अनिष्ट प्रथा सुरू केली आहे.

यावर्षीही केंद्र सरकारने अर्थसंकल्प महिन्यावर येऊन ठेपला असतानाच भाववाढ केली. प्रथम सामान्यातल्या सामान्य माणसाला लागणाऱ्या गव्हा – तांदळासारख्या धान्याचे भाव वाढविले, त्यानंतर फेब्रुवारी महिन्याचा 'तोहफा' म्हणून पेट्रोलियम पदार्थांच्या किमती वाढविल्या.

सर्व विरोधी पक्षानी यावेळी एकजूट दाखवित, गेल्या काही महिन्यांच्या काळानंतर दुर्मिळ झालेले असे चांगले कार्य केले. वृत्तपत्रांनीही यावर घणाघाती टीका केली. अर्थतज्ज्ञानी सरकारला धारेवर धरले. परिणामी सरकारने भाववाढ कमी करण्याचा देखावा केला. प्रथम १० पावलांची भाववाढ केली नि त्यानतर चार पावले मागे घेत ती कमी केली. पण एक गोष्ट खरी की या सरकारच्या नेहमीच्या होऊ पाहाणाऱ्या नाटकाने लोक आता फसलेले नाहीत. त्यांच्या मनात अद्यापही असतोष खदखदत आहे.

सरकार 'स्थितप्रज्ञ' आहे; काहीसे गांगरलेलेही आहे, त्यामुळे आता हे भाव आणखी कमी होतील याबाबत शंका आहे. २० फेब्रुवारीपर्यंत आपले या भाववाढीबाबतचे म्हणणे सरकारला कळवावयाचे आहे. त्याच्या आधारे पुन्हा किमतवाढीचा विचार होणे शक्य आहे. याचाच अर्थ सरकार अद्यापही आपल्या भूमिकेशी ठाम नाही. किंमतवाढ करायची म्हणूनच केली आहे, असेच उत्तर या अशा वागण्याने आपल्याला मिळते.

भारतात पोलंडसारखी अवस्था आम्हाला खरोखरच नको आहे. प्रगतीसाठी दरवर्षी काही प्रमाणात किंमतवाढ आवश्यक आहे. पण ही किंमतवाढ करताना कोणत्या वस्तूंचे भाव वाढवावेत, किती टक्के वाढवावेत, या वस्तूंच्या किंमतवाढीमुळे इतर कोणत्या किंमतीचे भाव वाढतील, त्यामुळे सर्वसाधारण किंमतवाढ तर होणार नाही ना, या सर्व गोष्टींचा विचार या किंमतवाढीच्यावेळी करावा लागणार आहे, केला पाहिजे. पोलंडने जवळजवळ २० वर्षे भाववाढ रोखली. परिणामी खर्च हाताबाहेर गेल्यावर कित्येक पटीनी भाववाढ करावी लागली. अशी स्थिती आम्हाला नको असली तरी वर उल्लेखिलेल्या गोष्टींच्या विचारानेच भाववाढ केली पाहिजे, आणि तीही अर्थसंकल्पाच्यावेळी. संसदेत त्यावर चर्चा झडली पाहिजे नि मगच ती अंमलात आणली पाहिजे. नाहीतर आता किंमतवाढ केली नि मध्यरात्रीपासून लागू केली हे चूक आहे. कारण वाढत्या किंमतीने जुना माल विकण्यास आमचे व्यापारी, डिलर्स तरबेज आहेत; पण किंमत कमी केल्यावर त्या उतरविणे त्यांच्या जीवावर येते. परवाच्या पेट्रोल दरवाढीबाबत हाच अनुभव अनेकांना आला आहे.

शिवाय सरकारची मक्तेदारी आहे म्हणून सरकारने प्रत्यक्ष किंमत वाढविणे, यामुळे राज्यांवर फार मोठ्या प्रमाणात अन्याय होत असतो. घटनेतील तरतुदीनुसार अबकारी करातील चाळीस टक्के वाटा (उत्पन्नातील) राज्याना द्यावा लागतो; पण केन्द्र जेव्हा प्रत्यक्ष किंमतवाढ करते, कर वाढवीत नाही तेव्हा मात्र राज्यांना हात चोळीत बसावे लागते. या दृष्टीने विचार करता अर्थसंकल्पपूर्व प्रत्यक्ष किंमतवाढ करणे घटनेला धरून नाही असेच म्हणावे लागते.

तशात भर म्हणून सरकारने ज्या पेट्रो-

लियम पदार्थांच्या किंमती वाढविल्या आहेत, त्यामुळे सर्वसाधारण किंमतवाढ अटळ आहे. कारण यामुळे वाहतुकीचे दर वाढतात परिणामी प्रत्येक वस्तूची वाहतूक निरपेक्षपणे महागते. रेल्वेही भाववाढीच्या प्रयत्नात असल्याचे वृत्त मध्यतरी वाचावयास मिळाले. त्यामुळे एकूणच भाववाढ होणे अटळ आहे

मध्यतरी पेट्रोलियम खाते नव्यानेच साभाळावयास प्रारभ केलेले चद्रशेखर सिंग पुण्यात आले होते. ते पुण्यात आले त्याच्या अदल्याच रात्री भाववाढ झाली होती त्याना याबाबतचे कारण विचारता त्यानी राजीव गाधीच्याच शात चित्ताचा वापर करीत 'पेट्रोलियम पदार्थांचा वापर कमी झाला पाहिजे. यासाठीच ही भाववाढ आहे.' असे समर्थन केले.

किती हुशार आहे आपले सरकार नाही ? आता तर ते लहान मुलाप्रमाणे 'निरागस' ही वाटू लागले आहे. एकीकडे हे सरकार दुचाकी, चारचाकी वाहनाचे उत्पादन वाढविण्यासाठी धडाधड परवाने देते आणि दुसरीकडे लगेच ही वाहने प्रत्यक्ष धावतात न धावतात तर सरकारला पेट्रोल व्ययाचा विचार सुचतो जणू वर्षापूर्वी याच सरकारला पेट्रोलचा अमर्याद साठा सापडला होता ! मुळातच अतिरिक्त उत्पादन होऊन आज ना उद्या या वाहन उद्योगात मदी येणारच आहे, व्यापारी वहानाबाबत तर ती यापूर्वीच येऊन दाखल झाली आहे तशात ही भाववाढ मग काय मदीत भरच थोडक्यात सरकार स्वत च निर्माण केलेल्या दुष्टचक्रात अडकले आहे.

याशिवाय या भाववाढीने सामान्य व स्थिर उत्पन्न गटातील लोकाना एक जबरदस्त तडाखा दिला आहे. दारिद्र्यरेषेने आता आणखी बऱ्याच लोकाना आपल्यात सामावून घेतले आहे.

आता सरकारने यावर विचारार्थ सूचना मागविल्या आहेत. त्या आल्यावर या निरागस सरकारवर ही भाववाढ पूर्णतः मागे घेण्याची नामुष्की ओढविली नाही म्हणजे झाले. असो, या भाववाढीची छाया येत्या अर्थसकल्पावर पडणार यात मात्र शका नाही. यामुळेच या एकाच मुद्द्याचा प्रथमत विस्ताराने विचार केला आहे.

भाववाढ ही गोष्ट चुकीची, एवढा बालीश पवित्रा घेण्याचे आपल्याला कारण नाही. सरकार अनेक गोष्टींना सबसिडी देते. राजीवजीच्या म्हणण्यानुसार तर या सबसिडीमुळेच आर्थिक विकास रोखला जात आहे सातव्या पचवार्षिक योजना काळात सरकारला ३० ते ४० हजार कोटी रु चो तूट भरून काढायची आहे. कारण सार्व. क्षेत्रासाठी तरतूद करण्यात आलेल्या १ लाख ८० हजार कोटी रु ची रक्कम उभी करण्यासाठी तेवढे पैसे कमी पडत आहेत. त्यात भर म्हणून सरकारने वस्तुनिष्ठतेचे धोरण स्वीकारून आयकर (व्यक्तिगत) पाच वर्षे स्थिर ठेवला. गेल्या वर्षीपासून आयकराचा कमाल दरही ५० टक्क्यावर आणला. स्लॅब कमी केल्या, त्यामुळे त्या उत्पन्न मार्गावरही मर्यादा आलेल्या आहे. त्यातूनही सरकारने २५ टक्के उत्पन्न अधिक मिळविले ही खरेच प्रशसेची बाब आहे. पण तरीही ही वाढ काही ३० हजार कोटीची अपेक्षित तूट भरून काढण्यासाठी पुरेशी नाही दरवर्षी सात ते आठ हजार कोटी रु सरकारला भरून काढावयाचे आहेत. तसे केले तरच हा पैसा सरकारला भरून काढता येईल

याला एक उपाय म्हणून सरकारने भाववाढ केली. यामुळे अनेक वस्तचे भाव वाढून सरकारचे उत्पन्न वाढेल; पण या भाववाढीत आणखी भर पडणे शक्य आहे पेट्रोल, डिझेल भाव वाढले की, सर्वसाधारणपणे रेल्वेचे दरही वाढविले जातात दोन्हीकडे सरकारीच राज्य असल्याने खुष्कीची वाहतूक व लोहमार्गाची वाहतूक यात पर्याय निर्माण होऊ नये यासाठी ही तरतूद असते.

याशिवाय प्रत्यक्ष करापेक्षा अप्रत्यक्ष करावर लक्ष केंद्रित करण्याचे सरकारी धोरण असल्याने भाववाढीत भर पडणार आहे. उत्पादन शुल्क किंवा अबकारी कराची फेररचना करण्याची घोषणा डिसेंबर महिन्यात जाहीर करण्यात आलेल्या दीर्घकालीन वित्तीय धोरणातच करण्यात आली आहे व्हॅल्यू ॲडेड टॅक्स वा मूल्याधिष्ठित कराचाही सरकार विचार करीत आहे त्याचप्रमाणे या करातर्गत येणाऱ्या वस्तूची गटवारीही सुधारण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे त्यामुळेच सिगारेट, मद्य या नेहमीच्या वस्तूप्रमाणेच आणखी काही वस्तूच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

टीव्ही, रेडिओ सचाचे परवाना शुल्क रद्द करण्यात आलेले असले तरी सरकार त्याऐवजी गेलेले उत्पन्न कोणत्या मार्गाने मिळवावयाचे याच्या विचारात असणारच. टीव्हीच्या जाहिराती सरकारला उत्पन्न मिळवून देत आहेतच त्यामुळेच बातम्या, समाचार, न्यूज हे कार्यक्रमही 'पुरस्कृत' करण्यात येत आहेत अर्थात सरकारच स्वत च प्रचार माध्यमही हेच आहे त्यामुळेच त्यावर कर लादताना सरकार बराच विचार करून पाऊल उचलेल एवढे निश्चितपणे म्हणता येईल.

## तूट घटेल का ?

एखाद्या व्यक्तीचे बजेट जेव्हा ती व्यक्ती स्वत. आखते तेव्हा ती आपल्या उत्पन्नाच्या पाघरुणाचा विचार करीत मगच खर्चाचे पाय पसरते. भविष्यकाळात जर त्या व्यक्तीला आपले उत्पन्न इतके वाढेल असे वाटते, तेव्हा ती गरज पडता सध्या कर्ज काढूनही ती गरज भागवते सरकारचे असे नसते सरकारला विकास व कल्याण ही दोन उद्दिष्टे साध्य करायची असतात. त्यामुळे अनेक वेळा भारतात तर जवळजवळ प्रत्येक वेळा तुटीचे अदाजपत्रक आखले जाते. दाखविलेली तूट त्या वर्षातील उत्पादनवाढीने भरून काढली जाईल हे त्यामागचे गृहित असते. पण तसे ते वाढले नाही की, मग केवळ पैसा अर्थव्यवस्थेत शिरतो आणि फक्त मागणी वाढते. परिणाम भाववाढीत होतो

चालू अर्थसकल्पात (१९८५–८६) ३६६० कोटी रु. ची तूट दाखविण्यात आली होती. सरकारने कार्यक्षमतेने कर सकलन करून, धाडी घालून आपले उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला. प्रपगी खुल्या बाजारात पैसा उभारण्याचा प्रयत्न केला, परंतु साडे तीन हजार कोटी रु. ची ही तूट सरकार भरून काढू शकेल असे सध्या तरी वाटत नाही

तशात भर म्हणून सरकारचा विकासेतर खर्च वाढला, तर दुसऱ्या बाजूला आंतरराष्ट्रीय कर्जाचे प्रमाण वाढले. त्यामुळे आपला अधिकतर पैसा हा या उत्पादन न वाढविणाऱ्या बाबीवर खर्च होत आहे. परिणामी ही तूट वाढणार आहे. परकीय चलनाच्या गंगाजळीवरही आता विलक्षण

ताण पडलेला दिसून येईल. नव्या तंत्राच्या वापराचा ह्र्यास हे त्यामागचे प्रमुख कारण राहील.

पंजाबातील संघर्षामुळे तेथील उत्पादनावर विशेषत: शेती उत्पादनावर परिणाम होणे शक्य आहे त्यामुळे पुन्हा एकदा भाववाढीलाच चालना मिळण्याची शक्यता आहे.

बचतीतून तूट भरून काढावी असा विचार केला, तर गेल्या वर्षी बचतीचा दरही कमी झाल्याचे दिसत आहे. एकेकाळी विकसित देशात नव्हता इतका दर म्हणजे २२ टक्के ( निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाचा ) दर देशांतर्गत बचतीचा होता. तो १९८५ मध्ये १६.४ टक्क्यापर्यंत घसरला आहे. १९८०–८१ मध्ये हा दर १७.६ टक्के होता याउलट गुतवणुकीचा दर हा घसरलेला असला तरी बचतीपेक्षा अधिक आहे. तो १७.७ टक्के आहे. यामुळेही तूट वाढणार अशीच शक्यता वाटते

सरकारला याची जाणीव आहे की नाही याबद्दलच शंका यावी, असे एक पाऊल सरकारने उचलले व ते म्हणजे परदेशस्थ भारतीयाच्या गुतवणुकीवर जो व्याज दर दिला जायचा तो सरकारने कमी केला. शिवाय सरकारने जी नवी ठेव योजना सुरू करण्याचे दीर्घकालीन वित्तीय योजनेत म्हटले आहे त्या योजनेचा व्याजदर फारच कमी आहे अशी एकजात सर्वांनी ओरड केली आहे त्यामुळे सरकारला एक तर हा दर वाढवावा लागेल अन्यथा अर्थसंकल्पात तुटीला तोड द्यावे लागेल. डिसेंबरपर्यंतच्या वर्षांत पैशाचा हा पुरवठा १७ टक्क्याने वाढला आहे.

थोडक्यात, जरी आपली परकीय

# अर्थसंकल्प कसा असेल ? तीन मुलाखती

## मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे डॉ. श्री. भा. र. साबडे

अर्थमंत्री विश्वनाथ प्रताप सिंग यानी गेल्यावर्षी दिलेली बरीच वचने पाळली. दीर्घ कालीन वित्तीय योजना हे त्याचे एक उदाहरण देता येईल सार्वजनिक क्षेत्रावर होणारा (उद्योग) खर्च कमी केला व खाजगी क्षेत्राची व्याप्ती वाढविली तर औद्योगिक क्षेत्रात अमुलाग्र बदल होऊ शकतील.

येत्या अर्थसंकल्पात प्रत्यक्ष कर दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न राहील, तर अप्रत्यक्ष करात वाढ होण्याची शक्यता आहे. विशेषत: अबकारी करात (किंवा उत्पादन शुल्क) वस्तूंचे वेगळे वर्गीकरण लवकरच जाहीर होईल त्यावेळी या अप्रत्यक्ष करातील वाढ स्पष्ट होईल

अर्थसंकल्पापूर्वी केली जाणारी भाववाढ ही चीड आणणारी गोष्ट आहे एकीकडे सरकार अधिक पेट्रोल उपभोग वाढविणाऱ्या मोठ्या मोटारीचे उत्पादन करावयास परवानगी देते तर दुसरीकडे पेट्रोल किंमतीत भाववाढ करते. हा विरोधाभास न समजणारा आहे.

आपल्या देशातली औद्योगिक रचना, किंवा चौकट तशी चागलीच आहे. त्या रचनेत यावेळी फारसे बदल केले जाणार नाही. जुजबी सुधारणा मात्र करण्यात येईल

देशातील औद्योगिक वातावरण काहीसे उदास आहे; निरुत्साही आहे. सरकारने उद्योजकांवर घातलेल्या धाडी हे याच प्रमुख कारण आहे. सरकार व उद्योग क्षेत्र हे परस्पराचे मित्र आहेत. परस्पराच्या विश्वासानेच दोहोचे काम चालते सध्या सरकारची धोरणे, कायदे हे इतके विचित्र आहेत की कित्येक बदल लक्षातही येत नाहीत. अनेक गोष्टी तर सरकारच्याच अधिकाऱ्याना ठाऊक नसतात. सरकार आता धाडी घालते आहे. त्यामुळे सरकारबद्दलच्या विश्वासाला तडा जात आहे.

¤

## ' महाराष्ट्र एजन्सी '–चालक

या टी. व्ही.च्या अग्रगण्य डीलर संस्थेच्या चालकानी म्हटले की–

सध्या ' आमच्या ' वस्तूच्या किंमती उतरण्याची प्रक्रिया चालू आहे. ती चालू राहील की नाही हे काही सागता येत नाही. मात्र किंमती वाढण्याची शक्यता फारच कमी आहे.

पूर्वी बजेट आले की लोक धावपळ करून खरेदी आटोपून टाकीत असत ही प्रवृत्ती आता कमी झाली आहे.

पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती वाढविल्याने वाहतूक खर्च वाढेल पण एकूण खर्चात त्याचे प्रमाण फार नसल्याने त्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स वस्तूचे भाव फारसे वाढणार नाहीत.

¤

## श्रीमती नातू : एक महिला उद्योजक

या अर्थसकल्पाच्यावेळी करवाढ नक्कीच होणार मात्र प्रत्यक्ष कर लगेच डोळ्यात भरतात म्हणून त्याचे दर न वाढवता अप्रत्यक्ष करामध्ये वाढ केली जाईल.

सरकारला आपला महसूल वाढवायचा आहे त्यामुळे जास्तीत जास्त पैसे कसे मिळतील याकडे कल असेल त्यामुळे जीवनावश्यक वस्तुवरही कर लादले जातील, आहेत ते वाढविले जातील. कारण त्यापासून अधिक उत्पन्न मिळेल जुनी वसुली करण्याचे सरकारचे धोरण ठीक नाही, कारण त्यामुळे जुने १०–१० वर्षापूर्वीचे हिशोब सादर करावे लागतील. सरकारने नवे कर लादताना प्रामाणिकपणा ठेवून ते लादावेत.

सरकारचे करविषयक धोरण चागले आहे; पण त्याबाबत अमलबजावणी करताना जो अन्वय लावला जातो तो चुकीचा असतो. वेगवेगळे अधिकारी वेगवेगळा अर्थ लावीत आहेत. त्यामुळे एकूण कर धोरणाबाबत उद्योजकाच्या मनात एक अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळेच नवे उद्योजक नवा व्यवसाय सुरू करताना ' दोनदा ' विचार करीत आहे

पेट्रोलियम पदार्थांची भाववाढ का झाली त्याचे कारण समजत नाही त्यामुळेच एकूणच वाहतूक महागेल व सर्वच गोष्टीच्या किंमतीवर परिणाम होईल. वास्तविक जागतिक बाजारपेठेत पेट्रोलियमच्या किंमती कम च होत आहेत.

व्हॅल्यू ॲडेड ही कर पद्धत चागली असून ती प्रत्यक्ष राबविली जावी.

औद्योगिक करविषयक धोरण तीन वर्षाचे असावे कारण उद्योगधद्याचे नियोजन दीर्घकालीन असते.

सर्व राज्यात एकच करपद्धत अवलंबिली जावी आम्ही आमच्या उत्पादनांवर सर्व कर घेऊन असे छापतो ते विक्रेत्याना पसंत नाही. त्याना मनमानी नफा त्यामुळे मिळवता येत नाही. सध्या आम्ही नवीन उत्पादन बाजारात आणत आहोत तेव्हा त्यावर विपरीत परिणाम करणारे हे अंदाजपत्रक असू नये हीच इच्छा

यावेळी इलेक्ट्रॉनिक्स वस्तुचे भाववाढीस भरपूर शक्यता आहे. त्याचा वापर वाढतच राहणार.

¤

चलनाची गंगाजळी, भांडवली प्रवाह व परदेशस्थ भारतीयांचे पैसे यामुळे २९.८ टक्क्याने वाढलेली दिसत असली तरी आपल्या आयात-निर्यात व्यवहारात ७४० कोटी रु. ची वाढ केवळ ऑगस्टपर्यंतच होती. याचे कारण आपली आयात २८.३ टक्क्याने वाढली तर निर्यात ४.४ टक्क्याने घटलीच आहे यावरून या अर्थसंकल्पात तूट वाढलेलीच दिसेल असा अंदाज बाधता येतो. अर्थात शेवटी प्रत्यक्षात ती किती दाखवायची हा प्रश्न वेगळा. जर ती आज कमी दाखविली तर वर्षात मध्यंतरी केव्हा तरी भाववाढ अटळ आहेच. ही भाववाढ यावर्षी चार ते पाच टक्क्याने होईल. पुढच्या वर्षीचा दर इतक्यात सांगता येणे कठीण आहे.

राजीवजींच्या भारताची २१ व्या शतकाकडे होणारी वाटचाल एक वर्षाने कमी झाली आहे त्यावेळी होणाऱ्या जवळजवळ एक अब्ज लोकसंख्येसाठी आपल्याला उत्पादनात अमुलाग्र-लक्षणीय वाढ केली पाहिजे. शेती उत्पादनच २३५ द. ल टन होणे आवश्यक आहे. १९८३-८४ ला हे उत्पादन १५१ द. ल. टनापर्यंत पोहोचले होते. यावर्षी ते त्याहूनही कमीच असेल. म्हणजेच केवळ २१ व्या शतकाची भाषा केल्याने आपण खऱ्या अर्थाने त्या युगात पोहोचणार नाही, त्यासाठी वास्तव प्रयत्न हवेच आहेत. एकेक वर्ष असं सरत आहे प्रत्येक अर्थसंकल्प हा पुढच्या दीर्घकालीन योजनाचा आधारस्तंभ व्हायला हवा, पण सततचो भाववाढ व पुन्हा चलनवाढ या फेऱ्यात सापडल्याने हे स्तंभ ठिसूळ होतील. त्यामुळे २१ व्या शतकातील अर्थव्यवस्थेचे कल्पना मंदीर कधी कोसळेल याचा मुळीच नेम नाही.

□

---

# वेशीबाहेरचे एक पान

तो नाताळाचा दिवस. क्रूसाच्या घरासमोर तो आला. खमंग वास येत होता. रिकाम पोट भडभडून आलं वाढतील घासभर. आग इजल. खिरस्ताव व्हाव उपासमार थाबल. चार घास सुखाच मिळनील. आता हे कामाच वय नव्ह. कोण काम सागत नाही. सांगितलं तर हातनं काम होत नाही पोट आग इझलं. पण बायकू ? येडचाप हाय,,खिरसताव वको म्हणती. 'पोटाला धतूरा घालू पण ते नग.' त्याचं पाय मुरगळल्यागत झाल. तो फिरला.

साऱ्याला गार वारा सुटला होता. घरातनं रामा उठला. हरिजन वाड्यातल्या समाजमंदिरासमोर आला. पोटात काय कोंबायचं ? पैशाला काय करायच ? मंदिराच्या पायरीवर बूड टेकवल. समोर पोरं खेळत होती. डाव रंगात आला होता. रामा इचारात वळवळत होता. पोटानं पेट घेतला होता.

दोन दिस चुलीत पाणी पडल्यागत. पोटानं पाणी तरी किती दिवस प्यायचं ? आतडी चेपल्याली. भूख मेल्याली, पोट पेटल्यालं तरी बी त्यो जित्ता होता. नजर कारी होती. समोर बघितल. क्रूस लावलेलं घर होतं. लाईटनं चमकत होतं. घराला घरपण दिसत होतं.

आपल्या म्हारकीत एवढं एकच घर. बाकीची बेघर. खिरसतावांनी त्याला घर बांधून दिल. पैका दिला. नोकरी दिली. बायकूबी दिली. आमच्या म्हारवाड्यात या घराला किमत नाह्य. वाळीत टाकलय. 'च्या आईला, गावानं डूयानं-डूया आम्हाला म्हारकीत टाकलंय, ववाळून टाकल्यासारख. आणि आम्ही या घराला वाळीत टाकलय.' तो हसला. आम्ही किती केलं तरी वेशीबाहेरची आमच्यापैकी त्यो एक. त्यानं गळ्यात कूरस बाधला म्हणून तुमचं नरडं का आवळतय ? आमच बाप वेशीबाहेर पण खरा बाप वेशीच्या आत या इचारानं नरडं का आवळत नाही? सारा एळकोट हाय सारं लबाड हाय., उकरंडा हाय ह्यो उकरडा

दोन दिस असच गेल. पोट जेरीला आल मन मेल. धर्म बुडाला. आज आईतवार मिरजसन खिरस्ताव येत्यात त्यासनी भेटायच कुरस बाधायचा. पाया पडायच पण बांधा म्हणायचं. खमग खायचं. राहायचं. म्हारवाड्यातन वायलं वाह्यचं. सारी बोबलतील. शिमगा एक दिसाचा. आता तरी कोण इचारतोय जेवलास का म्हणून ? भाऊबंद गेलं उडत. मला पोर का बाळ ? कोणच नाही. बायकूची बायकू. माझा मी. सपलं. आज बाटायच. जन्मान बाटकच हाय की. म्हणजे बाटायचं नवं नाय.

दुपार टळली. म्हारवाड्यात जीप आली. थाबली. तसा रामा उठला. डोक्यात किडं. पाय मोळ मारल्यासारख झाल पायाला नेट लावला. पाय उचलला. दगडासारखा.

दोन-तीन झगंवाल- खिरस्तावाच्या अगणात उभ होतं. हसत-कायतरी बोलत. रामा पुढं झाला. शब्द आटल. एकाच पाय धरलं. त्यानी त्याला उराशी कवटाळलं. शब्द फुटलं 'मला खिरस्ताव व्हायचं.' सारे शात होते. रामाचा कठ फुटला- हुंदका दाटला. 'मी उपाशी हाय- क्रूस बांधा- पण पोटाला द्या.'

एकटा म्हणाला 'ऑल राईट.'

सारे खुर्चीवर बसले. रामानं कोपऱ्याचा आधार घेतला त्यानी त्याला उठवला. खुर्ची दिली. रामा मड्यासारखा त्यात बसला. पुढं टेबल होतं. एकेक डीश् यायला लागली. सारं टेबल भरल. रामाला वाटल सगळं घ्याव धोतराच्या सोग्यात. पण त्याच मेल्यालं मन लाजल. खायची तयारी झाली रामानं डीश् पुढ ओढली ब्रेड स्लाईसचा गोळा केला. तोंड उघडलं. गोळा तोडात टाकणार तोच 'आरं झग्यावाल्यानो माझ्या दाल्याला बाटवू नगा.' असं म्हणत ती रामाच्या अंगावर आली. हातातला गोळा उडवला. गुरासारख मारत लोढण्यासारख घरात आणून टाकलं. तिचं तोंड गटारीसारखं फुटल. रामात राम नव्हता. गटारीतलं पाणी मुरलं.

साज फुलली. रामाची बायको उठली. दुपारी देशमुखाच्यातनं आणल्याल्या भोपळ्याच्या फोडी चिरली. चूल पेटली. फोडी शिजाय लागल्या. तिलाबी पाण्यावर जगून चार दिस झाल्यालं होत.


कुडाजवळच्या चुलीत भोपळ्याच्या फोडी शिजत होत्या. रामाच मन उकळाय लागलं होतं. बायकू धुपत होती. धुपता-धुपता वाटत होत, 'माझा दाल्ला पोटासाठी बाटतोय. काय करल ? उपाशी किती दिस जगल ? पण त्याला बाटू द्यायचा नाय, भिक मागायची, चोरी करायची पण उपाशी ठेवू द्यायच नाही. तिला रडू आल. उकळी फुटली. फोडी शिजल्या.

भाड खाली उतरवलं. दोन थरड्या घेतल्या. दाल्याजवळ गेली 'चला, काय तरी पोटात ढकलून घ्या.' रडून वाकळ भिजल्याली. तो कसा तरी उठला. थरड्यात फोडी पडल्या. दोघाच्या थरड्या .. बघत्यात तर भोपळ्याच्या फोडी हिरव्यागार. बायकोनं दोनी थरड्या बाहेर फेकून दिल्या आणि ती पळत सुटली. समोर क्रूस दिसत होता... डीशचा वास दरवळत होता.

—बापू जाधव

किर्लोस्करवाडी

# व्यक्ती शिक्षक समाजशिक्षक



# डॉ. सहस्रबुद्धे

● स. ह. देशपांडे ●

पाषाणा, उत गर्दभा, उत महा-
    -शङ्खा, वृषाः, सैरिभाः
'खुं' 'खु'-कृत्य यदास्थ नस्तदखिलं
    स्मो नाम सर्वे वयम्।
यत्तु त्वत्पुरतोऽपि निर्भयतया
    तत्त्वं न मुञ्चामहे
यद्दुःखे च सुखे च नः सुहृदभूः
    तेनाधमर्णा वयम्॥

—कृ. श्री. अर्जुनवाडकर

## १ : शाळेतल्या आठवणी

डॉक्टरांचा पहिला परिचय झाला तो शाळेच्या नियतकालिकातील त्यांच्या फोटोवरून. ही गोष्ट १९३९ सालची, मी इंग्रजी चवथीत ( म्हणजे आताच्या हिशेबाने आठवीत ) असतानाची. मराठीचे पहिले पी. एच्‌डी. म्हणून शाळेनं तो मोठ्या कौतुकानं छापलेला होता. पस्तिशीच्या सुमाराच्या एका तरुण विद्वानाचा तो फोटो रुंद कपाळ, गोलसर चेहरा आणि आत्मविश्वासयुक्त नजर ह्यामुळे पाहणाऱ्याच्या मनात कायम रुतून बसावा असा होता. ह्या फोटोतसुद्धा डॉक्टरांचं म्हणून एक वैशिष्टय होतंच. त्या काळात सदऱ्याची 'पोलो' कॉलर फॅशनेबल होती, आणि ती कोटाच्या कॉलरच्या वर घेण्याची पद्धत असे. डॉक्टरांच्या शर्टची पोलो कॉलर मात्र कोटाखाली नीटपणे दुमडलेली असे. ( त्यामुळं आमच्या शाळेतली वरच्या वर्गातली मुलही असंच करीत ) आपलं काही वैशिष्टच असलं पाहिजे ह्या इच्छेनं ते असं करीत असावेत असं एखाद्याला वाटणं शक्य आहे. पण माझ्या पुढं लक्षात असं आलं की, डॉक्टरांना आपल्या देहाचं कसलंच अलंकरण करणं अप्रिय होतं. त्यांची ही विशिष्ट लकब हे त्यांच्या नितांत साधेपणाचं गमक होय.

इंग्रजी चवथ्या इयत्तेत नू. म. वि. मध्ये मी नवीनच आलेलो होतो. डॉक्टरांना मी पाहिलेलं नव्हतं तरी त्यांचा प्रभाव मात्र अदृश्यपणे शाळाभर जाणवत असे. खरं म्हणजे आमचे प्राचार्य नारळकर हे शरीरत: तसंच कर्तृत्वानं फार उंचीचे गृहस्थ होते. शिवाय निरनिराळ्या निमित्तांनी ते सर्वांसमोर अनेकदा असत. तसं डॉक्टरांचं नव्हतं तरीही त्यांच्या कीर्तीचा दबदबा सर्वत्र पसरलेला असे. डॉक्टर केवळ मॅट्रिकच्या वर्गाला, पण त्या वेळच्या सातही तुकड्यांना शिकवीत. आपले पाल्य मॅट्रिकपर्यंत जाण्यात पालकांचा उद्देश काय असेल तो असो; पण त्या पाल्यांच्या मनात तरी तेथपर्यंत गेल्यावर डॉक्टरांचे तास ऐकायला मिळतील अशी उत्सुकता शिगोशीग दाटून भरलेली असे.

माझी अगदी पहिली आठवण डॉक्टरांच्या स्वभावातील एका मजेदार विसंगतीवर प्रकाश टाकणारी आहे.

चवथीच्या वार्षिक परीक्षेत मराठीच्या प्रश्नपत्रिकेत 'काल, आज,

उद्या' असा एक विषय निबंधासाठी दिलेला होता. माझे मराठीचे शिक्षक श्री. (पुढे प्रा.) रा. ना. गद्रे ह्याना माझा निबध इतका आवडला की शिक्षकांच्या आरामगृहात डॉक्टराना त्यानी तो वाचून दाखविला. त्यावर डॉक्टर निहायत खूष झाले व त्यानी त्याला पाच रुपयाचं बक्षीस जाहीर केल. 'विसंगती' असं म्हणायच कारण हे की हा माझा निबध डॉक्टरांच्या मला पुढ अनुभवाला आलेल्या चौकटीत अजिबात बसण्यासारखा नव्हता तो वैयक्तिक स्वप्न रंगविणारा आणि काहीसा 'उत्स्फूर्त' अशा प्रकारचा होता उत्स्फूर्तपणाला डॉक्टराच्या एकूण विचारसरणीत व विशेषत: त्याच्या निबधशास्त्रात खरं तर मज्जावच होता. तरीही माझ्या निबधाला त्यानी सहजस्फूर्तीन दाद द्यावी ही गोष्ट मला आज गमतीची वाटते

पुढं सबंध आला तो सहावीच्या वर्गात. पॉल म्युनीन काम केलेला 'लुई पॅस्टर' हा सिनेमा कॅपमधील एका थिएटरात चालू होता. इंग्रजी सिनेमा ही तोपर्यंत अपरिचित गोष्ट होती. डॉक्टर आमच्या वर्गाला शिकवीत नव्हते; पण ते आम्हाला सिनेमा बघायला घेऊन जाणार आहेत, असा आदेश एक दिवस आला आणि आम्हाला विलक्षण आश्चर्य वाटलं आणि हर्ष झाला. नुसताच सिनेमा बघण हा कार्यक्रम नव्हता. आदल्या दिवशी शाळा सुटल्यावर सर्व मुलाना एकत्र घेऊन डॉक्टरानी त्या शास्त्रज्ञाची जीवनकहाणी समजावून सागितली. पॉल म्युनीच्या अभिनयकलेचं विश्लेषण केल. हिंदी–मराठी सिनेमावर जाता जाता खरमरीत टीका केली आणि मग दुसऱ्या दिवशी चाळीस मुलाना बरोबर घेऊन त्यानी सिनेमा पाहिला. आम्ही सगळे आनदान आणि अभिमानानं फुलून गेलो.

नियमित संबध आला तो सातवीच्या म्हणजे मॅट्रिकच्या वर्गात. सहावीची परीक्षा बरीच लौकर घेऊन उन्हाळ्याच्या सुट्टीच्या अगोदरच सुमारे महिनाभर मॅट्रिकचे वर्ग सुरू करण्याची नारळकराची पद्धत होती. ह्या वेळी पाठ्यपुस्तकाचे वेचे जाहीर झालेले नसत. ह्या अडचणीवर डॉक्टर कल्पकतेन मात करीत, ती अशी की ते फक्त 'निबध' हा विषय शिकवीत. ह्या विषयाच परीक्षेतील आणि डॉक्टराच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनातील स्थान इतकं महत्त्वाच असे की वेळ उरत तर नसेच; पण महिना कुठच्या कुठं उडून जाई.

डॉक्टरांच्या पहिल्या तासाला इतराप्रमाणे आणि ह्या वर्गातल्या आजपर्यंतच्या अनेक मागच्या पिढ्याप्रमाण मीही अधीर होतो. अशी पराकोटीची अधीरता व उत्कंठा जेव्हा मनात असते तेव्हा अपेक्षेला शंभर टक्के उतरेल अस कधीच घडत नाही, हा त्यानतर जीवनात अनेकदा आलेला अनुभव. पण त्या दिवशी तस काही झालं नाही. उलट इतकं माप पदरात पडलं की ते ओसंडून वाहू लागलं.

हा अनुभव जवळजवळ पूर्णपणान बौद्धिक असूनही मादक होता. आमच्या कोवळ्या मेंदूमध्ये अपरिचित झिणझिण्या उत्पन्न करणारी ती एक बौद्धिक वारुणीच होती. शिकवणं असही असतं, असू शकतं, त्याचा नवाच प्रत्यय आम्हाला येत होता. मुळात विषय इतका साधा की निबध ही एक जाणीवपूर्वक केलेली रचना असते, तिला काही प्रारंभ असतो आणि शेवट असतो आणि दोन्हीना जोडणारा काही युक्तिवाद असतो, हा युक्तिवाद करताना पूर्वपक्ष आणि त्याची प्रमाण द्यावी लागतात, पूर्वपक्षाचं खडन करून उत्तरपक्ष मंडनपूर्वक माडावा लागतो परिच्छेदव्यवस्था मुद्द्याना अनुसरून असावी लागते. उपसहारात सर्व युक्तिवादाचा थोडक्यात साराश सागायचा असतो– इत्यादी. हा त्या भाषणाचा सागाडा. पण त्यावर अनेक उदाहरणातून त्यानी मासमज्जा चढविली, अवयव फुलविले, त्यात प्राण चेतविला आणि म्हणता म्हणता या सागाड्याचा एक कातिमान्, जिवत देहच जणू काही एखाद्या कुशल मूर्तिकाराप्रमाण तयार करून त्यानी आमच्या हाती दिला. शिवाय डोळ्यासमोर एक घाटदार निबध घडलाही. तो घडवीत असताना 'रचना' ह्या सकल्पनेत अभिप्रेत असणारा, जीवन व्यापून टाकणारा आशय त्यानी उघड करून दाखविला. निबध ही एक नियोजित वस्तू असल्यामुळे कोणत्याही गोष्टीचा तपशिलात जाऊन पूर्वविचार करण्याची शिस्त त्यामुळं मनाला कशी लागते हे स्पष्ट केल. अवतीभोवतीच्या व्यवहारातल्या अजागळपणाची हास्यस्फोट करणारी अनत उदाहरण दिली. रचनाशून्यता आणि नियोजनशून्यता भारतीयांच्या नसानसातून कशी भरली आहे, आणि ती पुरातन निवृत्तीवादात कशी अंतर्भूत आहे ह्याचा जुन्या वाङ्मयामधल्या वचनामधून प्रत्यय दिला आणि मूळ विचारबीजाचा परिपोष करीत करीत त्याच्या वृक्षाच्या शाखा आणि पारब्या राष्ट्ररचनेच्या आधुनिक सकल्पनेला गवसणी घालण्याइतक्या दूरवर विस्तारीत नेल्या. चॅपमनन अनुवादित केलेला होमर वाचून ('On first Looking in to Chapman's Homer' आपल्याला काय वाटलं हे कीट्सन सागितलं आहे.

I felt like a watcher of the skies
When a new star swims into its Ken.

'आपण आकाशाकड पाहात असावं आणि अचानकच एक नवा तारा आपल्या डोळ्यासमोर उगवावा, त्यावेळी जशी स्थिती होईल तशीच माझी झाली.' आमची स्थितीसुद्धा जवळजवळ अशीच झाली. शेवटी रचनेचं एक उदाहरण म्हणून शेक्सपिअरच्या 'ज्यूलियस

---

माणूस १९८४ दिवाळी अंकात डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे ह्यांच्या समाज विचारविषयक समग्र लेखनाचा परामर्श घेणारा डॉ. स. ह. देशपांडे यांचा लेख प्रसिद्ध झाला होता. पण 'शिक्षक' म्हणून डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे जे कार्य आहे–होते त्याचा विचार त्या लेखात नव्हता. तो एक त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा पैलू होता. या पैलूवर लक्ष केंद्रित करणारा हा लेख– डॉक्टरांच्या प्रथम वार्षिक स्मृतीदिनानिमित्त–

गेल्या ४ मार्चला (१९८५) वयाच्या ८१ व्या वर्षी डॉक्टरांचे निधन झाले.

---

सीझर' नाटकातलं अँटनीचं सुप्रसिद्ध भाषण त्यांनी यथासांग सादर केलं. त्यातल 'ब्रूटस ईज अॅन ऑनरेबल मॅन' हे पुनः पुन्हा आवृत्त होणारं वाक्य वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळ्या सूक्ष्म व्यंजना घेऊन कसं अवतीर्ण होत ते यथोचित मुद्राभिनय, आवाजातील खटके आणि आविर्भाव यांच्यासहित बारकाईनं त्यानी विशद केलं आणि स्वप्नातून जाग आणणारी घंटा खणाणली.

आम्ही तेव्हा लहान होतो हे खरं. आपल्या बालपणातल्या आठवणी आपल्याला विशेष प्रिय असतात हेही खरं. पण तरीही तो अनुभव अगदी अतीताच्या सदृश, कमालीचा उल्हासकारक होता असं आज वाटतं हेही खरच. नंतरच्या काळात इतर विद्यार्थ्यांच्या इतर शिक्षकांविषयीच्या अनेक आठवणी ऐकल्या; पण आम्हाला त्या दिवशी जो थरार वाटला तो त्याना कधी अनुभवायला मिळाला असेल असं वाटलं नाही. शाळेतून बाहेर पडून बरीच वर्षं झालेला माझा मुलगा परवा त्याच्या एका शिक्षकांविषयी फार मनोभावे बोलत होता व ते मराठी काव्य किती रंगवून शिकवीत हे स्वत. बेभान होऊन सांगत होता. मात्र त्याच बोलण ऐकत असताना एका बाजूला असे शिक्षक अजूनही आहेत ह्याबद्दलचा गहिवर मनाशी दाटत असतानाच दुसऱ्या बाजूला, 'अरे ह्यानं काय गाहिलं आहे!' असा गुप्त विचार माझ्या मनात चालला होता.

ही झाली डॉक्टराच्या निरूपणाची पद्धती. पण विद्यार्थ्यांकडून अभ्यास कसा करवून घ्यायचा ह्या बाबतीतही त्यांनी हरतऱ्हेचा विचार केलेला असे. कल्पकतेनं ते नवीन आणि परिणामकारक तंत्र शोधून काढीत. त्यांची एकदोन उदाहरणं देण्यासारखी आहेत. गृहपाठ सर्वच शिक्षक देतात; पण डॉक्टर देत असलेल्या गृहपाठाची पद्धत काही वेगळी, म्हणजे उलटयाच टोकाची होती. प्रश्नाची उत्तरं लिहून आणायला सांगण्याऐवजी ते शिकविलेल्या धड्यावर चार-पाच प्रश्न काढून आणायला सांगत. ह्या प्रथमदर्शनी चमत्कारिक वाटणाऱ्या पद्धतीविषयी विचार केला तर तिचे पुढील गुण लक्षात येतील. १) धडा पूर्ण कळल्याशिवाय प्रश्न काढताच येणार नाहीत व म्हणून कळण्यासाठी विद्यार्थ्याला तो पुन्हा पुन्हा वाचावा लागेल. २) चार-पाच प्रश्न काढायचे असल्यामुळं निरनिराळ्या अंगानी धड्याकडं बघायची सवय विद्यार्थ्याला लागेल आणि अशा रीतीनं त्याच्या बुद्धीला चालना मिळून त्याला विचार करायची सवय लागेल. ३) आपणच प्रश्न विचारणारे म्हणजे परीक्षक आहोत ही जाणीव सूक्ष्मपणे विद्यार्थ्याला सुखद वाटेल. ४) गृहपाठ तपासण्याचं शिक्षकाचं काम एकदम खूप हलकं होऊन जाईल. अर्थात प्रत्यक्ष लेखनक्रियेला म्हणजे एखादा मजकूर उत्तराच्या स्वरूपात संघटितपणे लिहिण्याला ह्या पद्धतीत अवकाश नाही. त्यामुळे रूढ पद्धतीचा गृहपाठ अवश्य राहतोच. पण पूरक पद्धती म्हणून ही पद्धती मला फार महत्त्वाची वाटते डॉक्टरही ती पूरक म्हणूनच वापरीत.

इंग्रजी पक्कं कसं कराव ह्याबद्दलचही त्यांचं एक अभिनव तंत्र होतं आणि पुढं अभ्यासमंडळाच्या काळात त्यांनी ते मला समजावून दिलं होतं. (अजूनही मी ते कुणाकुणाला सांगतो. उत्सुकानी स्वतःवर किंवा आपल्या मुलावर / विद्यार्थ्यांवर त्याचा अवश्य प्रयोग करावा) एखादा छोटासा लेख घ्यायचा. प्रथम वाचतानाच बरेचसे अपरिचित शब्द किंवा वाक्यप्रयोग भेटतात, ते वहीत टिपून घ्यायचे. नंतर डिक्शनरीत त्या शब्दाचे अर्थ पाहून ते शब्दांपुढं लिहून ठेवायचे. मग पुन्हा एकदा (किंवा अनेकदा) लेख वाचायचा. ह्यावेळी तो अधिक स्वच्छ कळतो, कारण शब्दार्थ नीट अवगत झालेले असतात. शेवटची पायरी अशी की मूळ लेख बाजूला करून वहीत उतरलेल्या शब्दाच्या व वाक्प्रयोगाच्या आधारे आपल्या भाषेत तो पुन्हा लिहून काढायचा. नव्या शब्दाचा अर्थ कळताक्षणीच त्याचा लेखनात उपयोग केला जाणं ही ह्या पद्धतीची मेख आहे असं मला वाटतं. नव्या शब्दाचा उपयोग सुट्या-सुट्या वाक्यात करण्याऐवजी लेखातल्या एकाच सूत्राला धरून करणं हे शब्दाचे अर्थ लक्षात राहण्याच्या दृष्टीनं जास्त सोयीचं होतं. आपल्या भाषेत लेख लिहून झाल्यावर मुळातल 'अमृताच ताट' आणि त्याच आपण जे काय केल असेल ते, ह्याची तुलनाही मनात येणं अपरिहार्य आहे. हाही एक महत्त्वाचा लाभच. शिवाय हे सगळ स्व-शिक्षण (सेल्फ लर्निंग) आहे हे महत्त्वाच. ह्या पद्धतीनं मी स्वतः कितीतरी लेख लिहून काढलेले होते.

सर्व शिक्षण 'हसत-खेळत', विद्यार्थ्याला चुचकारीत, त्याचा कल पाहून देणं ही रीत त्याना अजिबात पसंत नसे. किमान शिस्त असलीच पाहिजे असं त्याच मत होतं आणि लहान वयाच्या विद्यार्थ्यांना तरी ही शिस्त लावण्यासाठी छडीची भीती अवश्य आहे अशी त्याची धारणा होती. नारळकरांनी शाळेतून छडी बंद केली होती; पण एक अपवाद केला होता. डॉक्टरांनी छडी मागविली तर ती त्याना पाठवून द्यायची. ह्यामागचं तत्त्वज्ञान त्यांच्याच शब्दात सांगण्यासारखं आहे.

> 'सुदैवाने मी नव्या मानसशास्त्राला कधीच बळी पडलो नाही. शाळेत मी छडीचा उपयोग करीत असे. मात्र शिस्तीचे खरे साधन शिक्षकाची वाणी होय, असे माझे निश्चित मत आहे. ज्याचे अध्यापन उत्तम आहे त्याला शिस्त सुलभ असते. ...पण एवढ्यामुळे सर्व विद्यार्थी नियमित अभ्यास करतील हे खरे नाही. त्यासाठी कठोर दंड अवश्यच आहे...मनुष्य भीतीवश आहे, दंडवश आहे हे महासत्य आपण दृष्टिआड करीत आहो. त्याची फळे आपण सध्या भोगीत आहो.'

मात्र छडीची वेळ क्वचितच येई हेही खरं. त्यांची वाणीच सर्व कार्यभाग निभावून नेत असे. कमीत कमी पाठांतर अवश्य आहेच असं त्याच मत होत. त्यानी म्हटलं आहे, 'विद्यार्थ्यांच्या मनोरचनेला कोरीव, रेखीव आकार उत्पन्न करण्याची पहिली जबाबदारी शाळाची आहे. आणि व्याख्या शिकविणे, नियम पाठ करून घेणे, पाठांतर करणे, सनावळी घोकून घेणे यानी ते संस्कार मुलाच्या मनावर होत असतात.' छडीचा प्रवेश होत असे तो मुख्यतः या संदर्भात.

पण छडीला पर्याय म्हणून ते जीभही वापरीत आणि तिचे फटकारेही असह्य असत. ते उपहास करीत, निर्भत्सना करीत, दगड्या, धोंड्या, म्हशा इत्यादी संबोधनं वापरीत. त्या काळात शाळेतले विद्यार्थी हे सर्व सहन करीत! एवढंच काय, १९४६ पासून कॉलेजात शिकवू लागल्यानंतर छडी गेली; पण त्यांची ही भाषा कायमच राहिली. त्यामुळे विद्यार्थी अवमानित होत. पण कुणी तक्रार केल्याचं ऐकिवात नाही. डॉक्टरांच्या बाबतीत हे सर्व क्षम्य समजावं, एवढी उदार दृष्टी त्याच्या विषयीच्या मूलभूत आदरामुळं विद्यार्थ्यांना

आपोआपच प्राप्त झालेली असे. डॉक्टरांच्या भाषेत तुच्छता दिसली, तरी मुळात विद्यार्थीवर्गाविषयी त्यांच्या मनात अनादर होता असं कुणालाही म्हणता आलं नसत.

किंबहुना विद्यार्थिवर्गाच्या बुद्धिमत्तेविषयी आणि कर्तृत्वाविषयी अपरपार आणि सखोल विश्वास आणि आशावाद हेच डॉक्टराच्या शिक्षणशास्त्राच पायाभूत तत्त्व होतं असं म्हणता येईल. समोर बसलेल्या विद्यार्थ्याला अमुक एक गोष्ट कळणार नाही, ती त्याच्या आकलनाच्या बाहेरची आहे, अशी समजूत त्यांनी कधीही करून घेतली नाही. ज्ञानविश्वाच भाडारच ते शाळेतल्या विद्यार्थ्यांपुढं खुलं करून टाकीत. ग्रंथप्रामाण्य, बुद्धिप्रामाण्य, ज्ञान आणि नीती, लोकशाही–हुकूमशाही, मार्क्सवाद, गांधीवाद, राष्ट्रवाद ह्या सगळयाचा प्रपंच पाठ्यपुस्तकातील वेच्यांच्या संदर्भात होई. सर्व आधुनिक विचारसरणी आम्हाला स्पर्शून जात. आधुनिक विज्ञानात उत्पन्न झालेल्या अज्ञेयवादापर्यंत, थेट सृष्टीच्या अतिम कुतूहलापर्यंत ते आम्हाला घेऊन जात असत.

डॉक्टराचे एक जुने विद्यार्थी व नतरचे सहचर श्री. गं. म. साठे ह्यांनी जे लिहिलं आहे ते अक्षरशः खरं आहे.

> 'कोणताही गहन तात्त्विक विषय शाळेतल्या मुलांनाही अनाकलनीय नसतो, हे डॉक्टराच्या शिक्षण पद्धतीतील तत्त्व आहे त्या वेळेपर्यंतची सर्व सामाजिक विचाराची तत्त्वे आमच्या मनोभूमीत मेढेकोट करून बसली. उच्चनीचता कर्तबगारीवर असावी, जन्मावर नसावी; जुना आचारधर्म म्हणजे केवळ अंधश्रद्धा आहे; धर्म हा अपरिवर्तनीय नाही...इ. नान विषयांवरील क्रातिकारक विचार आमच्या मनोभूमीत रुजत होते आणि रोज नव्या विचाराचा भीजपाऊस पडत होता.... सॉक्रेटिस, मार्टिन लूथर, शेक्सपिअर, रूसो, डार्विन, पाव्ह लाव्ह, एलिस, मार्क्स, सिडने वेब, शॉ यासारख्या सर्व व्यक्तींचे त्यांच्या क्षेत्रातील कार्य आम्हाला मॅट्रिकपूर्वीच ठाऊक झाले होते....हे सर्व विचार आम्हाला कळत होते. कारण ते आम्हाला कळतील इतके सोपे करून सागण्याचे कसब डॉक्टरामध्ये होते. भाषेच्या प्रत्येक तासाच्या वेळी आमच्या कानांना जिभा फुटलेल्या असत. . प्रत्येक ताम म्हणजे वैचारिक जगाची एक प्रदक्षिणा होती....त्यामुळे मॅट्रिक होऊन आम्ही कॉलेजमध्ये गेलो ते भांबावलेल्या चेहऱ्यांनी गेलो नाही, तर उलट प्राध्यापकाच्या शिकविण्याचे मोजमाप करण्याची एक मोजपट्टी घेऊन.'

डॉक्टरांचा ह्या विचारविश्वातला संचार 'स्वैर सचार' नसे, हे अगत्यानं सागितलं पाहिजे. म्हणजेच त्यात विषयातर नसे. सर्व विस्तार मूळ मुद्द्याशी घट्टपणे बांधलेला असे. विषय 'रगवून' शिकविणारे बरेचसे शिक्षक अनिर्बंधपणे वाहात जातात. ही त्यांची मुशाफिरी विद्यार्थ्यांना रोचक वाटत असेल पण फलदायी किती होत असेल ह्याची शका येते.

'फ्रॉम लाइफ टू लिटरेचर' ह्या नावाच एक पुस्तक नंतर कॉलेजमध्ये माझ्या वाचनात आलं. त्याच्या पहिल्याच प्रकरणात 'इलॅम' नावाच्या एका वाङमय शिक्षकाचा परिचय आहे. ह्या शिक्षकानं वाङ्मयाची अभिरुची कशी निर्माण केली हे सांगताना त्याच्या एका तासाचं वर्णन लेखकानं केलेलं आहे. आता मला धूसरपणानं आठवतं ते हे की शेले, बायरन इत्यादी कवींच्या कविता शिकविताना इलॅम त्या कवितात आणि कवींच्या जीवनात इतका रंगून जाई की लेखकाच्या शब्दात 'तो त्याच्याबरोबर जगे आणि त्यांच्याबरोबर मरेही!' त्याच्या रसवतीत बुडालेल्या त्या कोवळया विद्यार्थ्यांना तास कधी संपूच नये अस वाटे.

मात्र इलॅमच्या डोक्यात मुलाच्या परीक्षा, त्यांचं पास होणं इत्यादी व्यावहारिक विषयाची अडचण उत्पन्न होत असे. उलट डॉक्टराची ह्याबाबत फार व्यवहारी दृष्टी असे. ज्ञानविज्ञानाच्या अवकाशात ते आमचं भ्रमण करवीत पण शेवटी नेमकेपणाने जमिनीवर येत. हे त्यांच्याच शब्दात सांगायला पाहिजे.

> 'व्यवहार मी कधी दृष्टिआड केला नाही. विद्यार्थ्यांची परीक्षेची उत्तम तयारी करून घेणे हे आपले पहिले कर्तव्य आहे ही जाणीव मी कायम ठेवली होती....प्रश्नांची उत्तरे कशी लिहावयाची हे शिकविणे हा अध्यापनाचा एक महत्त्वाचा, फार महत्त्वाचा भाग आहे असे मला वाटते... विचार करणे म्हणजे काय, तो विचार व्यवस्थित माडणे म्हणजे काय, हे त्यानी या अभ्यासातूनच शिकावयाचे असते....संभाव्य प्रश्न मी प्रथम सांगत असे. त्यामुळे सर्व निबंध मुलाच्या डोळयांपुढे एकदम उभे राहत....मग प्रत्येक प्रश्न किती ओळीत लिहावयाचा, त्याचे परिच्छेद कसे करावयाचे, प्रत्येक परिच्छेदाची पहिल्या वाक्यापासून विधान, स्पष्टीकरण, प्रमाण, उदाहरण, तुलना, आक्षेप, उत्तरं या पद्धतीने रचना कशी करावयाची हे मी सागत असे.'

मार्गदर्शक पुस्तक ( गाईड्स ) चागली असली तर डॉक्टराना ती त्याज्य नसत. सर्वसामान्य शिक्षकाचा ह्या बाबतीतला ढोंगी उच्चभ्रूपणा त्याना शिवलेला नव्हता. इग्रजी पाचवीपासून माझी गणित विषयाची गाडी इतकी घरंगळत गेली की, मॅट्रिकच्या पूर्व परीक्षेत एका बाजूला संस्कृतात सत्त्याण्णव मार्क तर दुसऱ्या बाजूला गणितात तेवीस मार्क मिळाले आणि मी नापास झालो. ह्याचा जोराचा हबका मला व माझ्या हितचिंतक शिक्षकाना बसला. डॉक्टरानी मला घरी बोलावून घेतलं. ते माझ्यावर रागावणार अशी भीती मनात होती, पण तसं काही झाल नाही. अत्यंत शांतपणे व सहानुभूतीच्या स्वरात माझी अडचण नेमकी कुठ होत होती हे त्यानी माझ्याकडून काढून घेतलं, मला उमेद दिली आणि चाचणी प्रश्नाची आणि त्यांच्या उत्तराची त्या काळात जी पुस्तकं मिळत, त्यातलं एक खरेदी करायला सांगितलं. त्यातलं प्रत्येक गणित समजावून दिलेल्या रीतीनं करायच, दिलेल्या उत्तराशी ताडून पाहायचं आणि समजलं नाही तरी ही क्रिया यांत्रिक रीतीनं पुस्तक संपेपर्यंत करीत राहायची अस त्यानी सागितलं. हा नेम मी पाळला आणि परिणामी मॅट्रिकच्या परीक्षेत गणितात साठ टक्के मार्क मिळवून मी उत्तीर्ण झालो. ते स्वतः मॅट्रिकची मराठीची 'दीपिका' अनेक वर्षं तयार करीत असत. पण 'गाइड' ह्या शब्दाला आलेला तुच्छतेचा अर्थ मनात वागवून एखाद्यानं ती वाचली तर आश्चर्यचकित व्हाव इतकी पूर्णता व कसोशी

ह्या दीपिकेच्या लेखनात डॉक्टरांनी ओतली असल्याच त्याच्या लक्षात येईल. (दुसरी उत्कृष्ट 'दीपिका' आमच्याच शाळेतले शिक्षक प्रा. अ. गं. मगरूळकर यांची संस्कृत वेच्यावर असे. या दोन्ही दीपिकामधील काही भाग स्वतंत्र रीतीनं साहित्य म्हणूनही वाचण्यासारखा असे )

डॉक्टराच्या वर्गशिक्षणाच्या संदर्भातच त्यांच्या वक्तृत्वाचा उल्लेख केला तर तो अनाठायी होणार नाही. कारण अस की त्याचा शाळेतला धडा हे एक व्याख्यानच असे. हा अनुभवही त्या वेळी आम्हाला नवा होता. मात्र त्यामुळ शाळा आणि कॉलेज ह्यामधली दरी आमच्या बाबतीत उरली नाही हे खर. व्याख्यान–पद्धतीचा उपयोगही त्यानी विचारपूर्वक अगिकारलेला होता.|

त्यांनी आपलं वक्तृत्व सुरेख घडविलेलं होतं, ते मुख्यत: त्याच्या अंतरंगाकडे लक्ष देऊन. विषयाची तर्कसगत मांडणी आणि उदाहरणाचा, दृष्टाताचा खोललेला खजिना हे ते अंतरग असे. ही उदाहरणं प्रस्तुत विषयाला अत्यत समर्पक असूनही इतक्या विस्तृत आणि अनपेक्षित क्षेत्रातून येत की त्यामुळंच दृष्टी फाके. हे त्याच्या वक्तृत्वाचं ( आणि लेखनाचंही ) सर्वात महत्त्वाच, इतरापासून त्यांना वेगळं उठवून दाखविणार वैशिष्टच म्हणता येईल. ह्यामागं त्याचा जबर व्यासग आणि 'उपस्थिती' म्हणजे वेळच्या वेळी एखादा संदर्भ हजर करण्याची शक्ती असे. हे तुम्ही कसं करता असं मी त्यांना एकदा विचारलं. तेव्हा ते म्हणाले, 'प्रत्येक पुस्तक किंवा लेख वाचताना मी त्यातील महत्त्वाचा व मला उपयोगी पडण्यासारखा भाग वहीत लिहून ठेवतो. अशा टिपणांच्या माझ्याकडं शेकडो वह्या आहेत. फावल्या वेळी ही टिपणं मी नजरेखालून घालतो. अशामुळं महत्त्वाचे संदर्भ मुद्द्यापत्त्यासहित मनात पक्के होतात. मग एखादा विषय डोळ्यासमोर आला की, त्याचं स्पष्टीकरण किंवा विस्तार करताना मी वाचलेल्यातल्या निवडक आणि समर्पक घटना, उदाहरणं गर्दीदिशी माझ्या डोक्यात जमून येतात. हे संश्लेषण (सिथेसिस) अशा रीतीन मनात तयार झाल की भाषण रोचक तर होतंच, पण सुबोध होतं आणि परिणामकारक होतं.' पुढ ते म्हणाले, 'एखाद्या सभेत आपल्याअगोदर अनेक वक्ते असले म्हणजे 'मागच्या वक्त्यानं सागितलेलच आहे त्याप्रमाण...' असं म्हणण्याचा दीनवाणा प्रसंग माझ्यावर कधीच येत नाही. वेगळं काही बोलण्यासारखं माझ्याकडं नेहमीच असतं, कमीत कमी एखादा वेगळा दृष्टात, वेगळी घटना सागण्यासारखी माझ्याकडं असते.'

ह्या भाषणामधून मध्येच बोचरे विनोद असत, उपहास असे, एखाद्या लेखकाची चेष्टा असे, त्याच्या अज्ञानाची कीव केली जाई, मधूनच समोरच्या विद्यार्थ्यांवर मर्मघातक आघात केले जात, त्याच्या घरातल्या कर्मकांडी सस्कारांचा व रूढींचा उद्धार केला जाई, तथाकथित पवित्र भावनाना हेतुपूर्वक डिवचून विद्यार्थ्यांना बुद्धिवादी जाग आणली जाई. एखादं प्रभावी किंवा उपहास प्रचुर वाक्य बोलण्याच्या अगोदर ते नाक आकुचित करून जोरात श्वास आत घेते व सोडीत आणि त्यावेळी 'खु'सारखा एक आवाज निघे आता काही तरी स्फोटक ऐकायला मिळणार याची ती खूणच असे. एखाद्या वेळी एखादं कमानदार इंग्रजी किंवा सस्कृत वचन ते कट्यारीसारख मनात घुसवीत. दोन विरोधी मताच संघर्षात्मक नाटच ज्या वेळी ते उभं करीत त्यावेळी घन आणि ऋण विप्रनप्रवाहाची आकाशात गाठ पडावी; कडकडाट व्हावा, प्रकाश पसरावा आणि वर मान करून हे दृश्य आपण स्तिमितपणे पाहात असावं अस होऊन जाई. शिकवीत असलेल्या कवितेचा अर्थ ती म्हणून दाखविल्यानंच खरा कळणार आहे असं वाटल तर ते चक्क ती गळ्यावर म्हणून दाखवत आणि मुलंही डॉक्टरांचं ते गळी आवाजातलं आणि बाळबोध चालीतलं गाणं शातपणे ऐकून घेत एरव्हीही 'रेसिटेशन' हा त्याचा हातखंडा विषय होता आणि उतारेच्या उतारे ते कुठही न चुकता अस्खलितपणे म्हणून दाखवित. ॲटनीच्या भाषणाचं उदाहरण मागंच दिल आहे. निवृत्त झाल्यानतर ते डॉ. रा. श. वाळिंबे ह्याच्याबरोबर कधी कधी जोड व्याख्यान देण्याचा कार्यक्रम करीत. असं व्याख्यान मी ऐकलं आहे. 'उत्तम काव्याचे लक्षण' किंवा असा काही तरी विषय असे. डॉक्टर एक पक्ष माडीत. डॉ. वाळिंबे विरुद्ध पक्ष उभा करीत. आणि वडिलकीच्या अधिकारात शेवटी वाळिंब्याचा एकेक मुद्दा डॉक्टर आवेशान भुईसपाट करीत. अखेरीस उत्कृष्ट काव्याच उदाहरण म्हणून सावरकरांची 'मूर्ति दुजी ती' ही सपूर्ण कविता तीतील सर्व शब्दाचा अर्थ व नाद आणि त्यात आलटून–पालटून येणारं विरोधी चित्राचं नाटचमय द्वंद ध्यानात आणून देतदेत ते विलक्षण परिणामकारक रीतीनं म्हणून दाखवित.

□

## २ : ज्ञानोपासना–बलोपासना

नू. म. वि. शाळेत अठरा वर्षं आणि स. प. कॉलेजमध्ये अठरा वर्षं असं एकूण छत्तीस वर्षं डॉक्टरांनी अध्यापन केलं. शिक्षक हा त्यांचा व्यवसाय होता–आणि नेमून दिलेला अभ्यासक्रम शिकवणं हे त्याना भाग होतं. ह्या अभ्यासक्रमाच्या अनुरोधानं उत्कृष्ट विचारांची बीजं विद्यार्थ्यांच्या मनात रूजविणं आणि त्याची दृष्टी विस्तारेल, ते जागरूक नागरिक बनतील, नेते बनतील, अभ्यासाची प्रेरणा त्यांना प्राप्त होईल, असे संस्कार त्यांच्यावर करणं हा त्याचा प्रयत्न होता. पण तरीही अभ्यासक्रमाच बधन राहीच. तेव्हा मोकळेपणानं विद्यार्थी घडवायचे तर त्यासाठी वेगळी यंत्रणा हवी. ती म्हणजे त्यानी स्वतःच्या घरीच चालवलेलं अभ्यासमडळ.

मी १९४५ ते १९४९ ह्या काळात ह्या अभ्यासमंडळाचा एक घटक होतो १९४९ साली मुंबईला पुढच्या अभ्यासासाठी मी गेलो. मंडळ १९५३ पर्यंत चालू होतं असं दिसत. त्याचा प्रारंभ नेमका कधी झाला हे मला माहीत नाही. पण अगदी नियमित स्वरूपात जरी नव्हे तरी ह्यासारखा उपक्रम त्यानी फारच पूर्वी सुरू केला होता अस श्री. साठे ह्यांच्या आठवणीवरून दिसतं. दर शनिवारी वि. ल. भावे यानी लिहिलेलं नेपोलियनचं चरित्र डॉक्टर विद्यार्थ्यांना समजावून सांगत असत. ही गोष्ट १९२८–२९ सालची, म्हणजे डॉक्टराच्या शिक्षकी पेशाच्या अगदी प्रारंभीची.

आमच्या अभ्यासमडळामागं एक विशिष्ट भूमिका होती; नुसत्या बौद्धिक आनदासाठी चर्चा करणं हा त्याचा हेतू नव्हता. शब्द मोठे वाटतील पण हेतू होता तो वैचारिक क्रांतीचा. आम्ही जमत होतो तो काळ स्वातत्र्याच्या पूर्वीचा. डॉक्टर आम्हाला सांगत की, स्वातंत्र्या-

नंतर काय करायचं हे कुणीच ठरविलेलं नाही. स्वातंत्र्य म्हणजे परक्यांचं राज्य जाऊन आपलं येणं इतकाच अर्थ नाही. पारतंत्र्य हा सामाजिक पराभव असतो आणि स्वातंत्र्य ही समाजक्रांतीची नांदी असते. क्रांतीची उद्दिष्टं ठरविणं हे काम मुळात वैचारिक आहे. ते काम करणं, म्हणजेच ऐका नव्या व्यापक सामाजिक तत्त्वज्ञानाची सिद्धता करणं, हा अभ्यासमंडळाचा उद्देश होता. चतुरस्र बुद्धीचे तत्त्वज्ञानी म्हणून महाभारतकार व्यासांवर डॉक्टरांची परम श्रद्धा होती. म्हणून अभ्यासमंडळाला त्यांनी 'व्यास विद्यामंडळ' असं नाव दिलं होतं. सामाजिक तत्त्वज्ञान तयार करायचं तर इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांपैकी काहीही वर्ज्य करण्यासारखं नव्हतं. त्यामुळं अभ्यास करणाऱ्यांचा एक गट तयार होणं अवश्य होतं. सर्व सभासदांनी शक्य तो शिक्षकी पेशात राहून अभ्यास आणि लेखन करीत राहावं अशी अपेक्षा होती.-शिवाय ह्या गटानं समाजाचं प्रबोधन करीत राहिलं पाहिजे, असाही आग्रह होता. प्रबोधन करायचं तर त्यासाठी ग्रंथ लिहिले पाहिजेत, मासिकं काढली पाहिजेत, वृत्तपत्रं चालविली पाहिजेत, भाषणं दिली पाहिजेत. हे व्हायचं तर लेखनकला, वक्तृत्वकला, ह्याही प्रत्येकानं आत्मसात करायला हव्यात, योजना अशी महत्त्वाकांक्षी, व्यापक बौद्धिक चळवळीच्या स्वरूपाची होती. फ्रेंच राज्यक्रांतीच्या अगोदरचे 'एनसायक्लोपीडिस्ट' विद्वान रूसो, व्होल्तेर, रशियन राज्यक्रांतीत परिणत झालेला मार्क्सवाद, वेब, शॉ वगैरेंचा फेबियन सोशॅलिझम इत्यादी उदाहरणं या संदर्भात डॉक्टर देत.

दर शनिवारी दुपारी ३ वाजता डॉक्टरांच्या अभ्यासाच्या खोलीत आम्ही जमत असू. साडेचार ते पाचपर्यंत अभ्यासमंडळ चाले. बहुधा डॉक्टर एखाद्या ग्रंथाच्या अनुरोधानं विवेचन करीत. एखाद्या वेळी विद्यार्थ्यानं लिहिलेल्या निबंधावर चर्चा होई, पण हे क्वचित. ह्याचं कारण विद्यार्थ्यांचा या बाबतीतला प्रतिसाद अल्प असे. मी अभ्यासमंडळात असण्याच्या साडेतीन-चार वर्षांच्या काळात फिशर ह्याचा युरोपचा इतिहास, डॉ. आंबेडकर ह्यांचं थॉटस ऑन पाकिस्तान, ग्रे वुल्फ ह्या नावाचं केमाल पाशाचं चरित्र, डॉ. ग. श्री. खैर ह्यांचं जपानची जीवनक्रांती, डेव्हिड लिलिएन्थल यांचं टी. व्ही. ए. (टेनेसी व्हॅली ऑथॉरिटी), द. के. केळकर ह्यांचं संस्कृती-संगम, धां. वा. गाडगीळ यांचा कॅपिटल सारग्रंथ, इत्यादी पुस्तकांवर डॉक्टरांनी प्रवचनं केली. आम्ही एखादा विषय निवडावा, त्याचा अभ्यास करावा निबंध लिहावा, त्यावर चर्चा व्हावी असा डॉक्टरांचा सारखा प्रयत्न असे. त्यासाठी ग्रंथ व नियतकालिकं आम्हाला ते उपलब्ध करून देत. ह्याशिवाय फ़ॉरिन अफेअर्स सारखी महाग इंग्रजी नियतकालिकं स्वतःच्या पैशानं ते विकत घेत.

नजीकच्या भविष्यकाळात करायच्या विचारक्रांतीची डॉक्टर स्वप्नं पाहात असत. इतकंच नव्हे तर तीबद्दलची योजनाही त्यांच्या मनात असे. कालांतरानं आपल्याला हिंदीतूनही प्रबोधन करावं लागेल म्हणून ते एकदा हिंदीच्या अभ्यासालाही लागले होते. वृत्तपत्र किंवा मासिक काढायचं तर त्यात राष्ट्रवाद, समाजवाद असा केवळ गंभीर मजकूर असून चालणार नाही. सर्वसाधारण वाचकाला आकर्षित करायचं तर त्यात ललितसाहित्यही हवं. म्हणजे प्रामुख्यानं लघुकथा हव्या. त्या कशा लिहाव्या ह्याचेही धडे त्यांनी एक दोन वेळा दिले. ट्रुस्टोरी नावाच्या अमेरिकन मासिकात खऱ्या अर्थानं 'सत्यकथा' असलेल्या कौटुंबिक स्वरूपाच्या कहाण्या येत पण त्या नुसत्या घटना-वर्णन स्वरूपाच्या असत ह्या घटना हा मुळाधार घेऊन त्यांना कथारूप कसं द्यावं हे आमच्या समोर त्याच्या 'कथा' तयार करून ते समजावून सांगत.

## ज्ञानाबद्दल पूज्यबुद्धी

त्यांच्या दृष्टीनं आम्ही एका तऱ्हेचे क्रांतिसैनिकच होतो. हौतात्म्य जरी नव्हे तरी शिक्षकाचा व्यवसाय, त्यात पत्करावी लागली तर गरीबी, इत्यादीच व्रत आम्ही घ्यावं अशी त्यांची अपेक्षा होती आणि म्हणून एकदा विठ्ठलवाडीच्या सहलीत आपल्याकडून ह्या अर्थाच्या सातत्यानं आणि निर्वेधपणे करायचं तर आमच्या तब्येती मुळात घडं हव्यात. त्यासाठी आपल्या निसर्गोपचाराच्या अभ्यासाचा लाभ ते आम्हाला करून देत बी ए.च्या वर्षी माझी पाठ जोरात दुखू लागली व अभ्यास करणं कठीण होऊ लागलं. त्यासाठी डॉक्टरांनी आपल्या घरी मला आठ दिवस ठेऊन घेऊन स्वत.च्या देखरेखीखाली उपोषण आणि इतर निसर्गोपचार करवून घेतले व्यायामावरही त्यांचा भर असे. निसर्गोपचार आणि व्यायाम यामधून त्यांनी स्वत.चं शरीर बळकट बनवलं होतं. आमच्याही अंगात रग यावी यासाठी आम्ही उन्हातान्हातून, पावसापाण्यातून, हिंडलं पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. मग वर्षाकाठी एकदोन वेळा बहुधा भर पावसाळ्यात खंडाळ्याच्या आसपासच्या डोंगरात आमच्या सहली होत. ह्या सहली, मध्ये डॉक्टर विशेष खुले होत, आमच्यातलेच एक बनून जात चेष्टामस्करीतही भाग घेत. ते किती प्रकारांनी संस्कार करू पाहात ह्याचं एक उदाहरण म्हणजे, आमच्या एका मित्रानं आम्हा सर्वांना वाईला त्याच्या घरी बोलावलं होतं त्या वेळी डॉक्टरांनी आम्हाला प्राज्ञ पाठशाळेत नेलं व तर्कतीर्थांशी आमची ओळख करून दिली. त्यावेळी चाललेल्या धर्मकोशाच्या कार्याचा परिचय लक्ष्मणशास्त्रींनी आम्हाला करून दिला. लक्ष्मणशास्त्रींचे गुरू केवलानंद (नारायणशास्त्री मराठे) त्या वेळी 'गंगे'च्या (कृष्णानदीच्या) काठावर एका मठीत राहात असत. तीन घरी भिक्षा मागून जे मिळेल त्यावर उदरनिर्वाह करायचा आणि सर्व वेळ अभ्यास आणि तत्त्वचिंतन ह्यात घालवायचा असा त्यांचा क्रम आम्ही ऐकलेला होता. डॉक्टर ह्या मठीत आम्हाला घेऊन गेले सबंध मठीत पोथ्यांच्या थप्प्या लागलेल्या होत्या. केवलानंदांची मूर्ती मध्यभागी एका आसनावर विराजमान झालेली होती. त्यांच्या मुद्रेवरचं शांत तेज पाहून 'ऋषि' ही आमच्या मनातली अस्फुट संकल्पना जणू काही शरीरीभूत झाली. डॉक्टरांनी प्रवेश करताच अनपेक्षितपणं त्यांना साष्टांग प्रणिपात केला. मग आम्हीही केला. केवलानंद सस्मित एकदोन शब्द बोलले असतील तेवढेच. त्यांचा निरोप घेऊन आम्ही परत आलो. उग्र ज्ञानोपासनेचं एक चालतंबोलतं उदाहरण डॉक्टरांनी आम्हाला दाखवलं आणि त्याबद्दलची आपली पूज्यबुद्धी सक्रिय प्रदर्शित केली.

शाळेचा, कॉलेजचा आणि अभ्यासमंडळाचा हा आमचाकाळ आमच्यापैकी बहुतेकांचा संघात असण्याचाही काळ होता. १९४१-४२ किंवा त्याच्या आसपास डॉक्टरही संघात येऊ लागले होते. तरुणांची ही संघटना त्यांना फार आशादायी वाटू लागली होती आणि तीत त्यांनी नेहमीच्या उत्साहानं स्वतःला लोटून दिलं होतं. हाफ-पॅंट

घालून ते संघाच्या शाखावर जाऊ लागले होते. १९४२–४३ साली मॅट्रिकच्या वर्गात असताना मी संघाचा शाळा प्रमुख होतो. संघाच्या प्रचाराला डॉक्टरांनी इतकं वाहून घेतलं होतं की बहुधा दररोज संध्याकाळी शाळा सुटल्यावर माझ्याबरोबर ते एखाद्या वर्गावर येत, विद्यार्थ्यांना संघकार्याचं महत्त्व समजावून देत आणि प्रचारकार्याचंही महत्त्व सांगत. नाझींच्या प्रचारतंत्राचा, पुन पुन्हा तीच गोष्ट सांगण्याचा, यावेळी त्यांच्या मनावर फार मोठा प्रभाव पडलेला असावा. 'वाटाणा जसा भिजत घालतात' तसं तुम्ही इतरांना संघाच्या प्रचारात भिजवत जा असा संदेश ते देत.

डॉक्टर कुठल्याही एका शाखेशी संलग्न झालेले नव्हते. मनात येईल त्याप्रमाणं ते कुठल्याही शाखेत जात. 'बौद्धिक प्रमुख' असल्यामुळं ते शाखेवर येताच त्यांना बौद्धिक घ्यायला सांगण्यात येई, आणि नेहमीच्या पद्धतीनं ते एखाद्या विषयावर भाषण देत. संघाचं म्हणून जे काय तत्त्वज्ञान होतं ते डॉक्टरांनीच खरं म्हणजे प्रथम व्यवस्थित मांडलं; पण संघाच्या अत्यंत संकुचित दृष्टीच्या अधिकाऱ्यांना डॉक्टराच्या कार्याचं मोल कळलं नाही आणि डॉक्टर संघाबाहेर पडले. ह्या संदर्भात त्यांनी लिहिलं आहे.

'मी संघात दोन–तीन वर्षं होतो तरी ग्रंथवाचन सोडले नव्हते. त्यामुळे मी वैयक्तिक उन्नती वाढवण्याच्या मागे आहे, संघात मी एकजीव झालो नाही अशी माझ्यावर टीका होत असे. मी सायंकाळी निरनिराळ्या शाखांवर जाऊन मार्क्सवाद, फ्रेंच, इटालियन, रशियन, चिनी क्रांती, वॉशिंग्टन, मॅझिनी, माओ, लेनिन ह्यांची चरित्रे, मराठ्यांचा, विजयनगरचा इतिहास, त्यातील जयापजय यावर बौद्धिके घेत असे. प्रथम त्याची चेष्टा होत असे पुढे ती बंद करण्यात आली. संघाला त्याची मुळीच जरूर नाही असे संघचालकांनी मला सांगितले.'

## विद्वान तरीही लोकप्रिय


अभ्यास मंडळात या भ्रमनिरासाची कथा ते आम्हाला सांगत आणि मग अगदी उलट्या टोकाला जाऊन संघावर जोराचे प्रहार करू लागत अशा वेळी त्यांची वाणी विशेष जळजळीत होई. हे जहर पचनी न पडून दोन सभासद रागानं अभ्यासमंडळ सोडून गेले. आम्ही जे उरलो, त्यांची संघाची ओढ कमी झाली. १९४६ साली आठ वर्षांनंतर, संघात जाणं मी सोडून दिलं, ते मुख्यतः डॉक्टराच्याच प्रभावानं.

डॉक्टराचं स्वप्न काही प्रत्यक्षात आलं नाही. शिक्षणाच्या, नोकरीच्या इत्यादी निमित्तानी आम्ही बरेचजण पांगलो. पाचसहाजण तरी मुंबईला येऊन थडकलो. डॉक्टरांचं अभ्यासमंडळ नव्या विद्यार्थ्यांना घेऊन आणखी काही वर्षं चालू राहिलं; पण त्यांना अपेक्षित ते फळ कधीच आलं नाही.

पण डॉक्टर हरणारे नव्हते त्यांनी आपलं एकमुखी प्रबोधन चालूच ठेवलं, ते जाहीर व्याख्यानाच्या स्वरुपात. सुट्टीच्या दिवसात स. प. कॉलेजच्या रमाबाई सभागृहात ही व्याख्यानं होत, पण सर्वांना खुली असत. रशियन, अमेरिकन, भारतीय ह्या लोकसत्ता, मार्क्सवाद, समाजवाद– हेच व्याख्यानांचे विषय असत. पुण्यातल्या कॉलेजांमधून पाचशे ते आठशे विद्यार्थी ह्या व्याख्यानांना हजर असत. दरसाल सुमारे २४ याप्रमाणे १९४६ ते १९५३ या आठ वर्षाच्या काळात त्यांनी सुमारे दोनशे तरी व्याख्यानं दिली असं म्हटलं पाहिजे; पण व्याख्यानाचा हिशेब एवढाच नाही. निमंत्रित वक्ते म्हणून पुण्यात आणि पुण्याबाहेर शेकडो व्याख्यानं त्यांनी दिली. हा एक प्रचंड वाग्यज्ञनच होता. शिवाय डॉक्टराचं कोणतही व्याख्यान दीड तासाचं असे हे लक्षात घ्यायला हवं. श्रोत्यांना तेवढा वेळ खिळवून ठेवण्याची शक्ती त्यांच्या वक्तृत्वात निश्चित होती.

सार्वजनिक सभेमधल्या त्यांच्या वक्तृत्वाची घाटणी आणि वर्गात ते देत असलेल्या व्याख्यानाची घटणी यात मूलतः काही फरक असण्याचं कारण नव्हतं. मात्र मोठ्या समूहासमोर बोलताना, यशस्वी वक्त्याला जी तात्पुरती का होईना नशा चढते ती डॉक्टरानाही थोडी फार चढत असे. अशा वेळी त्यांचा उपहास अधिक तिखट बने; प्रतिपादनाला एक घणघणीतपणा येई, एखाद्या उपवक्त्यानं केलेल्या टीकेची मोजक्या शब्दात ते राळ उडवंत आणि श्रोते टाळ्यांचा कडकडाट करीत. ह्या त्यांच्या भाषणामधून उन्माद जाणवे आणि यशस्वी भाषणानंतरचे विजेत्याचे संयत समाधान त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येई. एका उपवक्त्यानं, 'मला आता संदर्भ आठवत नाही; पण काही मुदतीनं मी तो देऊ शकेन,' असं दुबळं विधान केल्यावर त्याला उत्तर देताना 'सबंध जन्माची मुदत तुम्हाला दिली आहे,' असं बेफाम पण आत्मविश्वासपूर्ण उत्तर देऊन त्यांनी टाळ्यांच्या गजरात सभा जिंकली. टिळक मंदिरातील त्यांच्या एका भाषणानंतर एका मार्क्सवादी उपवक्त्यानं वरवर सयुक्तिक दिसणारा एक आक्षेप घेतला. 'इंडस्ट्रियल कॅपिटॅलिझम' आणि 'फायनान्स कॅपिटॅलिझम' ह्यांचे काळ मात्र त्यानं उलटेपालटे केले होते. हे श्रोत्यांच्या लक्षात आलं नव्हतं. ही फट त्यांच्या भाषणात सापडताच अगदी किरण साधून झाप टाकावी तशी डॉक्टरांनी त्याच्यावर झाप टाकली आणि 'विसावं शतक एकोणिसाव्या शतकाच्या आधी न येता नंतर येतं असं माझं नम्र मत आहे,' हे वाक्य सावकाश उच्चारीत त्याचं पूर्ण तळपट केलं. वक्तृत्वाच्या ह्या खामी डॉक्टराच्याकडे असत; पण ह्या ठिकाणी आवर्जून सांगितलं पाहिजे की, भावनेला आवाहन हे डॉक्टराच्या वक्तृत्वाच्या यशाचं रहस्य नसे. ते रहस्य युक्तिवाद हे असे. शेकडो किंवा हजारो श्रोत्यांना मुख्यतः बौद्धिक पातळीवर आवाहन करून त्यांची एकाग्रता संपादन करणं हे डॉक्टराचं असामान्य वैशिष्ट्य म्हटलं पाहिजे. भावनेची झिलई त्यांच्या वक्तृत्वाला मिळे तीही एखाद्या भावनात्मक घटनेच्या उल्लेखातून किंवा वर्णनातून. डॉक्टर विद्वान वक्ते असूनही लोकप्रिय वक्ते होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.

खरा शिक्षक हा केवळ वर्गातलं शिक्षकत्वाचं काम बजावून थांबत नाही. डॉक्टरांनी वर्गाबाहेरही विद्यार्थ्यांना व समाजाला काय शिकवलं हे मी सांगितलं. पण ह्याच्याही पलिकडे जाऊन धडपडणाऱ्या, अडचणीत असणाऱ्या विद्यार्थ्यांना वेळप्रसंगी मदतीचा हात देणं, त्यांच्या अडचणी निवारण हेही काम ते करीत असत. अनेकांना त्यांनी पैशाची मदत केली आहे. हे पैसे देत असताना 'परतफेडीचा विचार मनात बाळगू नकोस,' असं ते आवर्जून आणि अत्यंत हळुवारपणे सांगत. बी. ए. च्या वर्षी माझी बरीच आर्थिक तंगी होती. त्या काळात (१९४८–४९) त्यांनी मला एकरकमी पाचशे



रुपयं काढून दिले त्यापूर्वीही त्यांनी वाचून खुणा केलेल्या पुस्तकातून टिपणं काढण हे काम मी सवेतन केलेलं आहे, डॉक्टरांच्यावरचा वह्या तपासण्याचा भार कमी करावा म्हणून शाळेन त्याना एक विशेष सवलत दिली होती– त्यानी निबंधाच्या वह्या तपासण्याचं काम दुसऱ्या कुणाकडून करून घ्यावं, त्याचे पैसे शाळा देईल. मला मदत व्हावी म्हणून हेही काम मी कॉलेजमध्ये असताना त्यानी मला दिलं होतं. जे विद्यार्थी त्याच्या मते त्याच्या कार्याच्या दृष्टीन पुढं विशेष उपयोगी पडतील असं त्याना वाटे, त्यांची तर ते हरतऱ्हेनं काळजी घेत. तरुण विद्यार्थ्यांच्या लैंगिक प्रश्नाबद्दलही ते सुजाण जाणीव दाखवीत आणि नाजूकपणे मार्गदर्शन करीत.

◻

## ३ : मर्यादा–उणिवा–विसंगती

डॉक्टरांची शिक्षणपद्धती 'प्रभावी' होती यात संशयच नाही; पण ती परिपूर्ण होती असं म्हणणं कठीण आहे. विद्वत्तेतून व वक्तृत्वाच्या कौशल्यामधून श्रोत्याला, किंवा विद्यार्थ्याला वश करून घेणं यावर त्यांचा जोर होता. 'विद्यार्थ्याला खाऊन टाकणारे शिक्षक' असं डॉक्टरांचे एके काळचे विद्यार्थी प्रा चंद्रकुमार डांगे यानी म्हटलं आहे. ते विद्यार्थ्याला भरपूर 'देत' असत ह्यात काहीच शंका नाही. पण शिक्षणशास्त्रज्ञ नेहमी आपल्या ध्यानात आणून देतात त्याप्रमाणं 'Educate' ह्या शब्दाचा मूळ अर्थ विद्यार्थ्याला काही 'देणं' असा नसून त्याच्याकडून 'काढून घेणं' म्हणजेच, त्याला विचाराला प्रवृत्त करणं असा आहे आणि ह्या बाजूनं विचार करू लागलं म्हणजे डॉक्टरांच्या शिक्षणपद्धतीतील त्रुटी जाणवू लागतात. शाळेच्या किंवा कॉलेजच्या वर्गात वरील अर्थानं खरं शिक्षण देणं एकूण कठीणच असत विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देणं, त्याला उत्तेजन देत राहणं, त्याला वैचारिकदृष्टचा स्वावलंबी बनवीत राहणं, त्याच्या ज्या अपरिहार्यपणे चुका घडतील त्याबद्दल उदार भूमिका घेणं, मतभिन्नतेची शक्यता स्वीकारणं– अशी ही प्रक्रिया असते असं शिक्षण द्यायचं तर त्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांच्यामध्ये बराचसा वैयक्तिक संबंध यावा लागतो. शाळा कॉलेजच्या मोठ्या वर्गातून आणि आजच्या शिक्षणाच्या पद्धतीत ही प्रक्रिया अशक्यच आहे. त्यामुळ डॉक्टरांनी शाळाकॉलेजात कोणत्या पद्धतीनं शिकवले हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नाही, पण अभ्यासमंडळ हे निवडक विद्यार्थ्यांसाठी होतं आणि त्याला प्रचलित शिक्षणपद्धतीची चौकट नव्हती. तेव्हा तिथ डॉक्टर कोणती पद्धती वापरीत हे पाहणं महत्त्वाच आहे. आणि ह्या बाबतीत डॉक्टरांनी काही फार वेगळ केल, असं जाणवत नाही. विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, निबंध लिहावे व अभ्यासमंडळापुढं वाचून दाखवावे असा त्यांचा अर्थातच आग्रह होता आणि ह्या बाबतीत आम्हीच कमी पडलो, ते नाही, हे खरंच आहे. पण स्वतंत्र विचारशक्तीला चालना मिळेल असं अभ्यासमंडळाच वातावरण नव्हतं. तत्त्वतः चर्चेवर, स्वतंत्र विचारावर, डॉक्टरांची श्रद्धा होती, पण प्रत्यक्ष व्यवहारात त्यांचं वर्तन काहीसं विसंगत होतं. मतभेद त्यांना एका मर्यादेपलिकडे चालत नसे. विद्यार्थ्यांना अभ्यासाला प्रवृत्त कर-

तानासुद्धा 'तुम्ही अभ्यास करा, पण तुम्ही ज्या निष्कर्षाला येणार तो माझ्याकडं अगोदरच आहे' अशा प्रकारचा एक सूक्ष्म अभिप्राय त्याच्या मनात असे अशी शंका येते. कधी एखादा प्रश्न विचारला तर ते उसळून येत. दीर्घ चर्चेत काही वेळानतर ते असहिष्णु होत. कधी-कधी ते वकिली पद्धतीन उत्तरं देत. त्याचे समकालीन व समव्यवसायी त्याना 'आग्रही' म्हणत असत. आम्ही हा शब्द वापरीत नसू, पण आमच्यापैकी बऱ्याच जणांना त्याचा हा स्वभाव जाणवू लागला होता. त्यामुळं अभ्यासमडळात आम्ही सर्वजण बहुधा दबूनच असू. प्रश्न आडवळणानं आणि भीतभीत विचारीत असू. सरळ आणि जिद्दीन प्रश्न विचारीत राहणारा आमच्यापैकी फक्त एक विद्याधर गोडाबे होता. त्याला डॉक्टर 'वितंडवादी' म्हणत. पण विद्येच्या क्षेत्रात आम्हा सर्वांमध्ये अत्युच्च स्थान पटकाविलेला तोच आहे. कॅनडातल्या वॉटर्लू विद्यापीठात तो सख्याशास्त्राचा प्राध्यापक आहे. संख्याशास्त्र (स्टॅटिस्टिक्स) ह्या विषयात त्यानं मूलभूत काम केलेलं असून, त्याची ख्याती आजकालच्या सवग नव्हे तर खऱ्या अर्थानं आंतरराष्ट्रीय आहे. गोडाबे मला आठवतो तसा त्या काळीही मनमानी, स्वतत्र बुद्धीचा, अगदी मुळातले प्रश्न बेधडकपणे विचारणारा होता. अशा विद्यार्थ्याची कुवत न कळणं हा डॉक्टराच्या शिक्षणपद्धतीचा पराभवच मानला पाहिजे.

एकूणच अत स्फूर्ती वगैरे गोष्टीना डॉक्टर आपल्या विचारपरिघात फिरकू देत नसत. शाळेत विद्यार्थ्यांना निबध लिहायला सांगताना तो 'स्फूर्तीन लिहिला तर छडया मिळतील' असा दम अर्धवट विनोदानं देत. विद्यार्थ्यांनी निबधलेखनाची शिस्त अगी बाणवायला हवी ह्या अर्थानं हे म्हणण ठीक होतं. पण डॉक्टरांच्या मनात एवढा मर्यादित अर्थ नव्हता. आणि त्याच्या एकूण वैचारिक दृष्टीशी हे सुसगत होतं. त्या दृष्टीत मानवी कर्तृत्व, अभ्यास, परिश्रम ह्याना परम महत्त्वाचं स्थान होतं. त्यांची वाङ्मयीन दृष्टीसुद्धा कलेपेक्षा कारागिरीला अधिक महत्त्व देणारी होती. किंबहुना 'कला' आणि 'कारागिरी' असा भेद अलिकडेचे समीक्षक निष्कारण करतात, दोन्ही एकच असं त्याचं मत होतं मर्ढेकराच्या 'आत्मनिष्ठावाद' वर त्यानी जळजळीत टीका केली आहे–पण मुख्य मुद्द्याकडे सर्वस्वी दुर्लक्ष करून. ते स्वतः लघुकथा कशा 'तयार' करून दाखवीत असत हे मागं सांगितलंच. एकदा विठ्ठलवाडीच्या सहलीला जाताना मी त्यांना विचारल, 'तुम्ही कधी कविता लिहिल्या होत्या का?' डॉक्टर म्हणाले, 'लिहिल्या नाहीत; पण लिहू शकेन असं वाटतं.' एकूण सर्व गोष्टी परिश्रमसाध्य असतात, असा त्यांचा ठाम विश्वास होता. एकदा कॉलेजमध्ये मराठीच्या लेक्चररची जागा भरायची होती. डॉक्टरांचाच विद्यार्थी असलेल्या आमच्या एका ललितलेखक मित्राची शिफारस विद्याधर पुडलिक यांनी केली. डॉक्टरानी त्याबाबत नापसती दाखवली. डॉक्टरांच्या डोळ्यापुढं असलेला दुसरा उमेदवार तसा एकूण सामान्य आहे असं पुडलिकानी सुचवून पाहलं. त्यावर डॉक्टर म्हणाले, 'तो कष्ट करायला तयार आहे ना? बाकीच सगळ मी बघून घेईन.'

डॉक्टरांना सगीतादी ललितकलांची आवड नव्हती. ह्या वस्तुस्थितीचं मूळही कदाचित त्याच्या त्या प्रवृत्तीत असेल. 'गाण तुम्हाला आवडत नाही का?' असं फार वर्षांपूर्वी मी एकदा त्यांना विचारलं, तेव्हा त्यांनी दिलेलं उत्तर मासलेवाईक आहे. ते म्हणाले, 'खरं म्हणजे आवडत. पण तिथ तबलाही वाजवतात!' 'हुबेहूब' छाप चित्रकला म्हणजे त्याना चित्रकलेचा परमोत्कर्ष वाटे; उलट टागोराची चित्रकला त्याच्या शिव्याशापाची धनी व्हायची. नृत्यातही ढोबळ शृंगारिक हावभावच त्याना स्पर्शून जात आणि नृत्यात पहाण्यासारख तेवढच असत असं त्याचं मत होत

## मैत्री नाही, भक्ती

एकदा ते बरेच आजारी पडले. तेव्हा माझे संगीतज्ञ बधू वामनराव यांना घेऊन मी त्याना भेटायला गेलो. 'फाइन आर्टस्‌कडे जरा लक्ष दिलत तर मनावरचा ताण कमी होईल' अस त्यानी सुचवलं. 'ते तर आयुष्यात सगळ चुकलेलच आहे' असं उपरतीच्या सुरात डॉक्टर म्हणाले. पुढ एकदा त्याच्यावर उपचार करणाऱ्या भिषग्वर्यानेच त्याना रोज काही वेळ संगीत ऐकायची शिफारस केली. डॉक्टरानी ताबडतोब लीलाबाई अर्जुनवाडकराकडं धाव घेतली, ध्वनिमुद्रिकांबाबत त्यांचा सल्ला घेतला आणि ध्वनिमुद्रिकाही त्याच्याकडून मिळविल्या. मग सध्याकाळचा एक ठराविक अर्धा तास सगीतश्रवणासाठी त्यांनी नियोजित केला, आणि अगदी घड्याळ पाहून व पूजेला बसाव तसं निष्ठेने गाण ऐकायला ते बसू लागले. तिसावं मिनिट होताच ते रेकॉर्डर बंद करीत. यात त्याच मनोविनोदन काय झालं कुणास ठाऊक, पण आम्हा मित्रमडळीच्या विनोदाचा तो कायमचा विषय झाला. ह्या घटनेचा आणखी एक 'फॉल आऊट' म्हणजे, निरनिराळ्या गवयाविषयीचे त्याचे अभिप्राय ऐकणं आमच्या नशिबी आल. त्यातल्या त्यात माणिक वर्मा त्यांना प्रिय झाल्या, इतर अनेक थोर व आम्हाला आदरणीय गवई त्यानी चक्क बाराच्या भावात काढले. नशीब त्या कलावंताचं की, डॉक्टरांनी मारलेले शेरे त्यांच्या कानावर गेले नाहीत. एका अर्थानं त्याना वाङ्मयाची चागली अभिरूची होती. निरनिराळ्या कादंबऱ्यांची कथानकं त्यातील स्वभावरेखांचे, रचनाकौशल्याचे बारकावे उकलून दाखवीत, ते मोठ्या रुचकरपणे सांगत. पण वाङमयातून स्फूर्तिदायी, भव्य-दिव्य असंच त्यांना हवं असे, किंवा गंभीर जीवनदर्शन तरी लागे एकदा मी 'सीक्रेट लाइफ ऑफ वॉल्टर मिटी' हा सिनेमा पाहिल्याचं त्यांना सांगितल. 'लाइफ' हा शब्द ऐकून त्यात स्फूर्तिदायक जीवनदर्शन वगैरे असणार असं त्यांना वाटल असाव, म्हणून मला त्यांनी कथानक सागायला सांगितलं. हीरो होण्याची दिवास्वप्न पाहाणाऱ्या एका तरुणावरचा विलक्षण कल्पकतेनं तयार केलेला तो एक विनोदी चित्रपट होता. गोष्ट सागून होताच डॉक्टर एक शब्दही बोलले नाहीत माझी कीव आल्यासारखी त्यानी चर्या केली इतकच.

डॉक्टरांची विद्यार्थ्यांशी असणारी जवळीक काहीशी मिश्र स्वरूपाची होती. याच कारण डॉक्टराच्या आणि आमच्या घडणीत मुळातच एक फरक होता. डॉक्टराच्यात एक कठोर आत्मसंयम आणि करारीपणा होता. याउलट आम्ही बहुतेकजण मनान दुबळे, मोहवश होतो. (हे विधान मी सर्वसाधारण स्वरुपाचं म्हणून करतो आहे त्याला काही अपवाद नक्कीच होते.) यातून एक कमीपणाची, अपराधीपणाची भावना आमच्या मनात वागत असे. आणखी एक गोष्ट अशी की डॉक्टर आपला 'जीवनातील करार' आमच्यात सक्रमित करण्याचा अखड प्रयत्न करीत; पण ह्या कसाला आम्ही उतरत नसू अशा अवस्थेत निर्माण होणारे परस्पर सबध फार मोकळेपणाचे

राहूण कठीणच असतं. त्यामुळे त्याच्या बाजूनं आमच्यावर प्रेम राह्यल आणि आमच्या बाजून त्याच्यावर भक्ती राहिली, तरी मैत्री-सदृश वातावरण कधी निर्माण झालं नाही. शिक्षक आणि विद्यार्थी हे नात मुळातच वयातल्या आणि भूमिकाच्या फरकामुळ पूर्ण मैत्रीत रूपातरित होण असभाव्य असत. तरीही वागण्या-बोलण्यात एक गाढ आपलेपणा आणि सहजपणा उत्पन्न होणं अशक्य नसतं आणि इतर शिक्षकाच्या सहवासात ही हृद्यता मी अनुभवलेली आहे. डॉक्टराचं व्यक्तिमत्त्व इतकं प्रखर होत की त्यांच्याशी फार जवळीक शक्य नसे. ते जरासे अतिमानवी कोटीतलेच वाटत. मी. बी. ए. ला असताना परीक्षेपूर्वी दोन महिने माझे वडील वारले. त्यावेळी मी गावी जाऊन आलो. क्रियाकर्मासाठी मला पुन्हा जायच होत. पण परीक्षा तोडावर आली असताना मी जाऊ नये असं डॉक्टराचं मत होत. अशा कर्मकाडाविषयी मला प्रेम होत अस नाही; पण माझी मनःस्थिती अर्थातच नाजूक होती. आणि मी जात नाही असंही मला म्हणवेना. 'हा मूर्खपणा होतोय', असं त्यानी निग्रहानं मला सागितल. 'Dead hand ruling from the sepulchre' स्मशानातली मृत माणसं आपल्या जीवितावर वर्चस्व गाजवतात) ही एका कवितेची जळजळीत ओळही त्यानी मला ऐकवली. मी जायचा तो गेलोच. डॉक्टरही सुदैवानं अशा गोष्टी मनात ठेवीत नसत. मात्र ते आपल्याला बाधून टाकीत असल्याची जाणीव अबोधपणे मनात उत्पन्न होई. त्याचा पहारा असल्यासारख जाणवे आणि त्याचा आतून काच होई.

## रंगदार घटक

आमचा एक मित्र शिक्षण चालू असतानाच प्रेमात पडला शिवाय त्याची आर्थिक स्थिती तर भयानक म्हणावी इतकी वाईट होती ह्या प्रेमाचे परिणाम काय काय होतील हे त्यातल्या उग्र तपशीलासहित समजावून सागून त्याला परावृत्त करण्याचा डॉक्टरांनी पराकोटीचा प्रयत्न केला. पण प्रेमच ते, त्यात तो वाहात जायचा तो गेलाच आणि डॉक्टरच पुढ म्हणाले त्याप्रमाण त्याची कधी नव्हे ती बत्तीशी वठली, म्हणजेच डॉक्टरानी भाकित केल्याप्रमाणं सर्व वाईट गोष्टी जशाच्या तशा घडून आल्या. पण ह्या सर्व अवस्थेत डॉक्टरांनी त्याच्यावर आपले मर्मघाती वाक्प्रहार चालूच ठेवले, आणि तो त्या मान्याखाली जास्तच शरमिंदा होत गेला. त्याची ही अवस्था आम्हाला पाहवेनाशी झाली होती. हे सर्व असूनही डॉक्टरांनी त्याला झिडकारला नाही, हेही सागितलं पाहिजे. सगळ बरवाईट पार पडल्यावर ते हळवे होत, मृदु स्वरात बोलू लागत, माणसं चुकतात असेही उद्गार काढीत आणि मदतीचा हात पुढे करीत. पण असा तत्त्वविचार त्याना शेवटी सुचे. तोपर्यंत ते जीव नकोसा करीत. मध्यमवर्गाला प्रेम परवडण्यासारखं नसन हा त्याचा आवडता सिद्धात होता. एम् ए., नोकरी आणि नतर प्रेम किंवा लग्न अशा सुव्यवस्थित क्रमाची ते शिफारस करीत.

ह्याचा अर्थ डॉक्टराच्या सहवासातले दिवस आनदाचे नव्हते असं नाही एक तर जीवनोत्साह डॉक्टरामध्ये रमरमलेला होता. आपल्यापेक्षा वयानं खूप लहान अशा तरुण विद्यार्थ्यांत आपल्या आयुष्याचा बराचसा हिस्सा त्यांनी व्यतीत केला तो उगाच नव्हे. त्याच्या समकालीनामध्ये ते रंगल्याचं आम्ही फारस पाहिलं नाही. तरुण विद्यार्थी हेच त्याचं जीवितसर्वस्व होतं. मोकळया मैदानांची, दऱ्याखोऱ्याची, मर्दानी खेळाची त्याना आवड होती चाळिशी उलटून गेल्यावरही फिरायला बाहेर पडल्यावर फार्ग्युसन टेकडीच्या पायथ्याशी येताच ते सपूर्ण चढण धावत-धावत चढून जात आणि मी आपला मागाहून सावकाश चालत जाई. ! नैसर्गिक, अपक्व, स्वादयुक्त अन्नाची त्याना विशेष रूची होती. त्यांची विनोदबुद्धी आणि उपहासप्रवणता कायम जागी असे आणि आमच्या संभाषणातून हास्याचे स्फोट नित्य बाहेर पडत. त्याचे काही विनोद तर आमच्या आठवणीत कायमचे घर करून बसले आहेत. आमच्या आसपास ज्या तरुणाचे प्रेमविवाह झाले, त्याच्या नवपरिणीत भार्या दिसायला एकजात सुमार होत्या. एका देखण्या, हुषार मित्राचं लग्न झाल्याची वार्ता आम्ही त्याच्या कानी घातली. तेव्हा त्यानी विचारलं.'बायको सुदर आहे की प्रेमविवाहच!' एकदा फिरताना एक सस्कृतचे प्रोफेसर बरोबर होते आणि समोरच्या दुकानावरील एका पाटीवरचा शब्द घेऊन त्यानी त्याची बरीच-ओढून ताणून व्युत्पत्ती लावली. त्याबरोबर 'दोन शब्द घेऊन त्याच्यामध्ये बरंच काही बोलत राहणं म्हणजे व्युत्पत्ती.' असा निष्कर्ष एका फटकाऱ्यासरशी त्यांनी काढला एकदा टिळक मदिरात आचार्य भागवताचं महानुभाव पंथावर व्याख्यान होतं. महानुभावानी क्राती केली अस ते सागत होते, आणि स्त्रियानी मासिक पाळीत अशौच पाळण्याची महानुभावाना गरज वाटत नव्हती हे त्या क्रातीचं उदाहरण म्हणून त्यानी दिलं. तेव्हा डॉक्टर म्हणाले, 'पुण्यातल्या दुकानाच्या बाहेर धोतरांच्या भावात क्राती' अशा पाट्या लिहिलेल्या असतात तसलीच ही क्रानी.' 'डोंगरे बालामृता'चा त्याचा विनोद आतापर्यंत खूप प्रसिद्धी पावलेला आहे. पण ज्याना माहीत नाही त्याच्यासाठी त्याचा उल्लेख केलाच पाहिजे. पुण्यातल्या एका गृहस्थाची अत्यत थोर विद्वान म्हणून ख्याती होती. पण उभ्या आयुष्यात चार ओळीच्या पलिकडे त्यानी कसलही लिखाण केलं नव्हत. मात्र त्याच्याविषयी नेहमी गौरवान बोलायच असा शिरस्ता होता. असं कुणी तरी बोललं. त्यावर डॉक्टर म्हणाले, 'डोगरे बालामृताचे उत्पादक फार श्रीमत आहेत. त्याची बरीच इस्टेट आहे हे अनेकाना माहीत आहे. पण काय विद्याधर, तुझ्या घरी बालामृताची बाटली आहे का? तुझ्या ? तुझ्या ?...' असं करीत सगळीकडे बोट फिरवून नकारार्थी उत्तर घेत त्यानी समारोप केला. 'ह्या गृहस्थांच्या विद्वत्तेच असच आहे. गाजावाजा खूप आहे. पण बाटली कुणाच्या पाहण्यात नाही.' वा म. जोशयाच्या एका कादबरीत एक श्रीमंत विद्यार्थिनी आपल्या प्रोफेसराना आतिथ्यासाठी महाबळेश्वर किंवा माथेरान असं कुठंतरी घेऊन जाते अस लिहिलेलं आहे. मराठी साहित्यातील वास्तवाची अभिरूची हा त्याच्या व्याख्यानाचा विषय होता. त्या सदर्भात त्यानी हे उदाहरण दिलं आणि साहित्य सघातल्या भर सभेत ते म्हणाले, 'आज जवळजवळ चाळीस वर्षं शिकवतो आहे, पण एक कार्टी अस कधी म्हणाली असली तर शपथ!' डॉक्टराच्या व्यक्तिमत्वात असे काही रगदार घटक खासच होते. त्यामुळं त्याच्या सहवासात एकही क्षण कंटाळवाणा जात नसे पण हास्यविनोद, मौज-मजा याना त्याच्या जीवनात माफक स्थान असे. मुख्यत. गभीर डोहावर वाऱ्यानं उठविलेले ते क्षणिक तरग असत. हे क्षण संपले की ते कामात मग्न होत. ह्या अर्थानं ते व्रती होते.

'व्रती' हा दचकावून टाकणारा शब्द आहे म्हणून खुलासा केला पाहिजे हा शब्द कर्मकांडप्रधान संस्कृतीच अपत्य आहे. डॉक्टराचा अंध कर्मकाडावर कधीच विश्वास नव्हता. त्याच व्रत आधुनिक, ऐहिक उद्दिष्टाशी डोळसपणे जोडलेलं होत.

तरीही ते व्रती होते हे राहतंच आणि ह्यामुळं एक अंतर राहचलं. आमच्यापैकी विशेष संवेदनाशील मंडळींना डॉक्टरांच्या विचारातील बंदिस्तपणा, आग्रहीपणा व क्वचित हिंस्रता त्रासदायक वाटू लागली. त्या काळात हे सर्व जाणवत होतं अस नव्हे. कारण तेव्हा डॉक्टराचा व्यासंग, त्याचा आलोक आणि त्यांची प्रतिपादनपद्धती यांचा प्रभाव आमच्यावर होता आणि त्रुटी जाणवत असल्या तरी त्याच्याखातर त्याच्याकडं मिळणारा बौद्धिक आनंद गमावायला आम्ही तयार नव्हतो. पुढं पुढं त्याची जाणीव अधिक व्हायला लागली. स्पष्टपणे आमचे डॉक्टराशी मतभेद होत असत. ते साहित्यविचाराबाबत. मराठी वाङमयात युद्धोत्तर काळात जे काही नवं घडू लागलं होतं त्याबद्दल त्यांच्या मनात मुख्यतः घृणा होती. यातच त्यांच्या साहित्यविषयक जाणिवेच्या मर्यादा आमच्या दृष्टीनं उघड होत होत्या. मात्र सुबुद्धपणे 'आपल्या अभिरुचीच्या शाखाच भिन्न आहेत', असं आम्हाला सागून आमची मतं आम्हाला ते बाळगू देत असत. पुढच्या काळात त्यानी आमचं स्वतंत्र अस्तित्व हळूहळू मान्य केल. डॉक्टराशी ज्याची अगदी विरोधी प्रतिक्रिया झाली. त्यात आमचे एक काहीसे ज्येष्ठ मित्र कै. राजाभाऊ (रा. बा) कुलकर्णी यांचा समावेश होता. राजाभाऊ वाङमयाचे, नाटयाचे, अभिनयकलेचे सूक्ष्म अभ्यासक आणि आस्वादक होते. त्याच्या एकूण वृत्ती अत्यंत तरल आणि संवेदनाक्षम होत्या. त्याचबरोबर त्याच्या स्वत च्या काही मानसिक प्रश्नामुळ ते एकाडे झालेले होते आणि तोल ढळवून बसलेले होते. डॉक्टराच्या सत्तरीचा एक छोटासा खाजगी समारंभ आम्ही त्याच्या अगदी जवळच्या काही विद्यार्थ्यांनी घडवून आणला होता. त्या दिवशी आमच्यापैकी प्रत्येकान स्वत.च बौद्धिक आत्मकथन करताना डॉक्टराकडून काय घेतलं आणि काय नाही याचा उल्लेख औचित्यपूर्ण रीतीन केला. राजाभाऊची पाळी आली तेव्हा त्यांनी डॉक्टराच्यावर शस्त्रच उगारलं. दुसरे एक भूगोलाचे शिक्षक कसे रम्यपणे आणि बुद्धीची कवाडं सताड उघडी ठेवून मुक्तपणान शिकतीत हयाचं डोळे विस्फारीत आणि सहर्ष वर्णन त्यानी केलं आणि डॉक्टरानी एका जखडबंद चौकटीत विचार करायला शिकवल असा स्पष्ट आरोप केला. राजाभाऊ त्या दिवशी हिशेब चुकवायलाच आले होते असं दिसतं. त्याचं बोलणं किती गंभीरपणे घ्यायचं हे त्याच्या स्वभावाची कल्पना असलेल्या आमच्यापैकी बहुतेकांना माहित होतं. ते म्हणत होते ते सगळच काही खरं नव्हतं, किंबहुना त्यातलं काही डॉक्टरावर सरळ अन्याय करणारं होतं. आणि ते बोलत असतानाच मी त्याना तसं सांगितलंही; पण राजाभाऊची तारच लागलेली होती आणि तीतून ते बाहेर येईनात. प्रसंग मोठा बाका होता. डॉक्टराना हा अपमान वाटेल आणि तोही त्याच्या वाढदिवसाच्या समारंभात अशी भीती माझ्या मनात होती. आमच्या सगळ्याच्याच पोटात गोळा उठला होता. डॉक्टरांचाही हा कसोटीचा क्षण होता. राजाभाऊची फैर चाललेली असताना मी डॉक्टराच्या चेहऱ्याकडं मधून मधून पाहत होतो. सुदैव असं की, ते अत्यंत शांतपणे आणि निर्विकार चेहऱ्यानं पण एकाग्रतेनं सर्व ऐकत होते. राजाभाऊचं भाषण संपलं, आमची सगळ्याची संपली. शेवटी दोन चार वाक्यातच डॉक्टरानी सौम्य आणि समजदार उत्तर दिल. 'मी तुम्हाला प्रेरणा दिली या बद्दल तुम्ही माझं ऋण मानलंत. मीही माझं श्रेय तेवढच समजतो. माझी मतच तुम्ही प्रतिपादन करावीत अशी माझी कधीही इच्छा नव्हती.' बस्स. रागाचा एक शब्द नाही. डॉक्टराच हे दर्शन फारच आश्वासक होत.

## बौद्धिक निर्णयांना अग्रक्रम

तसं पाहिलं तर स्वत चा अभ्यास डॉक्टर अत्यंत कसोशीनं करीत असं म्हटल पाहिजे. विरोधी मत समजावून घेण्याचा मनापासून प्रयत्न करीत. अडचण आली तर त्या विषयातील तज्ज्ञांकडं धाव घेत मार्क्सवादावर चर्चा करण्यासाठी ते डॉ. कोसांबी किंवा इतर मार्क्सवाद्याकड जात. महामहोपाध्याय पां. वा. काणे याच्या धर्मशास्त्राच्या इतिहासाच्या वाचनात अडचण उद्भवली तर ते त्यांना पत्र लिहून खुलासा मागवीत. एवढच नव्हे, तर स्वत च्या लेखांचीही इतरांशी चर्चा करीत. आपला प्रत्येक लेख जुने विद्यार्थी व सहकारी श्री. गं. म. साठे याना ते वाचून दाखवीत. पुण्यात असण्याच्या काळात बहुधा रोज मी त्याच्याबरोबर फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवर फिरायला जात असे. या फिरण्यात आपल्या अनेक लेखाची रूपरेषा ते मला समजावून सांगत व 'तुला कसा काय वाटतो?' अस मला विचारीत. हे सर्व असूनही एक गोष्ट राहतेच ती म्हणजे एका मर्यादेपलीकडे मुक्त चर्चेला त्याच्या एकूण स्वभावरचनेत स्थान नव्हतं ह्याचं एक कारण असं की डॉक्टराना काही तरी घडवून आणायच होत. वैचारिक क्रांती व त्यातून सामाजिक क्रांती घडवून आणायची होती, आणि हे तावडतोबीन करायचं काम होत. त्यात पुन्हा डॉक्टराचा स्वभाव अधिरा होता. एकदा एखादी गोष्ट ठरली की दुसऱ्या क्षणी ते तिच्या मागे लागत. हे ध्येय आणि हा स्वभाव ह्यांचा मिलाफ झाल्यामुळं धीम्या, विश्रब्ध चर्चेला अवसर मिळत नसे. सामाजिक शास्त्रांमधील बौद्धिक क्रियाच उद्दिष्ट समाजात काही चागल परिवर्तन घडवून आणण, हे आहे अस मान्य केलं तरी बौद्धिक प्रक्रियेच स्वरूपच असं असत की तिच्या बाबतीत फार घाई चालत नाही. तशी घाई केली तर तिच निखळ बौद्धिक स्वरूप शिल्लकच राहत नाही. विचारक्रिया प्रत्यक्ष कार्याशी (Praxis) जोडलेली असली पाहिजे असा मार्क्सवाद्याचा आग्रह असतो. 'आजपर्यंत तत्त्वज्ञानी जगाचं स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला. पण जग बदलणं हेच खरं महत्त्वाचं कार्य आहे,' अस मार्क्सचं एक सुप्रसिद्ध वचन आहे. म्हणजेच तत्त्वज्ञ.नी कृती करायची असते, नुसत तत्त्वज्ञ राहायचं नसतं. मला वाटत मार्क्सवादी परंपरेत बौद्धिक स्वातंत्र्याला ज्या मर्यादा पडलेल्या आहेत त्याचं हे एक तात्त्विक कारण असावं. डॉक्टरांच्या दृष्टीतही बौद्धिक क्रियेच्या मुक्ततेपेक्षा बौद्धिक निर्णयाना अग्रक्रम होता आणि हे केवळ अनुमान नाही. माणसानं अभ्यास आणि विचार केल्यानंतर 'कृतबुद्धी' व्हायला हवं, म्हणजेच त्याचा बुद्धिनिश्चय (conviction) झाला पाहिजे असं ते वारवार सांगत. 'कृतबुद्धी' हा शब्द त्यांनी मनुस्मृतीतून घेतला होता.

भूतानां प्राणिनः श्रेष्ठाः प्राणिनां बुद्धिजीविनः।
बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठाः नरेषु ब्राह्मणाः स्मृताः॥

ब्राह्मणेषु च विद्वांसः विद्वत्सु कृतबुद्धयः ।

कृतबुद्धिषु कर्तारः (कर्तृषु–ब्रह्मवादितः) ॥

–अशा एकेका पायरीनं श्रेष्ठत्व मिळत जातं आणि विद्वानाची पराकोटीची श्रेष्ठता 'कृतबुद्धी' होण्यात आणि शेवटी कर्तृत्व दाखविण्यात ('कर्तारः') आहे – येथपर्यंतचा भाग डॉक्टरांना आपल्या मताचा पोषक म्हणून फार उपयोगी पडे.

आणखी अशी गोष्ट की, हे निर्णय त्याच्या मनाशी जवळपास तयार झालेलेच होते. कमी पडत होता तो प्रचार. अभ्यास करणाऱ्या प्रचारकाची फळी निर्माण करण्यानं हा प्रश्न सोडविता येण्यासारखा होता. हे मी फार चटपटीत लिहितो आहे. प्रत्यक्ष स्थिती इतकी जखडबंद नव्हती. तरीही डॉक्टराची एकूण प्रवृत्ती कळण्याच्या दृष्टीनं मी म्हणतो त्याचा मतितार्थ खराच आहे.

अशा वातावरणात विशुद्ध वैचारिकतेवर बंधनं येणारच. ह्याचं एक उदाहरण सांगता येईल. कुटुंबसंस्था, पति-पत्नीमधील दृढबंध, त्यांचं स्थैर्य ह्या डॉक्टराना पवित्र वाटणाऱ्या गोष्टी होत्या. इतक्या की, त्या इष्ट आहेत हे गृहीतच धरून पुढची चर्चा केली पाहिजे असं त्याना वाटे. कोणत्या संदर्भात ते आठवत नाही, पण अभ्यासमंडळात एकदा रसेलच्या 'मॅरेज अँड मॉरल्स' ह्या पुस्तकाचा उल्लेख झाला. स्त्री-पुरुषाच्या मुक्त प्रेमाचा आणि मुक्त लैंगिक संबंधाचा ह्या पुस्तकात रसेलनं पुरस्कार केलेला आहे. डॉक्टराचं मत असं की असं मतप्रतिपादन करणं हा एक भयंकर सामाजिक गुन्हा असून त्याबद्दल त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. डॉक्टराच्या वैचारिकतेवर ही मर्यादा होती. कोणतीही गोष्ट श्रद्धेनं स्वीकारावयाची नाही. अगदी पवित्रतम मानलेल्या निष्ठांनाही आव्हान द्यायचं, हा वैचारिक संस्कृतीचा दंडक आहे. इतकी मूलगामी आणि अनिर्बंध वैचारिकता डॉक्टराना अभिप्रेत नव्हती.

डॉक्टराच अध्ययन आणि अध्यापन या दोहोमध्ये आणखी एक उणीव आज जाणवते. समाजाचा अभ्यास करणारान समाजाच्या चलनवलनाशी प्रत्यक्ष आणि जिवंत रीतीनं संबद्ध असणं जरूर असतं. तसं पाहिल तर डॉक्टरांची शिक्षणपद्धती एका अर्थानं 'पुस्तकी' होती. किंबहुना त्याचा स्वतःचा अभ्यासही 'पुस्तकी' होता. तसा तो नसावा ही जाणीव त्या काळात विद्यावंतांमध्ये फारशी नव्हती, हे डॉक्टराच्या प्रवृत्तीच एक स्थूल समर्थन म्हणून सांगता येईल. आजही खरोखर अशीच स्थिती आहे. पण तरीही या संदर्भात नारळकर आठवतात आणि त्याच्या दूरदृष्टीचं कौतुक वाटतं. ग्रामीण भागात भोजापूर या गावी वरच्या वर्गातल्या विद्यार्थ्यांची ते नियमितपणानं शिबिर घेत. 'भोजापूर'ची सहल हे नूतन मराठी विद्यालयाचं एक वैशिष्ट्य होत. ग्रामीण भागाविषयीची जाणीव प्राचार्य नारळीकरानी पहिल्यादाच आमच्या मनात निर्माण केली. डॉक्टराना मात्र या प्रकारच्या समाजदर्शनाची ओढ वाटली असं दिसत नाही.

डॉक्टर खर म्हणजे प्रा. माटे याचे विद्यार्थी. माटे ह्या विचारवंताच एक फार मोठं वैशिष्ट्य म्हणजे त्यानी महार–मांग इत्यादी उपेक्षितांमध्ये प्रत्यक्ष केलेल काम. दहा वर्षं त्यानी हे काम केलं आणि स्वतःच्या पदरचे, त्या काळात, वीस हजार रुपये त्यानी खर्च केले. त्यांचं रुपयात मोल आज किती तरी पटींनी होईल ! एकदा डॉक्टराना मी विचारल की, 'माटयाच्या अस्पृश्यता-निवारणाच्या कार्यात तुम्ही का भाग घेतला नाही?' डॉक्टर म्हणाले, 'मला ग्रंथकार व्हायच होतं.' डॉक्टरांची एक मर्यादा यात विदारक ठसठशीतपणान स्पष्ट होते.

## 'ग्रंथकार होण्यासाठी सोवळेपणा

मीच वर म्हटलं की प्रत्यक्ष कार्याशी जोडलेली वैचारिकता खरी वैचारिकता राहत नाही. त्यामुळं माझं हे म्हणणं विसंगत वाटेल म्हणून त्याचा खुलासा करण जरूर आहे. विचारवंतानं समाजव्यवहारात भागीदार झालं पाहिजे ते कार्यकर्ता म्हणून नव्हे, तर साक्षी आणि अभ्यासक म्हणून. त्यानं कार्यकर्ताही असायला हरकत नाही पण कार्य करतानाही त्यानं जागरूक साक्षित्वाची, विश्लेषकाची भूमिका सोडता कामा नये शिवाय, प्रत्यक्ष अनुभव हे अभ्यासाचं फार मोठं साधन असतं, ते दोन कारणानी. एक तर ज्या समाजाचं चिंतन आपण करू म्हणतो त्याचा केवढा तरी भाग अजून अज्ञात असून लिखित स्वरूपात उपलब्ध नाही. जे लिखित स्वरूपात उपलब्ध असतं तेही प्रत्यक्ष परिस्थितीशी ताडून पाहता अपुरं किंवा दिशाभूल करणारं असल्याचं अनेकदा जाणवतं. पूर्वी शिडाच जहाज पाण्यावरून जाताना डचमळू नये म्हणून त्याच्या तळाशी वाळूचा जड थर (Ballast) आथरीत असत. असा काहीसा परिणाम प्रत्यक्ष समाजव्यवहारात भाग घेतल्यानं होतो. विचाराला एक धर उत्पन्न होतो. डॉक्टराच्या विचाराची आणि भावनाची बुचकळ्यात पाडणारी आंदोलन आणि त्यांचा पुस्तकीपणा ह्यात अगदीच काही संबंध नसेल अस नाही. पण समाजव्यवहार, चळवळी हे तर सोडाच, डॉक्टर माणसाचा संपर्कही कामाशिवाय इतर वेळी टाळीत. विद्यार्थी केव्हाही घरी भेटायला गेला तर ते तावडतोब हातातलं काम बाजूला करून त्याच्याकड तोंड करून बसत हे खरं. पण बोलण संपल आहे अस त्याना वाटलं म्हणजे ते सावकाशपणानं कोपऱ्यात टांगलेल्या घड्याळाकडं मान वळवीत. मुलाखत संपल्याची ही आम्ही खूण समजत असू लग्नकार्यांना–विद्यार्थ्यांच्याही–ते क्वचितच जात अशी माझी समजूत आहे. इतका सोवळेपणा 'ग्रंथकार' होण्यासाठी त्यानी पाळलेला होता. अर्थात सगळाच समाजव्यवहार पाहणं एका अभ्यासकाला शक्यच नसत आणि म्हणून इतरानी केलेला अभ्यास आणि विचार यावरच त्याला बहुताशी गुजराण करावी लागते. पण प्रत्यक्ष अवलोकनान आपल्या विचाराला जो खोली लाभते ती नुसत्या वाचनातून प्राप्त होत नाही. त्यामुळं पुस्तकाच्या बाहेरच्या वास्तवाच्या एखाद्या अंशाच्या तरी संपर्कात राहणं बुद्धीला समाधानपणा येण्यासाठी अवश्य असतं.

अर्थात् डॉक्टर कधी अपवाद करीत नसत असं नाही १९४२ च्या चळवळीपासून काँग्रेस समाजवादी पक्षाला खूप लोकप्रियता लाभली होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, जयप्रकाश हे नेते नव्या युगाचे अग्रदूत म्हणून चमकू लागले होते. त्याच्या प्रचंड सभाना डॉक्टर आम्हाला घेऊन जात मला वाटतं १९४८ किंवा १९४९ साली समाजवादी पक्षाच्या महाराष्ट्र शाखेचं एक शिबिर ठाण्याला होतं. त्याच निरीक्षण करण्यासाठी बाळू (ग.र) दीक्षित व मी अशा दोघाना डॉक्टरांनी पाठविलं होत. शिवाय ह्या

पक्षाच्या सान्निध्यात राहून त्याच्या गरजेचं बौद्धिक काम आम्ही कराव असही त्याना काही दिवस वाटत होत. म्हणून दीक्षितला व मला त्यानी नानासाहेब गोऱ्यांकडे पाठविलं. त्यावेळी विशेष वादग्रस्त बनलेल्या एतद्देशीय सस्थानाच्या प्रश्नावर आम्ही टिपण करून द्यावं अस गोरे यानी सुचविल आणि आम्ही एक टिपण करून दिल होतं, अस आठवत. पुढं डॉक्टराचा समाजवादाबाबतही भ्रमनिरास झाला आणि ही क्रिया थडावली.

डॉक्टरानी ज्या बौद्धिक चळवळीचा पाया घालायचा यत्न केला, तिचं स्वरूप आज काय असावं हाही एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. डॉक्टरांना एका बाजूला अभ्यास–चिंतन आणि दुसऱ्या बाजूला प्रबोधन या दोन्ही गोष्टी सारख्याच मोलाच्या वाटत होत्या. किंबहुना प्रबोधनासाठी अभ्यासचिंतन ही त्यांची भूमिका होती. मात्र प्रबोधनाला टागलेला अभ्यास तत्त्वविचारापासून फारकत घेण्याचा धोका असतो. डॉक्टराचं असंच झालं, हे मी त्यांच्यावरील विचार-दर्शनात्मक लेखामध्ये सागितलंच आहे. डॉक्टराना ' व्यक्तित्व ' ह्या विषयावर एक मोठा ग्रथ लिहायचा होता. तोच त्यानी लिहायला हवा होता अस मला वाटतं. तस झाल असतं तर त्याच्या देशोदेशीच्या लोकशाह्याचे वर्णन करणाऱ्या शतावधी लेखापेक्षा त्याचं मोल अधिक झालं असतं. मला असही वाटतं की आपल्याकड प्रबोधन क्षीण आहे, याचं कारण मुळात तत्त्वविचार क्षीण आहे. बुद्धीला चालना देणारे नवे विचार निर्माण पावू लागले की समाजातल्या बुद्धिवंतांना ते प्रथम आकृष्ट करतात आणि प्रबोधनाला अनुकूल असं चैतन्य आपोआप निर्माण होतं. मग तत्त्वचिंतकानं आपल्या चिंतनाची फलितं मांडण्या-पलीकडे प्रत्यक्ष प्रबोधनात पडण्याची गरज राहत नाही. ही प्रक्रिया जास्त नैसर्गिक आणि फलदायी आहे असं मला वाटतं.

हे मान्य केलं तर दुसरा एक विचार अपरिहार्यपणे पुढं येतो. तत्त्वचिंतक आणि प्रबोधक याचे मन पिंड वेगवेगळे असतात. त्याना उत्तेजित आणि सघटित करण्याचे मार्गही म्हणूनच वेगळे असणार. तेव्हा ह्याबाबत करावयाच्या क्रिया फार पारखून करायला हव्यात. सैनिकाची वृत्ती दोन्हीकडे चालणार नाही. तत्त्वचिंतकाचा विचार केवळ निष्ठेतून पुढे जाणार नाही. तात्त्विक विच्छेदनक्रियेत, नव्या विचाराच्या उत्पादनात, म्हणजेच बौद्धिक सर्जनक्रियेत जो आनद असतो त्यानच, म्हणजे एका आतरिक उर्मीनंच, त्याला पुढं ओढीत नेल पाहिजे.

¤

## ४ : विद्यार्थ्यांना वारसा

**डॉ**क्टरांनी काय दिलं ?

डॉक्टराच सर्वात मोठं कार्य त्याच्या व्यापक शैक्षणिक आलोकात आणि त्याच्या अभिजात शिक्षकीय प्रेरणेत सामावलेलं आहे. त्यांची शिक्षणपद्धती कितपत आदर्श होती आणि त्यानी मांडलेले सर्वच विचार ग्राह्य होते की नाही, ह्या गोष्टी त्याच्या एकूण कर्तृत्वाच्या आलेखात दुय्यम आहेत.

ह्याचा अर्थ त्यांचं वैचारिक धन उपेक्षावं असा नाही. संकलित आणि साराश रूपान पाहता त्यांची महत्त्वाची वैचारिक देणगी मला पुढीलप्रमाणे दिसते. भारतीय समाजाची अधोगती आणि दौर्बल्य हा त्याच्या अविरत चिंतनाचा विषय होता त्यातून त्याना काही ठसठशीत समाजशास्त्रीय सत्यं गवसली. हिंदू समाजाला ' वास्तवाची अभिरुची' नाही, त्याची प्रवृत्ती स्वप्नाळू आणि भोळीभाबडी आहे. एखाद्या सामाजिक प्रणालीचा मूळ आशय किंवा आत्मा गमावून क्षुद्र स्वरूपाच्या बाह्य आचाराला कवटाळून बसण्याची, ' नरोटीची उपासना ' करण्याची त्याला खोड आहे. ह्याच्याशीच सबधित अशी वृत्ती म्हणजे पारलौकिक आणि निवृत्तिवादी दृष्टिकोन. त्याची दाट छाया सर्व जीवनावर कशी पसरून राहिली आहे हे त्यांनी दाखविलं. राष्ट्रीय-तेच्या प्रक्रियेची वेगळी आणि अधिक उदार उपपत्ती त्यानी लावली. लोकशाहीला अवश्य असणाऱ्या मानसिक सस्कृतीचे घटक त्यानी विस्तारान विवेचिले आणि ते आत्मसात करण्यासाठी किती परिश्रम अवश्य आहेत हे त्यांनी ध्यानात आणून दिलं. मानवी इच्छा आणि मन याच्या संजीवक सामर्थ्याचं व्यवहारात अत्यंत जरूर असलेलं भान त्यानी निर्माण केल.

मात्र त्याच्या एकूण चरित्रात शिक्षक म्हणून त्यांनी वठविलेली भूमिका अधिक मोलाची आहे, अस मला वाटत. त्या भूमिकेत त्यानी नेमक काय केल ? किंवा खरं म्हणजे ते काय करू पाहात होते ?

१. हा पुरातन आणि सर्वार्थानं पराभूत देश आधुनिक युगात आणून सोडण्याची त्यांच्या काळी जी खटपट चालली होती तीत ज्ञानसपादन, विचार आणि प्रबोधन याच क्षेत्र फारच लुळ राहिलं आहे, हे त्यानी हेरलं. एवढंच नव्हे तर अनेक प्रणालीच्या रूपानी ज्ञानाचं शत्रुत्व करणाऱ्या प्रेरणा कार्यकारी आहेत हे ध्यानात आणून दिल.

२. ज्ञान समाजोपयोगी करायच तर त्याचं सश्लेषण होत राहण अवश्य आहे. अस संश्लेषण म्हणजेच सामाजिक तत्त्वज्ञान. ते तयार झालं पाहिजे किंवा होत राहिल पाहिजे असा त्याचा आग्रह होता.

३. अशा तत्त्वज्ञानाच्या सिद्धीसाठी विचारवताची दृष्टी चौफेर फिरली पाहिजे हा त्याचा यापुढचा आग्रह होता. आज 'आंतर–विज्ञानीय' (इंटर डिसिप्लिनरी) अभ्यासाची गरज हमेशा बोलून दाखविली जात आहे. डॉक्टर स्वाभाविकपणेच आतर–विज्ञानीय प्रवृत्तीचे होते आणि हा नवा शब्दप्रयोग रूढ होण्याच्या बऱ्याच आधीच्या काळात त्यानी विद्यार्थ्यांवरही हेच तत्त्व ठसविलं.

४. अशी बौद्धिक चळवळ प्रस्थापित शिक्षण सस्थाच्या बाहेर करीत रहाण्याची गरज त्यानी ओळखली. याचं कारण असं की, महाविद्यालयामधून अभ्यासच बहुधा वर्जित राहतो आणि विद्या-पीठातून जो काय अभ्यास होतो तो विशिष्टीकरणामुळे तुकड्या–तुकड्यानी होत जातो.

५. आणि ही चळवळ त्यानी वैयक्तिक प्रयत्नातून प्रत्यक्ष सुरू केली.

ह्या सर्वच बाबतीत आणि विशेषत शेवटच्या बाबतीत डॉक्ट-रांच्या पूर्वकालचे प्रा. माटे आणि साधारणपणे समकालीन प्रा. गं. बा. सरदार यांच ऋण महाराष्ट्राला विसरता येणार नाही. आजही अशा वैयक्तिक उपक्रमांना पर्याय नाही, हा या सर्वांच्या कार्यातून मिळणारा सदेश आहे. अर्थात नव्या काळाच्या अनुरोधान अशा चळ-

वळीनं आता निराळं रूप घेतलं पाहिजे हे मी वर सुचवलं आहेच.

डॉक्टर शिक्षक म्हणून समजावून घेतले पाहिजेत ते ह्या संदर्भात. ते नुसते झपाटलेले शिक्षक नव्हते. लौकिक अर्थानं विद्यार्थ्यांचं भलं करू पाहणारे शिक्षकही नव्हते.

पण ते झपाटलेलेही होतेच. ह्या त्यांचा झपाटलेपणा लोकोत्तरच म्हणावा असा होता. त्यामागची प्रेरणा एखाद्या उदात्त धार्मिक प्रेरणेसारखी उन्नयन करणारी होती. आवश्यक देहधर्म सोडले तर प्रत्येक जागता क्षण त्यांनी वाचन, चिंतन, अध्यापन यात व्यतीत केला आणि विद्यार्थ्यांना घडविण्याचा अट्टाहास 'गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्' अशा निकरानं चालविला. वर्षानुवर्ष प्रत्येक दिवसाचा प्रत्येक वर्गावरचा प्रत्येक नवा तास, ही शिकविण्याची नवी आणि अभूतपूर्व संधी आहे अशा उत्साहानं आयुष्यभर घेतला. पुढच्या वर्षी शिकवायचे सगळे लेखक सुट्टीत पुन्हा एकदा समग्र वाचायचे असा त्यांच्या परिश्रमाचा आटोप होता. अनुपस्थिती क्वचित्. आमच्याच शाळेतले एक शिक्षक शंकर काशिनाथ गर्गे (नाट्यच्छटाकार दिवाकर) ह्यांनी छत्तीस वर्षांच्या नोकरीत एकही दिवस रजा घेतली नाही असं आम्ही ऐकलेलं होतं. डॉक्टरही त्याच परंपरेतले. शिवाय डॉक्टरांचं शिक्षकत्व वर्गाच्या चार भिंतीत कोंडून राहिलं नाही. ते अभ्यासमंडळात, प्राध्यापक सहकाऱ्यांशी केलेल्या चर्चांत, विद्यार्थ्यांसाठी आणि इतरांसाठी दिलेल्या जाहीर व्याख्यानांत, ग्रंथसंभारात आणि लेखसंभारात वाटा शोधीत ओसंडत राहिलं. त्यांनी मानसन्मानाची अपेक्षा केली नाही. पैशाचा लोभ धरला नाही; इतकं की अलीकडची काही वर्षं त्यांना आर्थिक विवंचना काढावी लागली. साधेपणानं आणि स्वदेशीपणानं ते जगले. मिळालेल्या चार पैशातूनही अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना मदत केली. अपत्यहीनतेमुळं त्यांच्या आयुष्यात एक पोकळी तयार झालेली होती आणि त्यांचा काहीसा एकारलेपणा तीतूनही आलेला असेल; पण जवळचे म्हणून मानले त्या विद्यार्थ्यांवरच नव्हे तर त्यांच्या कुटुंबावरही त्यांनी माया केली.

आम्ही त्यांच्याकडून काय घेतलं, आणि एकूणच त्यांच्या यत्नांना किती यश आलं हे प्रश्न तसे सोपे नाहीत आणि इथं विस्तारानं चर्चा करण्यासारखेही नाहीत. आज आम्हाला दोन गोष्टी आठवतात. एक डॉक्टरांचं व्यक्तिमत्त्वच असं होतं की आम्ही त्यांचे विद्यार्थी स्वतंत्र विचारांचे न होणं अशक्यप्राय होतं. कारण मुळात ते स्वतःच बंडखोर होते; त्यांना कुणाचाच मुलाहिजा नव्हता, वेळप्रसंगी त्यांच्या गुरुंचाही! शिवाय त्यांची जी काय प्रारंभीची असहिष्णुता होती ती कालांतरानं मावळली आणि वेगवेगळ्या भूमिकांचा संघर्ष त्यांना रुचू लागला. विशेष कटोकटीच्या चर्चेनंतर 'आज आपली चर्चा किती चांगली झाली, नाही?' असं तेच स्वतः म्हणू लागले. माणूस दिवाळी (१९८४) अंकातला त्यांच्या विचारदर्शनाचा लेख लिहिण्याअगोदर मी त्यांना विचारलं होतं, 'टीका केली तर तुम्ही रागावणार नाही ना?' तेव्हा ते म्हणाले होते, 'अरे, असं काय विचारतोस? विद्वानाचा अधिक्षेप होतो तो उपेक्षेमुळे, टीकेमुळे नाही.' त्यांनी अस्वस्थ व्हावं असं माझ्या लेखात बरंच काही होतं. पण माझा लेख वाचून त्यांनी पत्र लिहिलं, 'मी रागवावं असं लेखात काही नाही...पुन्हा सांगतो राग येण्यासारखं काही नाही.' दुसरी गोष्ट त्यांनी आम्हाला दिलेलं प्रेम आणि जिव्हाळा.

प्रारंभी दिलेल्या श्लोकात ह्या दोन्ही गोष्टी हृद्यपणे एकत्र आल्या आहेत.

> 'दगड्यांनो, गाढवांनो, शंखांनो, बैलोबांनो, म्हसोबांनो, इत्यादी संबोधनांनी आणि 'खुं'–'खुं' असा दर्पयुक्त आवाज काढीत तुम्ही आमची संभावना केलीत. त्या सर्व विशेषणांना आम्ही पात्रच आहोत असं घटकाभर समजूया.
>
> पण दोन गोष्टींसाठी आम्ही तुमचे ऋणी आहोत. एक, आम्हाला म्हणून जे सत्य वाटलं त्याचा निर्भय आग्रह आम्ही तुमच्या पुढ्यातही धरू शकत होतो. दोन, आमच्या सुखात आणि दुःखातही तुम्ही आमची साथ केलीत.

फार वर्षांपूर्वी डॉक्टर कॉलेजमधून निवृत्त होत असताना त्यांचे विद्यार्थी प्रा. अर्जुनवाडकर यांनी हा श्लोक त्यांना अर्पण केला होता. आता तर डॉक्टर ह्या जगातूनही निवृत्त झालेले आहेत. तेव्हा याहून अधिक समर्पक श्रद्धांजली त्यांना दुसरी कोणती वाहणार? □


डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०.

पुस्तके

# एका थोर लेखकाच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा नेटका वेध

'दस्तयेवस्की' हे श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांचं पुस्तक वाचलं आणि एक चांगलं पुस्तक आपल्या हाती आल्याचा अतिशय आनंद झाला. मराठी साहित्याच्या समीक्षेत अधूनमधून इंग्रजी, फ्रेंच, रशियन अशा भाषांतिल थोर कादंबरीकार, नाटककार, निबंधकार यांचे वारंवार उल्लेख येत असतात. त्यापैकी थोडे मुळातून वाचले जातात. या थोर पाश्चात्य साहित्यिकांच्या साहित्यावरील त्या भाषेतील किंवा अनुवादित समीक्षा तर सर्वसामान्य वाचकांकडून फार कमी वाचली जाते. त्यामुळे 'दस्तयेवस्की' या पुस्तकाचं मोल खूपच जाणवलं. अगदी मुखपृष्ठापासून संदर्भग्रंथांच्या यादीपर्यंत हे पुस्तक मला खूप आवडलं. एखाद्या थोर लेखकाच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा विविध अंगांनी नेटका वेध कसा घेता येतो याचं हे पुस्तक म्हणजे वस्तुपाठ आहे. या लेखनात व्यासंग आहे पण बोजडपणा नाही. परिश्रम आहेत पण 'केवढं मोठं काम मी अंगावर घेतलं आहे' अशी अहंकाराचा स्पर्श असलेली जाणीव नाही. दस्तयेवस्कीच्या थोरवीच्या मुल्यमापनात अनेकांनी अन्याय केला आहे ही लेखकाला बोच आहे पण त्याबद्दल कटुता नाही. मतभेद व्यक्त करताना अभिनिवेश नाही. दस्तयेवस्कीबद्दल निखळ प्रेम आहे पण त्याच्या साहित्याचं विवेचन अभ्यासातून तपासून घेऊन केलेलं आहे. या आणि अशा वैशिष्टयांमुळे या पुस्तकाबद्दल आणि त्याच्या लेखकाबद्दल आदर वाटला.

प्रास्ताविकात लेखकाने स्पष्ट केले आहे की हे पुस्तक म्हणजे प्रबंध नव्हे, दस्तयेवस्कीचं चरित्र नव्हे किंवा त्याच्या कादंबऱ्यांचं विश्लेषण किंवा रसग्रहणही नव्हे, तर हा दस्तयेवस्कीच्या साहित्यिक कामगिरीचा मागोवा आहे. याचं स्वरुप चिकित्सक लेखांचं आहे. दस्तयेवस्कीवरचं मराठीतलं हे पहिलं पुस्तक आहे. लेखकाचं हे ऋण मान्य करायला हवं. जे दोन-तीन लेख लिहायचे राहिले असा प्रास्ताविकात उल्लेख आहे ते लेख लौकरात लौकर लिहून प्रसिद्ध करावेत कारण तेही या पुस्तकातल्या लेखाच्या तोडीचे असतील याची खात्री वाटते. विशेषतः दस्तयेवस्की व टॉलस्टॉय यांची विस्तृत तुलना कशी निष्फळ ठरते या विषयीचा लेख आणि 'नोट्स फ्रॉम अंडरग्राऊंड'चा अस्तित्ववादावर कसा प्रभाव पडला आहे ते स्पष्ट करणारा लेख हे साहित्यप्रेमींना आणि अभ्यासकांना चांगलेच मोलाचे वाटतील. 'मराठी साहित्यप्रेमींना दस्तयेवस्कीकडे जायला प्रवृत्त करणे' हा या लेखनाचा हेतू साध्य होईल असा विश्वास वाटतो.

पुस्तकाच्या शेवटी दोन परिशिष्ट आहेत. पहिल्या परिशिष्टात दस्तयेवस्कीचा जीवनपट दिला आहे. दुसरे परिशिष्ट दस्तयेवस्की-टॉलस्टॉय संबंधाबाबतचे आहे. लेखन करताना ज्या ग्रंथांचा प्रत्यक्ष वापर केला आहे त्या निवडक संदर्भग्रंथांची सूची दिली आहे. त्या सूचीचं वैशिष्ट असं की त्या प्रत्येक ग्रंथाचं वेगळेपण, मोठेपण किंवा सामान्यपण मोजक्या दोन-तीन ओळीत लेखकाने आपल्यापुढे मांडले आहे. मूळ रशियन पुस्तकांच्या इंग्रजी अनुवादांची, एक दोन मराठी अनुवादांची आणि त्यातल्या चांगल्या वाईटाची माहिती देणारी ही सूची फार उपयुक्त आहे. 'दस्तयेवस्की' वाचकांनी रसज्ञतेने वाचावा ही लेखकाची तळमळ प्रास्ताविकापासून या सूचीपर्यंत सर्वत्र दिसते.

या पुस्तकात दस्तयेवस्कीवर एकूण आठ लेख आहेत. केवळ आठ लेखात एवढ्या मोठ्या लेखकाचं व्यक्तिमत्त्व उलगडून दाखवणं, त्याच्या साहित्याचं मर्म विशद करणं हे काम सोपं नाही; पण इथे ते सहजसाध्य झालेलं दिसतं. कारण या लेखनामागे सखोल चिंतन आहे. नुसती माहितीची जंत्री नाही.

## प्रेमाचा झंझावात

'दस्तयेवस्कीय कादंबरी' या पहिल्या प्रकरणात आधुनिक कादंबरीवर फ्लोबेर एवढाच दस्तयेवस्कीचा प्रभाव आहे असे सांगून त्याच्या कादंबऱ्यांची वैशिष्टये स्पष्ट केली आहेत. अस्तित्ववादी विचारसरणीच्या संदर्भात 'नोटस् फ्रॉम अंडरग्राऊंड' या कादंबरीचे महत्व थोडक्यात सांगितलं आहे. दस्तयेवस्कीच्या प्रत्येक कादंबरीमागे एखादी मूलभूत संकल्पना (Idea) असते, त्याचप्रमाणे वैचारिकता आणि नाटयमयता हीही त्याच्या कादंबऱ्यांची वैशिष्टये आहेत. ही नाटयमयता भडक कृत्यातून येते तशीच अनपेक्षिततेतूनही येते. हे नाटय नेहमी आंतरिक असतं. हे सारं विवेचन 'द इडियट', 'द डेव्हिल्स', 'क्राइम अँड पनिशमेंट' या कादंबऱ्यांमधील उदाउदाहरणं देऊन केलेलं आहे. दस्तयेवस्कीय कादंबऱ्यांच्या आणखीही वैशिष्टयांचा आधार उहापोह करून जे 'जगण्यासाठी' साहित्य वाचतात अशांसाठी दस्तयेवस्कीच्या कादंबऱ्या आहेत असा अभिप्राय नोंदवला आहे. 'कादंबऱ्यातील जीवनप्रक्षेपण' या दुसऱ्या प्रकरणात दस्तयेवस्कीच्या आयुष्यातील सहा घटनांचा त्याच्या साहित्यावर कसा प्रभाव पडला आहे याची चर्चा आहे. या घटना म्हणजे त्याच्या वडिलांचा खून, मनोविकृती, फाशीची शिक्षा व सुटका, तुरुंगवास, पोलिना प्रेमप्रकरण आणि जुगार. हे मूलभूत अनुभव आणि या अनुभवांकडे पहाण्याची स्वतंत्र दृष्टी यातून त्याच्या कादंबऱ्यांना विशिष्ट रूप कसं प्राप्त झालं आहे ते दाखवलं आहे. 'दस्तयेवस्कीच्या बांधिलकीचे स्वरूप' या प्रकरणात त्याची मूलभूत बांधिलकी माणसाशी होती. 'माणूस' हा शब्दच दस्तयेवस्कीच्या संदर्भात अर्थाची वलये आणि तेजाची झळाळी घेऊन उठतो असे सांगून लेखक म्हणतो— 'माणूस नावाच्या झंझा-

वाताला दस्तयेवस्की व्यासाप्रमाणेच सामोरा जातो.' हे भाष्य दस्तयेवस्कीबद्दल बरंच काही सांगून जातं. दस्तयेवस्कीच्या कादंबऱ्या वाचताना 'छाया–व्यक्ती' चा सिद्धांत का आणि कसा समजावून घ्यावा लागतो याची चर्चा एका प्रकरणात आहे. 'स्त्री-व्यक्तिरेखा' या प्रकरणात, स्त्री-मुक्ती चळवळीचा उदय, दस्तयेवस्कीचा स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोन याबद्दल सविस्तर लिहिलं आहे. दस्तयेवस्की स्त्रियांकडे स्त्रियांच्या नजरेतून न पहाता पुरुषांच्याच नजरेतून पहातो. त्यानं रंगवलेली स्त्री 'श्रद्धा' म्हणून दीपस्तंभासारखी उभी रहाते चिरंतन क्षमाशीलता आणि प्रेम यांच प्रतीक म्हणून प्रकाशत रहाते असं मत व्यक्त केलं आहे. दस्तयेवस्कीमधील प्रेम हे प्रेमाच्या रोमँटिक कल्पनांपासून दूर जाणारे आहे. ते झंझावात म्हणून येते. जीवने उध्वस्त करते आणि उध्वस्त झालेल्या जीवनातही तेच नवचैतन्य निर्माण करते. वसंतबहार घेऊन येते. स्वातंत्र्याबरोबरच एक ईश्वरी, दैवी मूल्य म्हणून तो प्रेमाचा गौरव करतो. त्यात आर्तता आणि हृदयाला भिडणारी तीक्ष्णता असते. हे विचार अनेक उदाहरणांनी स्पष्ट केले आहेत. दस्तयेवस्कीच्या कादंबऱ्या या तत्त्वज्ञानात्मक असल्याने त्याच्या तत्त्वमंथनाचं स्वरूप सांगणं अत्यावश्यकच होतं. संवाद, वादविवाद, स्वगतपर चिंतनं, अशा अनेक प्रकारांनी हे तत्त्वमंथन त्याच्या कादंबऱ्यांमध्ये येतं. या तत्त्वज्ञानाची पहिली दिशा बंडाची आहे. दुसरी, नव्या माणसाच्या सामान्य निर्मितीची आहे. तिसरा प्रकार आत्महत्येचा आहे या तिन्ही प्रवाहांचं दर्शन 'नोट्स फ्रॉम अंडरग्राउंड' मध्ये घडतं असं सांगून टॉलस्टॉय आणि दस्तयेवस्की यांच्यातील फरक दाखवला आहे. दस्तयेवस्कीची कलेविषयीची, सौंदर्याविषयीची भूमिका, त्याचं एकुण विचारविश्व याची मुळातूनच वाचायला हवी अशी मीमांसा या प्रकरणात आहे. 'विश्वबंधुत्वाचा उद्घोष' हेही अतिशय महत्त्वाचं प्रकरण आहे. दस्तयेवस्कीच्या साहित्याचा या दृष्टिकोनातून केलेला अभ्यास आजच्या काळातही खूप काही शिकविणारा आहे. 'ब्रदर्स कारमाझफ' या कादंबरीच्या संदर्भात केलेलं विवेचन आणि पृष्ठ १२९ वरील मिखाईलच्या तोंडचं अवतरण प्रत्येकानं मनन करावं असं आहे.

आपल्या एकेका साहित्यकृतीतून जीवनदर्शनाच्या निबिड अरण्यात आपल्याला घेऊन जाणारे थोर कलावंत आपल्याला चिरंतनत्वाच्या वाटा दाखवत असतात, श्रीमंत करीत असतात, याची, अशा पुस्तकांमुळे पुनः पुनः जाणीव होते. मराठी साहित्यविश्वात मोलाची भर घालणाऱ्या या लेखक-प्रकाशकांनी असंच खूप देत रहावं ही उत्कट इच्छा!

—मेधा सिधये

दस्तयेवस्की
अनिरुद्ध कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृष्ठे : १३५, किमत : २५ रुपये

# शब्दांचं अंगण

## चरित्र वाङ्मय

आशा कर्दळे

मी लिहिलेली चरित्रं वाचकांच्या टेबलावरील कथा–कादंबऱ्यांचं उच्चाटन करील' असे उद्गार एका प्रसिद्ध पाश्चात्य चरित्रकारानं काढले होते. म्हणजे चरित्रात कथा–कादंबरीइतकंच लालित्य येऊ शकतं हे त्याला अभिप्रेत होतं. भारतीयांचं, विशेषतः मराठी वाचकांचं ग्रंथप्रेम लक्षात घेता हे या मातीत साध्य होईल, असं वाटत नाही. अजूनही आपल्या मनात चरित्र म्हणजे एक बोजड वाङ्मयप्रकार ही गाठ पक्की आहे आणि त्यात लालित्य आणण्याच्या प्रयत्नात ती चरित्रात्मक कादंबरी या सदरात जाऊन पडते. मग पूर्ण सत्य हवे असणारे त्यातल्या काल्पनिकाला नाकं मुरडतात. तेव्हा चरित्र, चरित्र म्हणूनच आस्वादणं हेच चांगलं.

सामान्यांपेक्षा वेगळं, कर्तृत्वपूर्ण आयुष्य व्यतीत केलेल्या व्यक्तीचं चरित्र लिहिण्याचा मोह होणं अगदी स्वाभाविक आहे.

वि. ग. पेंडसे– एक अदम्य उत्कट चैतन्य हे कै. अप्पा पेंडसे यांचं डॉ. स्वर्णलता भिशीकर यांनी लिहिलेलं चरित्र एका बहुढंगी व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेण्याच्या दृष्टीनं मौलिक ठरावं. अप्पा पेंडसे हे पुण्यातल्या ज्ञानप्रबोधिनी या संस्थेचे संचालक होते. देशाचं रूप पालटण्याचा उत्कट ध्यास त्यांना होता. स्वप्नं खरी करणारा तो माणूस होता. ज्ञानप्रबोधिनीमधल्या प्रज्ञा मानस संशोधिका या विभागाचे जनक तेच होते. ते झंझावाती क्रिकेट खेळायचे. गीतांना सुरेख संगीत द्यायचे. बासरी सुंदर वाजवायचे. संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी आयुष्य वेचलं. सिंहगडाच्या पायथ्याशी ग्रामविकासाचं कार्य केलं. नेतृत्वशैली आणि नेतृत्वशिक्षण या विषयात त्यांनी डॉक्टरेट मिळवली. आयुर्वेद, मानसशास्त्र या विषयात संशोधन केलं. पूर, दुष्काळ अशा अनेक आपत्ती–निवारणाची कामं केली. मनः–शक्तीने व्याधीमुक्त करण्याचे प्रयोग त्यांनी केले. दारूबंदी पर्व ही कल्पना त्यांनीच रूढ केली. ज्ञानप्रबोधिनीवर त्यांचं अपार प्रेम होतं. एकाच व्यक्तीच्या ठिकाणी एकवटलेले इतके गुण पाहून थक्क व्हायला होतं. पण तरीही लेखिकेनं अप्पांना तेजोवलय चिकटवण्याचा कुठेही प्रयत्न केला नाही. अप्पांविषयी भक्ती आहे पण भोळाभाव नाही. अतिशय साधेपणानं आणि आत्मियतेनं हे चरित्र लिहिलं आहे.

समाजाचा एक घटक असूनही, अज्ञान आणि दारिद्र्य यामुळे छळ आणि गुलामगिरीचा बळी ठरलेला आदिवासी समाजापासून बाजूलाच पडलेला आहे. आदिवासी कल्याणाच्या अनेक योजना आखल्या जातात. पण हा पाऊस काही त्यांच्या गावापर्यंत पोहोचत नाही! 'आदिवासी' हा राजकारण्यांना नक्राश्रू ढाळायला परवलीचा शब्द. पण आदिवासींसाठी पोटतिडिकीने खरोखर काही केलं असेल तर गोदावरी परुळेकर आणि ताराबाई मोडक यांनीच! आदिवासींना या वंदनीय स्त्रिया ताराबाई मोडक यांचं चरित्र लिहिलं आहे पद्मजा फाटक यांनी. 'ताराबाई मोडक' असंच चरित्राचं

नाव. आदिवासीविषयीची ताराबाईंची सगळी कणव सगळा अकृत्रिम जिव्हाळा त्यात पुरेपूर उतरला आहे. आदिवासीसाठी आयुष्य वेचायचं ही गोष्ट त्यांना मनापासून पटली. व म्हणून त्यानी ती केली. आदिवासीची जमात खरं तर केवढी मोठी ! पण त्यांना शतकानुशतकं मागे ठेवून, डोंगरात जगलात घालवून, मूठभर लोक पुढारलेले झाले आणि त्याच्या कपाळी 'मागास' हा शिक्का कायमचा उमटवला. त्याना सर्व दृष्टीनी पुढे आणणं हे ताराबाईना आपल्यासारख्या सुशिक्षित म्हणवणाऱ्यांचं कर्तव्य वाटत. आदिवासीच्या नव्या पिढीला खतपाणी देणं, त्याच्या मुलाबाळांना घडवणं, शिकवणं हे त्यांनी जीवितकार्य मानलं. हे काम कोणी करत नव्हते. तेव्हा त्यानी ठरवलं, उरलेल आयुष्य त्याच्यासाठी खपायचं. कोणती अदम्य प्रेरणा त्याना डोंगरदऱ्यात घेऊन गेली ? केवळ माणुसकी. दुःखाचे आणि संकटाचे आघात काही वेळा उदंड कार्यशिल्प घडवून जातात. आयुष्यातल्या संकटानी आणि अपयशांनीच ताराबाईना मानवताप्रेमाचा मंत्रही जाता जाता दिला. १८९२ ते १९७३ या आयुष्यात याच मंत्राचा घोष त्यांनी केला. के. व्ही. मोडकाशी त्याचा प्रेमविवाह झाला, पण तो असफल ठरला. त्यानी गृहत्याग केला. बालशिक्षणापासून त्यानी आपल्या समाजसेवेला आरंभ केला. भावनगर, मुंबई इथ त्यांचं बालशिक्षणाच काम सुरू झालं. त्यांनी अनेक ग्रामीण बालवाड्या काढल्या. महात्मा गांधींची आणि त्यांची भेट झाल्यावर तर कार्याला वेगवान आशीर्वादच लाभला. बोर्डी, कोसबाड या आदिवासी भागात त्यानी विकासवाडीला प्रारंभ केला. या भागात पाळणाघरं काढली. स्त्रिया मजुरीवर जाताना त्यांच्या तान्हुल्याचे हाल होऊ नयेत म्हणून सरकारनं 'पद्मभूषण' हा किताब देऊन ताराबाईंचा सन्मान केला. तरीही आदिवासीच्या सर्वांगीण विकासासाठी ताराबाईनी काम केलं,त्या हजारो आदिवासीची सदिच्छा त्यांना अधिक भूषवून गेल्या. पद्मजा फाटक यांनी अतिशय रसाळ आणि आकर्षक शैलीत हे चरित्र लिहिलं आहे.

श्री. रामभाऊ जोशी यानी लिहिलेली दोन लहान लहान चरित्रं यशोदा प्रकाशनतर्फे अलिकडेच प्रकाशित झाली. त्यापैकी एक 'सार्वजनिक बाबूराव' या नावाचं, मुंबईचे माजी महापौर श्री. बाबूराव शेटे यांचं चरित्र. प्रत्येक वेळी चरित्रविषय झालेली व्यक्ती मोठेपणाच्या मोजमापात बसलीच पाहिजे असही नाही. लेखकाला जर एखाद्या व्यक्तीविषयी आदर वाटत असेल, तर तो त्या व्यक्तीच चरित्र लिहू शकतो. त्या व्यक्तीचं जीवन सर्वसामान्यापेक्षा काही तरी निराळ असत, म्हणूनच चरित्र लिहावसं वाटतं.

## केतकर–सावरकर

कऱ्हाड तालुक्यातल्या येळगाक या गावी शेतकरी कुटुंबात जन्मलेला एक कष्टकरी मुलगा. मुंबई आपल्याला पोटाला लावेल या विश्वासान तो मुंबई गाठतो. प्रथम हातगाडी ओढून घाम गाळतो. पण मुंबईशी त्याच्या नशिबाचे धागे जरीच्या गोफात विणलेले होते. फूटपाथवरचा एक हमाल आपल्या कर्तृत्वानं चढत चढत वर जातो. तो कुठवर पोचावा ? तो थक्क मुंबई महानगरीचा प्रथम नागरिक होतो ! त्याचा आश्चर्यकारक असा हा प्रवास रामभाऊनी चितारला आहे. आपल्या महापौरपदाच्या कारकिर्दीत अनेक लक्षात राहण्याजोगी कामं बाबूरावानी केली. निरनिराळ्या क्षेत्रातल्या गुणीजनाचा सत्कार करण्याची प्रथा त्यानीच प्रथम सुरू केली. महापौरपदाचा डौल त्यानी कधी मिरवला नाही. सामान्य माणूस म्हणूनच वावरणं त्याना आवडायच. या पुस्तकात समविष्ट केलेली सर्व छायाचित्रं अतिशय बोलकी आहेत. रसिक, साहित्यप्रेमी, कलाप्रेमी, समाजसेवक, मोठ्या जागतिक नेत्याबरोबर वावरणारा बुद्धीवादी अशा अनेक पैलूवर प्रकाशझोत टाकणारी ही छायाचित्रे बाबूरावाच्या शब्दचित्रात आणखी काही रग भरतात. अनेक थोर व्यक्तीनी भूषवलेल्या खुर्चीत बसलेले बाबूराव आणि त्याच्यामागे मुंबई महानगरपालिकेच्या देखण्या वास्तूच छाया चित्र हे मुखपृष्ठही आकर्षक आहे. 'ही ज्योत अनताची' हे श्री. रामभाऊ जोशी यांनी लिहिलेल कै. वेणूताई चव्हाण याचं चरित्र. यशवंतराव आणि वेणूताई ही रामभाऊ जोशीची श्रद्धास्थान. वेणूताई चांगल्या सुखवस्तू कुटुंबात जन्मल्या. ज्या वेळी त्याचा यशवतरावांशी विवाह झाला त्यावेळी यशवतराव स्वातंत्र्यसैनिक होते. नतरही त्याच्या राजकीय नेतृत्वाला त्या पूरकच ठरल्या. वेणूताई वृत्तीन श्रद्धाळू आणि धार्मिक होत्या. पण आपली भाविकता त्यानी पतीच्या कार्याआड येऊ दिली नाही. तसच इतर उच्च अधिकाऱ्यांच्या स्त्रियाप्रमाणे न पेलवणारी लुडबूडही केली नाही. एक साधी सोज्वळ गृहिणी म्हणून त्या जगल्या. यशवतरावानी अनेक सत्तास्थान भूषवली, पण त्या पदांना आपल्या कोणत्याही कृत्यानं कमीपणा येणार नाही याची वेणूताईंनी कटाक्षानं काळजी घेतली. पोटी संतान नव्हती, पण वात्सल्याचे झरे नोकर, चाकर आप्त नातलग या सर्वांसाठी त्यानी खुले केले. त्या यशवंतरावासाठीच जन्मल्या आणि जगल्या. सततची आजारपण वेणूताईंच्या पाठीशी लागलेली. त्यामुळं पोखरलेल्या शरीराला जीव लवकरच सोडून गेला भारतीय साध्वीच्या जीविताच एक उत्कृष्ट प्रतीक म्हणून हे चरित्र सग्राह्य ठरेल.

श्री. द. न गोखले यांनी लिहिलेलं ज्ञानकोशकार डॉ श्रीधर व्यकटेश केतकर यांचं चरित्र अतिशय वाचनीय आहे. मॅजेस्टिक प्रकाशननं ते प्रकाशित केलंय. श्री. गोखले यानी चरित्राच्या बरीच वर्ष आधी डॉ. केतकराचा जीवनवृत्तात देणारी एक छोटी पुस्तिका प्रसिद्ध केली होती. आता हे पूर्णाकार चरित्र. ज्ञानासाठी आयुष्याचा होम करणाऱ्या ज्या व्यक्ती महाराष्ट्रात या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेल्या, त्यात डॉ. केतकराची गणना अग्रक्रमानं करायला हवी. त्याच जीवन हा एक ज्ञानयज्ञ होता. त्याच्या ज्ञानाच्या असीम कक्षा पाहिल्या म्हणजे असं वाटत, की ज्ञानशक्तीला मानवी देह धारण करायची इच्छा झाली असेल आणि तिनं केतकर याच्या शरीरात प्रवेश केला असेल ! डॉ. केतकराचं साहित्य, व्यक्तिमत्त्व आणि कार्यक्षेत्र इतकं अफाट, की माणूस आपल्या लहानशा आयुष्यात केवढ प्रचंड कार्य करून ठेऊ शकतो याचा ते आदर्श ठरावं. त्यांच्या लेखणीला विषयांच बधन ठाऊकच नव्हतं. ज्ञानकोश हे त्याचं सर्वात मोठ कार्य. त्या शिवाय त्यांनी भारतभर भ्रमण करून भारतातल्या तीन हजार जाती, आपली समाजरचना याचा सखोल अभ्यास केला. त्यावर त्यानी महाराष्ट्राचा प्रचंड इतिहास

लिहिला. समाजशास्त्र हा त्याच्या विशेष जिव्हाळ्याचा विषय. अर्थशास्त्र, कायदा, राजकारण, काव्यशास्त्र या सर्व विषयावरची त्याची पुस्तकं त्याच्या विद्वत्तेची साक्ष देतात. सामाजिक समस्यांची चर्चा घडवून आणण्यासाठी त्यानी सात कादबऱ्या लिहिल्या. श्री. गोखले यांनी केतकराच्या खळबळ उडवून देणाऱ्या काही विधानांचा परामर्ष घेताना अतिशय नि:पक्षपाती विवेचन केल आहे. तसंच वरवर विक्षिप्त वाटणाऱ्या केतकराच्या वागण्यामागची सुसंगतीही उलगडून दाखवली आहे. केतकराचं विचारधन इतक अवाढव्य की, ते वेचायला आणि त्याचा पूर्ण परिचय करून घ्यायला अनेक ग्रंथ खर्ची घालावे लागतील. पण या चरित्रात बहुताश हेतू साध्य झाले आहेत. जॉन्सन या कोशकर्त्याला बॉस्वेल लाभला, तसे केतकर या ज्ञानकोशकाराला गोखले, असंच हे चरित्र वाचून म्हणाव लागेल.

मॅजेस्टिकनंच प्रकाशित केलेल, वि. स. वाळिंबे यानी लिहिलेल, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच चरित्र म्हणजे एका तेजस्वी जीवनाची ओजस्वी गाथा आहे. सावरकरावर इतकं लिहून झालय! तरीही लिहायचं उरलंच आहे अशीच भावना निर्माण करणारं ते धगधगतं जीवन होत. त्यातून कोटचावधी स्फुल्लिंग बाहेर पडली. अजूनही पडताहेत. प्रत्येकान एकेक पकडल तरी लिहिणाऱ्याच जीवनही उजळून निघावं. तशात वि. स. *वाळिंबे याच्यासारखा लेखक म्हणजे सावर*कराचं सोनं आणि वाळिंब्यामधला सुवर्णकार याच्या संयोगान एक देखणा अलकारच घडला आहे असं म्हणावं लागेल. सावरकर म्हणजे एक अद्भुत रसायन होतं. हिंदुराष्ट्रवाद, सशस्त्र क्राती, काळंपाणी, त्रिखडात गाजलेली उडी, मातृभूमीच्या असीम प्रेमान ओथबलेल काव्य, द्रष्टेपणाचं राजकारण अशा एकेका सकस दलानं 'सावरकर' हे पूर्ण विकसित कमल तयार झालेलं! त्या प्रत्येक दलाला वाळिंबे यानी अक्षरजलान टवटवीत केलेल. सावरकरांचे जाज्वल्य विचार आणि व्यक्तिमत्व पेलायला लेखणीही तशीच समर्थ हवी. प्रत्येक प्रसंगी प्रतिकूल गोष्टी काय घडतील याचा विचार करून सावरकर उपाय योजना सागत. गाधीवध अभियोगात आपल्याला अधिकाधिक जन्मठेपेची शिक्षा होईल हे त्याना आधीच कळलं होतं. अंदमानच्या अद्यावत माहितीची पुस्तकं त्यानी अभियोगाच्या *काळातच वाचली होती. सावरकराचं काव्य* हे त्यांच जीवनच होतं होतं. त्यामुळे त्याचं काव्य आणि चरित्र यात भेद करता येत नाही. सावरकराच चरित्र वाचत असताना त्याच्या कविता मनात उद्घोष करू लागतात.

## 'स्वरभास्कर'

अभिजात सगीताचा अनभिषिक्त सम्राट सगीतसूर्य पंडित भीमसेन जोशी याचं चरित्र 'स्वरभास्कर' या नावान प्रा. शरद अभ्यंकर यानी लिहिलं आहे आणि मेहता पब्लिशिंग हाऊसनं ते प्रकाशित केलं आहे. हे चरित्र म्हणजे सगीतवेड्यांना रसीली मेजवानी. भीमसेनाच गाणं हा अथांग सागरच. त्याच्या निर्मितीचा, मूळ बिंदूचा शोध घेण्याचा हा रसिक प्रयत्न. ख्यालगायकीचा बादशहा असं ज्याच वर्णन केलं जातं, ते पडित भीमसेन अनेक हालअपेष्टामधून तावूनसुलाखून निघाले. नादब्रह्माचा हा सच्चा उपासक बालपणी कितीदा घरातून पळून गेला. स्वराच्या दुनियेत हरवला, पण शेवटी त्याला सापडला–तीन तपाहून अधिक काळ कोटचावधी रसिकाना मुग्ध करणारा चिरयौवन स्वर! सवाई गधर्वांकडून भीमसेन गाणं शिकले आणि किराणा घराण्याच्या *गायकीला लालित्य आणि* डौल प्राप्त करून दिला. भीमसेन जोशीची सतवाणी, त्यानी गायिलेली अनेक गीतं आणि अभग, खास भीमसेनी छाप असलेले त्याचे बहारदार ख्याल, *त्याच्या गायनाच्या* मैफिलीचं जिवत चित्रण आणि अकृत्रिम निवेदनशैली यामुळे हे चरित्र अल्हादक होऊन हा 'स्वरभास्कर' शतकिरणानी तळपत राहतो.

'महर्षि विनोद जीवनदर्शन' हा मिद्धाश्रम प्रकाशननं प्रकाशित केलेला ग्रथ म्हणजे न्यायरत्न धुडिराजशास्त्री विनोद याच्या समग्र चरित्रग्रथाचं लघुरूप म्हणता येईल. त्याच्या भक्तासाठी तर ही पर्वणीच. विनोदाची अलौकिक बुद्धिमत्ता, कल्पनाशक्ती, शब्द प्रभुत्व, विश्लेषणनैपुण्य, सहिष्णुता, करुणाबुद्धी, परोपकारवृत्ती या सर्व गुणांच्या उत्कर्षाचा आलेख म्हणजे हे चरित्र. वाचन, मनन, चिंतन–लेखन यात न्यायरत्नांची प्रगल्भता लहान वयापासूनच दिसून येते. त्याची प्रकृती मुळातच उत्कट अशी. मनुष्य*स्वभावाची त्याना अचूक पारख होती आणि* जवळ सूक्ष्म तरल विनोदबुद्धी होती. अनेक पाश्चात्य आणि भारतीय तत्त्वज्ञ त्यानी पचवले होते. करवीर पीठाचे शकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी त्याना '*न्यायरत्न*' ही पदवी दिली, न्यायदर्शनातील विद्वत्तेबद्दल आयुष्याच्या पूर्वार्धात विशुद्ध ज्ञानोपासना त्यांनी केली. जोडीला उपेक्षिताबद्दलचा सक्रीय कळवळा होता. उत्तरार्धात मत्र–तत्र विद्याही हस्तगत केल्या. त्यांच्याकडे व्याधिग्रस्त, आपत्तीमुळे निराश झालेल्या, दु:खी अपयशी व्यक्ती येत. अशा व्यक्तीना ते सर्वतोपरी सहाय्य करीत. ऑस्ट्रेलिया, अमेरिका जपान अशा अनेक देशात त्याचे बुद्धिवैभव तळपले. त्याना 'विश्वशाती सचीव' हा *बहुमोल मान प्राप्त झाला. त्याचे ग्रथ, शैली,* व्याख्यान, पाश्चात्य तत्ववेत्त्यांशी चर्चा, समाजसुधारणेचं कार्य या सर्वातून त्याचं असामान्य व्यक्तित्व दृग्गोचर होतं. या चरित्रात मात्र त्यांना अलौकिक विभूती मानूनच सर्व रेखाटन करण्यात आलं आहे. दिव्यत्वाचा स्पर्श देण्याचाही प्रयत्न आहे. त्यामुळे त्यांच्या चाहत्यांखेरीज इतराना, जर सिद्धी वगैरेंसारख्या गोष्टींवर विश्वास नसेल तर कदाचित फार रुचणार नाही.

आहे तसं रंगवण, पोट्रेट तयार करणं हा चरित्राचा मुख्य निकष, आत्मचरित्रापेक्षा चरित्रामध्ये त्यामुळच व स्वेतर डोळ्यांनी पाहिल्यामुळं खरेपणा येत असावा. म्हणून चरित्रग्रंथ वाचणं हा एक चागला परिचय*मार्ग होऊ शकतो.*

## रंगभूमी

# पुसदचे नाट्यसंमेलन—साचेबंद स्वरूपाचे

**वि. भा. देशपांडे**

यंदाचे नाट्यसंमेलन ६६ वे होते. विदर्भातील पुसद गावी ते संपन्न झाले. वास्तविक हे संमेलन धुळ्याला होणार होते पण तिथे दुष्काळाची परिस्थिती असल्याने तिथल्या मंडळींना ते शक्य झाले नाही. अर्थात ह्या परिस्थितीचा अंदाज यायला सप्टेंबर महिना उजाडला. त्यानंतर धावपळ करून पुसदला संमेलन घ्यायचे ठरले.

पुसदच्या कार्यकर्त्यांना अर्थातच पुरेसा वेळ मिळाला नाही. पण जेवढ्या आवाक्यात त्यांना साज उभा करणे शक्य होते तेवढ्यामध्ये त्यांनी साजरे केले. तिथल्या जनता शिक्षण मंडळाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष होते. ते एक निमित्त संमेलन भरविण्यास उपयुक्त ठरले. पुसद हे तसे आडगाव. व्यावसायिक नाटकवाले आपले प्रयोग घेऊन अधूनमधून जातात. पण नाटकाच्या संदर्भातले ते वर्दळीतले गाव नाही. प्रवास पुणे-मुंबईहून कमीत कमी सोळा–सतरा तासांचा. तोही सलग नाही, तर एकदा वाहन बदली करून जाण्याचा. परिणामी बाहेरून येणारे नाट्यप्रेमी प्रतिनिधी किंवा नाट्यक्षेत्राशी संबंधित मंडळी मोजकीच होती. नाट्यपरिषदेचे पदाधिकारी, परिसंवादांसाठी निमंत्रित केलेले वक्ते आणि पणशीकर परिवारातील मंडळी एवढ्याच लोकांची उपस्थिती होती. त्यामुळे कोणकोण आले किंवा नाही ते सहजपणाने कळत होते. मात्र नेहमीप्रमाणे स्थानिक मंडळींची उपस्थिती चांगली होती. इतर कार्यक्रमांपेक्षा रात्रीच्या-संध्याकाळच्या नाट्यप्रयोगांना विशेष प्रमाणात उपस्थिती होती.

संमेलनाच्या कार्यक्रमाचे स्वरूपही साचेबंद होते. अध्यक्षीय भाषण, काही परिसंवाद, काही नाट्यप्रयोग, ठराव आणि समारोप. यंदा गेल्या वर्षीचेच अध्यक्ष असल्याने भाषणाबद्दलची उत्सुकता कमी होती. पणशीकरांचे भाषण ऐकताना जाणवत होते की, त्यांनी वर्षभरात निश्चितच भरीव काम केले आहे. एकतर परिषदेची आर्थिक स्थिती सुधारण्यास खूपच मदत झाली. नाट्यमहोत्सव, कर्नाटक शासनाने दिलेले लाखाचे अनुदान, महाराष्ट्र शासनाने गडकरी पारितोषिकासाठी दिलेले लाखभर रुपये, परिषदेला दादर–माटुंगा येथे मिळालेली जागा इत्यादी महत्त्वपूर्ण गोष्टींचा उल्लेख करता येईल. ह्या गोष्टी घडण्यामागे किंवा प्रत्यक्ष रूपात येण्यामागे पणशीकरांच्या परिश्रमाचा सहभाग आहे हे संबंधितांना माहीत आहेच. ते कार्य पूर्ण करणे किंवा आणखी मार्गी लावणे यासाठी पणशीकरांची पुन्हा दुसऱ्या वर्षी आवश्यकता आहे, असे काही कार्यकर्त्यांचे आणि खुद्द पणशीकरांचे जे म्हणणे आहे ते नाकारता येण्यासारखे नाही.

काम करणारा अध्यक्ष नाट्यपरिषदेला हवा यात वादच नाही. यातूनच कामाचा आणि मानाचा अशी दोन अध्यक्षपदे असावीत अशीही कल्पना पुढे आली. घटनादुरुस्ती लौकरच होणार आहे अशी वार्ता आहे. ती प्रत्यक्ष समोर आल्यावर त्यावर जरूर बोलता येईल. पण त्यामध्ये या अध्यक्षपदाचा, त्याच्या निवडीच्या पद्धतीचा आणि संमेलनाच्या स्वरूपाचा स्पष्ट निर्णय होणे आवश्यक आहे. कारण परिषदेची आर्थिक स्थिती सुधारत आहे म्हटल्यावर सभासदांच्या आणि बाहेरच्या मंडळींच्या अपेक्षा वाढत जाणार. अनेक योजना निरनिराळ्या विभागातून समोर येणार. त्या सर्वांना सामोरे जाणे अवघड होणारे आहे. ती क्षमता प्रत्येक अध्यक्षामध्ये असेलच असे नाही. ज्याच्यामध्ये क्षमता आहे तो लगेच अध्यक्ष होईलच असेही नाही. यातून मार्ग काढावा लागेल.

गेली बरेच वर्षे एक कल्पना बोलली जात आहे की, संमेलनाचा अध्यक्ष वेगळा आणि परिषदेचा अध्यक्ष वेगळा. यामध्येही तर्क-कुतर्क आहेतच. तसेच परिषदेचा अध्यक्ष तीन वर्षे असावा असाही एक सूर आहेच. कोणतीही पद्धती स्वीकारली तरी ती निर्दोष असणार नाही. त्यामधील त्रुटी जाणवत राहणारच. तरीही त्यातले काही प्रकार करून पाहायला हरकत नाही. संभाव्य काहीतरी वाईटच घडेल म्हणून काहीच पर्याय निवडायचा नाही हे नाकर्तेपणाचे किंवा धूर्तपणाचे ठरणारे आहे. त्यातही गंमत अशी की, आजवरच्या अनेक अध्यक्षांनी या संदर्भात आपले विचार मांडून या पद्धतीत बदल व्हावा असे म्हटले, परंतु त्यानंतर कोणीच काही हालचाल केल्याचे दिसत नाही. जी गोष्ट नाट्यसंमेलनाची तीच साहित्यसंमेलनाची आहे.

हे विस्ताराने लिहिण्याचे कारण असे की, संमेलनात तीन दिवसांत यावर खाजगीत चर्चा होते; पण पुन्हा दुसरे संमेलन होईतो काहीच घडत नाही. ते घडावे.

पुसदला तीन परिसंवाद झाले. एक–बालरंगभूमी आणि व्यक्तिमत्त्व विकास, दोन–'नाट्यसमीक्षक आपली जबाबदारी नीट पार पाडत नाहीत.' तीन–'आदिवासी कला आणि आधुनिक नाट्य.' बालरंगभूमी आणि शालेय रंगभूमी यावर झालेल्या चर्चेनंतर मुलांसाठी उत्स्फूर्त नाट्याविष्काराचा कार्यक्रम ठेवला होता. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. सुधा करमरकरांनी तो सारा विभाग कुशलतेने सांभाळला. या निमित्ताने एक घडले की, स्थानिक लोक केवळ श्रोते–

प्रेक्षक राहिले नाहीत तर सहभागीही झाले. प्रोत्साहित झाले.

### एकतर्फी परिसंवाद

समीक्षक आपली जबाबदारी नीटपणाने पार पाडीत नाहीत, यावर झालेला परिसंवाद बराचसा एकतर्फी झाला. तो अशा अर्थाने की, वक्त्यामध्ये माधव मनोहर, कमलाकर नाडकर्णी, वि. भा. देशपांडे, ललिता बापट हे सारे समीक्षकच होते. हे सारे अर्थातच समीक्षकाच्या बाजूने बोलले. उरलेले दोन वक्ते होते पुरुषोत्तम दारव्हेकर आणि अकोल्याचे राम जाधव. हे दोघेही प्रयोगनिर्मितीशी संबंधित असे आहेत; पण तेही बहुतांशपणाने समीक्षकाच्या बाजूनेच बोलले. मुळात नेहमीचा एक घोटाळा झालेला असणारच. तो म्हणजे वृत्तपत्र, साप्ताहिके, ग्रंथ यामध्ये नाटकावर लिहिणारे सारेच समीक्षक असतात असे गृहीत धरले जाते अपेक्षा तात्त्विक किंवा आदर्श समीक्षेची ठेवायची आणि समोर उदाहरणे मात्र विशिष्ट वृत्तपत्रात येणाऱ्या प्रयोग परीक्षणाची असायची. त्यामुळे समीक्षकाची जबाबदारी कोणती आणि तो ती पाळत नाही म्हणजे काय हे समीक्षकाव्यतिरिक्त कोणीतरी सांगणे आवश्यक होते. तिसरा परिसंवाद आदिवासी कला आणि रंगभूमी या संदर्भातला होता. त्या परिसंवादाला मी थांबू शकलो नाही, पण अशोकजी परांजपे, रमेश कुबल, डॉ. देवगावकर, वाकोडे आदी मंडळींनी आपल्या विषयाची तयारी गांभीर्याने केलेली आहे, हे त्यांच्याशी आदल्या दिवशी बोलत असताना जाणवत होते.

या परिसंवादाव्यतिरिक्त एक छोटे पण महत्त्वपूर्ण असे प्रदर्शन मांडले गेले होते. मुंबईचे डॉ. पंडित यांनी रंगभूमीविषयक अनेक गोष्टींचा संग्रह केला आहे. त्यावर विस्ताराने लिहिण्यासारखे आहे. पुसदला त्यांनी मांडलेल्या प्रदर्शनात सौभद्र हा विषय होता. सौभद्र नाटकाच्या आजवर निघालेल्या सर्व आवृत्त्या, तत्कालीन व्यक्तींची छायाचित्रे आणि काही कागदपत्रे मांडलेली होती. ज्याला नाट्यविषयाचा खोलवर जाऊन अभ्यास करावयाचा असेल, त्याला अशी प्रदर्शने आणि त्यातली सामग्री उपयोगी पडण्यासारखी आहे.

थोडेसे घाईने, आडबाजूच्या गावी का होईना; पण यंदाचे नाट्यसंमेलनाचे सूप सुविहितपणे वाजले. पुढच्या वर्षीची वाट न पाहता संमेलनाच्या संदर्भातले अनेक प्रश्न मार्गी कसे लागतील याचा आता विचार व्हावा.

---

चित्रपट

# देवआनंदचा

## हम नौजवान

देवानंदला चिरतरुण राहण्याच्या वेडाने झपाटले आहे त्यासाठी तो अजूनही केस उडवत तिरपा चालतो. वृद्धत्वाचे पुरावे झाकण्यासाठी गळाबंद भडक शर्टस् घालतो, आणि युवकाशी या ना त्या कारणाने संबंधित असलेल्या त्याच्या सात चित्रपटाच्या लागोपाठच्या अपयशानंतरही पुन्हा त्याच विषयावरचा 'हम नौजवान' हा चित्रपट निर्माण करतो.

'डेडिकेटेड् टु न्यु स्टुडंट्स्' अशी पहिलीच पाटी पडद्यावर झळकते. त्यानंतर पंडित नेहरूंच शिक्षणविषयीचं एक वचन. आणि लगोलग मिनीस्कर्टमधली रिचा शर्मा 'हम नौऽजवान' असं ओरडून पहिल्या दोन पाट्यांना वाकुल्या दाखवत चित्रपटाच्या पुढील प्रवासाची कल्पना देते.

युवकाबद्दल काही तरी सांगायच, त्यांना संदेश वगैरे द्यायचा ही देवानंदची जुनीच खोड आहे. 'हम नौजवान' मध्ये त्यानं तोच प्रगल्भ केलाय. परंतु देवानंदचे या आधीचे चित्रपट अंमळ जास्तच रोमॅंटिक होते. इथे दिलीप परदेशीच्या अस्तित्वामुळे 'हम नौजवान' थोडा तरी जमिनीवरून चालतो. चित्रपटाच्या अनुषंगानं येणाऱ्या प्रश्नांची उत्तरं जरी खास 'देवानंदी' असली तरी त्याची मांडणी जरा तरी वास्तवाचा अंश ठेऊन केली जाते.

नौजवानची कथा ओरॅनिक कॉलेजात घडते. या कॉलेजात राज्य गृहमंत्र्याच्या शम्मी (अॅटली ब्रार) नामक चिरंजीवांची सत्ता चालते. हा शम्मी खलनायक असल्याकारणाने प्रचंड वाया वगैरे गेलेला. रिव्हॉल्वर खेळवतच कॉलेजात वावरणारा. त्याच्या दहशतीमुळे आधीचे चार प्राचार्य आपले राजिनामे देऊन घरी बसलेले. प्रा. हंस (देवानंद) अतिलोकप्रिय कवि, रश्मी (रिचा शर्मा) सारख्या तरुणी त्याचा चाहता वर्ग. आपल्या एकुलत्या एक प्रिय (तब्बू) या मुलीच्या बेपत्ता होण्यामुळे अस्वस्थतेत असतानाच याच्याकडे ओरॅनिक कॉलेजचं प्राचार्यपद चालून येतं. हंसला ते एक मोठं आव्हान वाटत. एका ध्येयवादी भूमिकेतून तो ते पद स्वीकारतो. हंसचा ध्येयवाद अर्थातच शम्मीच्या डोळ्यात खुपायला लागतो. मग शहास काटशह देणं सुरू होतं. शम्मीला आपलंस करून घेत असतानाच हंसच्या असं लक्षात येतं की आपल्या मुलीचा खून झालाय आणि तिचा खुनी शम्मी हाच आहे. पोलीस यंत्रणेच्या ढिसाळपणामुळं पुढं कवि–प्राध्यापक हंस डिटेक्टिवगिरी करून शम्मी विरुद्ध सज्जड पुरावे जमवतो. मग गृहमंत्र्याचे प्रत्यक्ष दडपण, पोलीस कमिशनरचं हंसला येऊन मिळणे, शम्मीच्या हंसला नमोहरण करण्यासाठीच्या वाकड्या चाली वगैरे बरेच घोळ होऊन चित्रपट क्लायमॅक्सपर्यंत पोहोचतो. आणि क्लायमॅक्सला पोलीस कमिशनरची एक गोळी शम्मीला लागून शम्मीची ओरॅनिक कॉलेजमधील तमाम समस्यांची आणि पर्यायानं चित्रपटाची समाप्ती होते.

बॉक्स ऑफिसला देवानंद नेहमीच शरण येत आला आहे. इथेही त्यानं जमतील तितक्या क्लृप्त्यांचा सढळ हाताने वापर केला आहे. आणि या क्लृप्त्या–प्रकरणात तो इतका वहावत गेलाय की हा चित्रपट एका अतिशय खाजगीपातळीवरील सूडकथा केव्हा होते हेही त्याला कळलेलं नाहीय.

रश्मी आणि हंसमधील नातेसंबंध दिग्दर्शकानं नाजूकपणे हाताळलेयत. रश्मी एक कॉलेजियन मुलगी, मध्यमवयीन हंसच्या प्रेमात वगैरे पडते हे नात खासच पाश्चिमात्य बनावटीच आहे. पण ते या चित्रपटात व्यवस्थित 'मावलं' आहे. शिवाय या नात्यामुळे देवानंदची रिचा शर्मा मागे मागे दुडक्या चालीनं पळण्याची सोय झालीय ती वेगळीच. खरं तर 'हम नौजवान'चा नायक देवानंदच आहे. बंटी बहल (संजय) वगैरे सगळे अ–नायक.

नवकेतनच्या प्रथेनुसार अॅटली ब्रार, रिचा शर्मा, तब्बू, बंटी बहल असे अनेक नवे चेहरे पडद्यावर प्रथमच झळकलेयत. पैकी देखणी शरीरयष्टी लाभलेला अॅटली ब्रार सगळ्यात परिणामकारक ठरतो. त्याचा

आवाज, सवाद फेक सजयदत्तचा (अरेरेरे! ) भास करून देत असली तरी तो कॅमेऱ्याला फार सहजतेने सामोरा जातो. दाताच्या रचनेमुळे मिस्किल वाटणारी रिचा शर्मा फराह् विजयता आणि कपनी पेक्षा बरीच उत्तम कामगिरी करते. फक्त ती जीभ टाळ्याला स्थिरावण्याचे श्रम घेत नसल्याने तिचे शब्द उशीरा कळतात. रश्मीच्या प्रियकराची भूमिका मात्र बटी बहल शब्दश: 'पार पाडतो.' श्रीराम लागू, अनुपम खेर आणि स्वत. देवानदनी आपापल्या भूमिका अॅज युज्वल सुरेख साकार केल्यायत.

इग्रजी आणि हिंदीमध्ये औषधापुरता भेदभाव करणारी इदिवराची बहुप्रसव लेखणी इथे 'यु आर माय डार्लिंग'सारखे भिती-दायक गीत निर्माण करते. त्याच्या जोडीला अजान हेही आहेत. राहुलदेव बर्मनचं संगीतही नेहमी प्रमाणं या चित्रपटाची जमेची बाजू नाही. तरी बर्मनच सगीत विशिष्ट दर्जाच्या खाली कधीच येत नाही. तसच इथही झालंय. अर्थात हेच संगीत भप्पी लहरीच्या नावावर असत तर ते उत्तम या सदरात मोडल असत. बर्मनच्या लौकिकाला मात्र ते साजेसं नाही.

खरं तर हा चित्रपट देवानंदला युवक-वर्षातच प्रदर्शित करायचा होता पण सेन्सॉ-रची माशी कुठं तरी शिकली आणि गम्मत म्हणून कबुतराना मारणाऱ्या शम्मीला शांतता वर्षात पाहण्याच आपल्या माथी आलं !

—मिलिंद संगोराम

# दिलवाला

## नुसती पात्रांची गर्दी

जितेंद्र–श्रीदेवी, जितेंद्र–जयाप्रदा या जोड्या-त्याचे त्याच त्याच प्रकारचे नाच, तोच प्रेमाचा त्रिकोण, शक्तीकपूर, कादरखानचा बावळट खलनायक हे सगळं पाहून प्रेक्षक केव्हाच कटाळले. हे दाखवून आता दक्षिणी निर्माते–दिग्दर्शकही वैतागले असावेत. म्हणून त्यानी थोडासा पवित्रा बदलून 'दिलवाला' हा चित्रपट सादर केला आहे. आजचे भ्रष्ट राज्यकर्ते आणि त्याना शह देऊ पहाणारा, कायदा आपल्या हातात घेऊ पहाणारा एक तरुण याची कथा 'दिलवाला'त आहे. पण कथा वरवर वेगळी वाटली तरी पात्रातले सबंध, खास दक्षिणी फॉर्म्युल्याने त्याला दिलेली कौटुबिकतेची फोडणी, कलाकार बदलले तरी तीच नाचगाणी आणि मुख्य म्हणजे शक्तीकपूर–कादरखान ही त्रासदायक ठरू लागलेली जोडगोळी हे सगळं कायम असल्यानं 'दिलवाला' ही थोडा मसाला बदलून पुढं आणलेली नेहमीचीच डिश ठरली आहे.

जज्ज सुमित्रादेवी (स्मिता पाटील) ही अतिशय न्यायप्रिय, करारी. तिला दोन धाकटे भाऊ मोहन (अरुण गोविल) आणि रवी (मिथुन चक्रवर्ती) मोहन वरवर सज्जन भासणारा, बहिणीच्या आज्ञेत रहाणारा पण प्रत्यक्षात तसा नसलेला. दुसऱ्या बाजूला रवी थोडी फार गुडगिरी करणारा पण तेही लोकाच्या भल्यासाठी वगैरे. तो आपल्या मनाप्रमाणे कायदा वगैरे हातात घेऊ पहा-णारा असल्यामुळ सुमित्रादेवी त्याच्यावर नाराज असतात.

शहराचा खासदार असतो राजशेखर (प्राण) त्याचा साथीदार सेवकराम (कादर-खान). या सेवकरामची रवी फजिती करतो. त्यामुळे त्याची मुलगी पद्मा (मीनाक्षी शेषाद्री) चिडून त्याला धडा शिकवायला जाते. पण रवी हा चित्रपटाचा नायक अस-ल्याने ती साहजिकच त्याच्या प्रेमात पडते.

राजशेखर पुन्हा निवडणुकीला उभा रहातो. पण यावेळेस आपल्याविरुद्ध हवा आहे हे लक्षात येताच तो एक चाल खेळतो. सर्वसामान्यात लोकप्रिय असणाऱ्या गरीब गोपाळ (श्रीराम लागू) च्या मुलीशी (सुप्रिया पाठक) तो आपल्या मुलाच (गुलशन ग्रोव्हर) लग्न लावून देतो. याचा अपेक्षित परिणाम होऊन तो पुन्हा निवडून येतो.

तो निवडून आल्यावर गुलशन ग्रोव्हर सुप्रियाचा खून करतो. हा खटला कोर्टात उभा रहातो आणि दरम्यान राजशेखरकडून जज्ज असलेल्या सुमित्रादेवीवर विविध दड-पणं येऊ लागतात. सुमित्रा त्याला दाद देत नाही हे पाहिल्यावर तो किंगकाँग (शक्ती कपूर) या गुंडाची मदत घेतो. चपा नावाच्या तरुणीला नोकर बनवून सुमित्राच्या घरात पाठवतो आणि ती मोहनला स्वतःच्या मोहात पाडते. ही गोष्ट लक्षात येताच सुमित्रा त्या दोघाचं लग्न लावून देते. पण त्या रात्रीच चपाचा खून होतो आणि त्याचा आळ मोहन-वर येतो. हा खून करताना आपण पाहिल्याच सुमित्राचा पूर्वीचा पती मदन (सुरेश ओबेरॉय) आणि मुलगी सपना (सारिका) सांगत असतात.

भावाला वाचवण्यासाठी जज्जपद सोडून सुमित्रा त्याचं वकीलपत्र घेते. रवी त्याच्या पद्धतीने मारामारी वगैरे करून या प्रकर-णाचा छडा लावू पहातो. कोर्टकचेरी, गोंधळ, ओलीस ठेवणे, खून अशा सगळ्या प्रकारा-नतर शेवटी सगळ्या आरोपीना शिक्षा होतात.

'दिलवाला' एकूण असा आहे. या कथेला कथा म्हणायची की नाही हे आता प्रेक्षकानीच ठरवायच. यात या ना त्या कार-णानी इतकी पात्रं आहेत– कुणाचे भाऊ, बहिणी, कुणाचा नवरा, कुणाची मुल– की कुणाचं कुणाशी काय नातं आहे हेच समजे-नास होतं. पात्राच्या या गर्दीमुळच 'दिल-वाला' विलक्षण विस्कळीत बनला आहे. एवढी पात्र आणि त्यात प्रसिद्ध नावं घुसव-ण्याचा आटापिटा, यामुळ कुणाला किती फूटेज द्याव याचा काही अंदाजच आलेला नाही. चित्रपटात त्यामुळं अक्षरश: कुठल्याही क्षणी कुठलही पात्र काय वाटेल ते करत असतं. सगळ्याचे प्रसग शेवटी एकत्र आणून त्यांची मोळी बांधली असावी असं वाटत रहात.

चित्रपटाचे सवाद कादरखानचे आहेत. एवढ सागितल तर त्याचा दर्जा काय असेल याची कल्पना येईल. तेच जुन्या पद्धतीचे, ओढूनताणून यमक जुळवलेले संवाद ऐकून हसू येण्याऐवजी त्रासच होतो. चित्रपटामागून चित्रपटात कादरखानलाच सधी देण्याइतकी काय मोहिनी त्यान दक्षिणेवर घातलीय तिथले निर्मातेच जाणे

चित्रपटाचं सगीत, छायाचित्रण आणि इतर तान्त्रिक बाबी 'भिकार' या सदरात मोडणाऱ्या.

अभिनयाच्या बाबतीतही बहुतेकांची तीच स्थिती आहे. चित्रपटात थोडा फार वाव आहे तो मिथुन आणि स्मिता पाटीलला. त्यात मिथुनची भूमिका नेहमीचीच आहे. स्मिताच्याच भूमिकेत थोडा वेगळेपणा आहे. बाकी सगळ्याचा उल्लेख केला नाही तरी चालण्यासारखा. सुरेश ओबेरॉय, सारिका, अरुण गोविल, प्राण, शक्ती कपूर, कादरखान, अरुणा इराणी, असरानी, गुलशन ग्रोव्हर इ. मडळी चित्रपटात आहेत इतकच. मीनाक्षी-सुद्धा मोजून दोन–चार प्रसगात दिसते. पण तिच्या ताठ आणि भावहीन चेहऱ्यान ती तेवढीसुद्धा बघायला नको वाटते.

चित्रपटानं खरी वाया घालवलीय सुप्रिया पाठकला. दोन–तीन प्रसगापुरती, काहीही वाव नसणारी, थोडीही चमक दाखवायला न मिळणारी ही भूमिका तिनं कशी केली याच आश्चर्य वाटत रहातं आणि एवढी गुणी अभिनेत्री हाताशी असूनही तिचा योग्य उप-योग न करून घेणाऱ्या दिग्दर्शकाची कीव.

—सीमा कुलकर्णी

## तेंडुलकरांची नाटके

**डॉ. चंद्रशेखर बर्वे**

" वहात वहात आयुष्याच्या मध्यभागी पोचलो आहे. अथांग खोली आता प्रत्यक्ष जाणवू लागली आहे.... समुद्रावरून समुद्रपक्षी फिरतात, तसा मी जीवनावरून मनानं दिशाहीन, निरुद्देश, संथपणे भिरकांडत, तरंगत आहे....उत्सुकता एकच आहे, या समुद्राचा तळ किती खोल असेल, तो कसा दिसत असेल ? "
जो तळ दिसला तो तेंडुलकरांनी आपल्या नाटकांतून दाखवला,

समुद्रपक्ष्याप्रमाणे शांतपणे भिरकांडणाऱ्या तेंडुलकरांची नाटके मात्र वादळी अन् वादग्रस्त ठरली !

या साऱ्या म्हणजे पंचवीस नाटकांचा व तेंडुलकरांच्या श्रेयाचा, विवेचक दृष्टीने, पण आस्वादक वृत्तीने शोध घेण्याचा हा एक प्रयत्न–

**तेंडुलकरांची नाटके**
किंमत : तीस रुपये

## कल्पान्त

**मनोहर राईलकर**

आजकाल सटरफटर राष्ट्रंसुद्धा अणुशस्त्रांचे ढीगच्या ढीग बाळगून आहेत. अणुयुद्धाच्या संभाव्य परिणामांचं गांभीर्य या सर्वांना समजत असेल का ? आणि एखाद्या बेजबाबदार राष्ट्रानं युद्ध सुरू केलंच तर ? किरणोत्सर्गी धूळ जगभर पसरली तर ? तर काय होईल ? या प्रश्नाचं ज्वलंत व जिवंत उत्तर म्हणजे ही कादंबरी.

' ऑन द् बीच ' या नेव्हिल शूटच्या कादंबरीचा भावानुवाद

**कल्पान्त**
किंमत : पस्तीस रुपये

## लांडगा आला रे ऽ आला

लेखक : **फर्ले मोवॅट**
रूपांतर : **जगदीश गोडबोले**

फर्ले मोवॅट या जीवशास्त्रज्ञाने घेतलेल्या लांडग्यांच्या जीवनाच्या शोधाची ही कथा. कल्पितालाही मागे टाकणारा, रोमांचक अनुभव मोवॅटला उत्तर ध्रुवावरच्या या सफरीत आला. लांडग्याविषयीची माणसाची पूर्वापार मतं पार कोसळवून टाकणारी ही कहाणी, त्याच वेळी मनुष्य स्वभावावरही विदारक प्रकाश टाकते.

**लांडगा आलारे ऽ आला**
किंमत : तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४ ३४ ५९

C/o श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर
दादर ( प. ) मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२५४५५